"या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे."

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संशोधक

मार्च–जून १९९० वर्ष ५८
ज्येष्ठ–आषाढ शके १९१२ अंक १–२

संपादक
प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
प्रा. डॉ. मु. ब. शहा
प्रा. व. ग. हजिरनीस

वार्षिक वर्गणी	अंकाचे मूल्य	आजीव वर्गणी
३५ रुपये	२० रुपये	३०० रुपये

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

		पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
१.	राजवाडे मराठी धातुकोष	३१६	१९	५०
२.	राजवाडे नामादी व्युत्पत्तिकोश	३३८	१०२	५०
३.	ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रूपांतर (वि. का. राजवाडे)	१८३	१०	२०
४.	राजस्थान महाराष्ट्र संघर्ष (शु. पु. जोशी)	१९१	४५	३५
५.	राजवाडे चरित्र (भा. वा. भट)	६२४	२७	५०
६.	मराठ्यांच्या इतिहासाची साधने (मो. रा. जोशी)	३८७	५०	५०
७.	ऋग्वेदातील ज्योतिषमूलक कालनिर्णायक गमके	१०४	३०	१२
८.	संस्कृत भाषेचा उलगडा (वि. का. कुळकर्णी)	२१०	११९	२५
९.	ज्ञानेश्वरी पदकोश (श्री. शिवाजीराव भावे)	५१६	५०	१००
१०.	ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण	१२६	५०	१०
११.	विलासमणिमंजरी (प्राचीन काळातील गंजीफा खेळाची माहिती देणारा ग्रंथ)	८३	८३	१०
१२.	ऐतिहासिक लेखचर्चा–भाग ४ था	२२१	२५	३५
१३.	चर्चात्मक निबंध	२२८	६८	४०
१४.	ऐतिहासिक चर्चा ग्रंथ १६	२४८	३६	३५
१५.	पंचीकृत विवेक–प्राचीन मराठी गद्यग्रंथ गरीबनाथ स्वामीकृत	१०३	२७	१०

[मलपृष्ठ क्र. ३ वर

"या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे."

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संशोधक

मार्च–जून १९९०
ज्येष्ठ–आषाढ शके १९१२

वर्ष ५८
अंक १–२

संपादक

प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
प्रा. डॉ. मु. ब. शहा
प्रा. ब. ग. हजिरनीस

वार्षिक वर्गणी ३५ रुपये | अंकाचे मूल्य २० रुपये | आजीव वर्गणी ३०० रुपये

अनुक्रमणिका

कोंकणचे मौर्य

डॉ० हरिहर ठोसर, मुंबई

चंद्रगुप्त मौर्याने इ. स. पूर्व ३२४च्या सुमारास भारताच्या इतिहासातील पहिलेवहिले देशव्यापी साम्राज्य निर्माण केले. इ. स. पू. तिसऱ्या शतकात अशोकाने या मौर्य साम्राज्यास वैभवाच्या शिखरावर पोचविले. इ. स. पू. १८७ मध्ये सेनापती पुष्यमित्र शुंगाने शेवटचा मौर्य सम्राट ब्रहद्रथ याचा वध केला आणि त्याबरोबर हा राजवंश इतिहासजमा झाला.[1] त्यानंतरच्या काळातील या राजवंशाचा ठावठिकाणा लागत नाही. परन्तु अलीकडील काळात प्रकाशात आलेल्या काही कोरीव लेखांवरून इतिहासकार या निष्कर्षाप्रत येऊन पोचले आहेत की, मौर्यांच्या वंशजांनी पुढील काळात दक्षिणेत स्थलांतर केले आणि मर्यादित स्वरूपात का असेना, आपल्या सत्तेचे पुनरुज्जीवन केले.[2] मौर्य सुकेतुवर्मन याने इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस उत्तर कोंकणात आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यामुळे यानंतरच्या काळातील मौर्य शासक 'कोंकणचे मौर्य' किंवा 'उत्तरकालीन मौर्य' (Later Mauryas) या नावाने इतिहासात ओळखले जातात. इ. स.च्या चौथ्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत भारताच्या विविध भागांतील राजकारणात मौर्य घराण्यातील व्यक्तींचे अस्तित्व जाणवते. य व्यक्तींचा परस्पर संबंध कसा होता हे अद्याप अस्पष्ट आहे. तसेच त्यांचा सुसंगत इतिहास आणि समकालीन संस्कृतीतील त्यांचे योगदान याविषयीही माहिती उपलब्ध नाही. प्रस्तुत लेखात या माहितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

उत्तरेतील मौर्यांचे हे वंशज दक्षिणेत केव्हा आणि कोणत्या स्थितीत आले याविषयी निश्चित सांगता येत नाही. परंतु दक्षिणेतील हे मौर्य चंद्रगुप्त अशोकाचे वंशज होते याविषयी बहुतेक इतिहासकारांत मतैक्य आहे. या बाबतीत पुढील शक्यता संभवतात.

(१) आपल्या आयुष्याच्या शेवटी सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने राजसत्तेचा त्याग केला आणि जैन मुनी भद्रबाहुसह दक्षिणेत येऊन कर्नाटकातील श्रवणबेळगोळ इथे वास्तव्य केले. जैन धर्माचा निष्ठावन्त अनुयायी म्हणून त्याने सल्लेखना व्रताद्वारे

आपल्या आयुष्याचा शेवट केला.[३] चद्रगुप्ताबरोबर त्याच्या परिवारातील काही व्यक्तीही दक्षिणेत आल्या व त्यांचे वंशज तिथे स्थाइक झाले असण्याचीही शक्यता आहे. कारण चंद्रगुप्त मौर्याच्या नावाशी जोडला जाणारा आगुप्ताइक नामक काल संवत महाराष्ट्रकर्नाटकाच्या संलग्न प्रदेशात प्रचलित असल्याची-माहिती इ. स. च्या सहाव्या शतकाच्या मध्यास होऊन गेलेल्या मानापूरच्या देज्ज महाराज या राष्ट्रकूट राजाच्या गोकाक (जि. बेळगाव, कर्नाटक राज्य) ताम्रपटावरून प्रकाशात आली.[४] यावरून या प्रदेशात मौर्य वंशातील शासकांचे काही काल तरी शासन असले पाहिजे असा निष्कर्ष निघतो. कोंकणातील मौर्य त्यांपैकी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(२) युवराजांना प्रांतिक प्रशासक म्हणून नेमण्याची प्रथा मौर्यकालात रूढ होती. आपल्या राज्यारोहणापूर्वी अशोक हा अगोदर उज्जयिनीचा आणि नंतर तक्षशिलेचा राज्यपाल होता. बौद्ध ग्रंथ मिलिंदपन्ह आणि अपदान यांतील वर्णनानुसार अशोकाचा समकालीन असलेला पिंगल किंवा पिंगलक नामक मौर्य राजपुत्र सौराष्ट्राचा शासक होता. तो अशोकाचा प्रतिस्पर्धी असून त्याने अशोकाविरुद्ध पाटलिपुत्रावर स्वारी केल्याची माहितीही या ग्रंथात आढळते.[५] परन्तु अशोकाने पिंगलाचा पराभव केला. ही घटना कितपत ऐतिहासिक होती हे समजणे कठीण आहे. परन्तु बिंदुसाराच्या पश्चात अशोक आणि त्याच्या भावांत झालेला वारसा हक्काचा तंटा आणि त्यातून त्याने केलेला आपल्या भावांचा वध इत्यादीविषयी जी माहिती बौद्ध वाङ्मयात आढळते त्या पार्श्वभूमीवर पिंगलाची कथा ही केवळ कपोलकल्पित होती असे म्हणता येणार नाही. विशेष म्हणजे या सौराष्ट्राची नंतरच्या काळातील राजधानी असलेल्या वलभी येथील मौर्य राजवंशाशी आपला संबंध दाखविणाऱ्या गोविंद नामक मौर्य मांडलिकाचा अकराव्या शतकातील एक शिलालेख जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्यात उपलब्ध झाला आहे. हा गोविंद मौर्य यादवांचा सामंत असून त्याने प्रस्तुत शिलालेखात वलभीच्या आपल्या अठरा पूर्वजांची नावे असलेली वंशावळ दिली आहे.[६] यावरून मौर्योत्तर काळात सौराष्ट्रात मौर्य राजवंशाचे शासक होते हे सिद्ध होते. अशोकाने आपल्या परिवारातील युवराजांना प्रांतिक प्रशासक म्हणून नेमले होते.[७] त्याचा नातू संप्रती हा उज्जयिनीचा प्रशासक होता.[८] यावरून हे स्पष्ट होते की, पश्चिम भारतात मौर्य राजपुत्रांना प्रांतिक प्रशासक म्हणून नेमले जात असे. त्यांपैकी काहींचे वंशज पुढे त्याच भागात स्थायिक झाल्याचा पुरावाही वाघळी शिलालेखातील वंशावळीतून मिळतो. महाराष्ट्राचा कोंकण प्रांत गुजरातला लागूनच आहे. त्यामुळे कोंकणातील मौर्यांची शाखा गुजरात किंवा मध्यप्रदेशातील असणेही शक्य आहे.

(३) पुष्यमित्र शुंगाने मौर्य घराण्याचा शेवट करून सत्ता हस्तगत केल्यानंतर या वंशातील उर्वरित व्यक्तींनी परकीय राज्यात आश्रय घेतला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. याला आधार म्हणजे आंध्र प्रदेशातील सालिहुंडम इथे इ. स. पूर्व पहिल्या शतकातील अशोक राजाचा एक शिलालेख सापडला.[९] हा अशोक कोण होता याविषयी वाद आहे. नावावरून तो मौर्य सम्राट अशोकाचा वंशज असल्याचे जाणवते. अशा प्रकारे वेगवेगळ्या परिस्थितीत मौर्य घराण्यातील व्यक्ती भारताच्या विविध भागांत स्थायिक झालेल्या आढळतात. कोंकणातील मौर्यांचे पूर्वज हे यांपैकी एक असावेत. त्यातल्या त्यात कर्नाटक किंवा गुजरातमधून ही शाखा कोंकणात स्थलांतरित झाली असण्याची अधिक शक्यता आहे.

मौर्य धर्ममहाराज सुकेतुवर्मन

कोंकणातील मौर्य राजवंशाचा संस्थापक सुकेतुवर्मन हा होता. त्याचा शके ३२२. (इ. स. ४००) मधील एक शिलालेख ठाणे जिल्ह्यातील वाडा इथे सापडला आहे.[१०] विशेष म्हणजे शक संवताची निर्णायक नोंद असलेला हा निदान दक्षिणेतील तरी सर्वांत प्राचीन शिलालेख होय. इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरपर्यंत कोंकणात त्रैकूटकांचे राज्य होते. त्याच प्रदेशात सुकेतुवर्मन मौर्याने स्वतंत्र राज्य स्थापन केले. यावरून असे दिसते की, सुकेतुवर्मन हा पूर्वी त्रैकूटकांच्या राज्यात अधिकारपदावर असावा आणि या घराण्याचा शेवट करून त्याने कोंकणात आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले असावे.[११] काही इतिहासकारांच्या मते सुकेतुवर्मन हा पूर्वी त्रैकूटकांचा मांडलिक असून त्याचे उत्तराधिकारी महिष्मतीच्या कलचुरींचे सामंत असावेत.[१२] परंतु तशी शक्यता नाही. कारण वाडा शिलालेखात सुकेतुवर्मन याचे वर्णन 'धर्ममहाराज' (सार्वभौम राजा) या बिरुदासहित करण्यात आले आहे. त्याचे उत्तराधिकारीही 'मांडलिकांचे महाराजे' असल्याची नोंद त्यांच्या ताम्रपटातून आढळते.[१३] यावरून कोंकणातील मौर्य दुसऱ्यांचे सामंत नसून स्वतंत्र आणि सार्वभौम शासक होते हे सिद्ध होते.

वाडा शिलालेखात सुकेतुवर्मनचे वर्णन 'भोजानां मौर्य धर्ममहाराज' (म्हणजे भोज आणि मौर्य वंशातील) असे जे करण्यात आले आहे त्यामुळे त्याच्या वंशाविषयी संशोधकांनी विविध मते व्यक्त केली आहेत. पी. आर. श्रीनिवासन यांनी संबंधित मजकुराचे 'भोजानां आर्य धर्ममहाराज' असे वाचन करून सुकेतुवर्मन हा मौर्य नसून भोज राजवंशातील होता, असे मत मांडले आहे.[१४] याउलट के. व्ही. रमेश यांनी 'भोजानां मौर्य धर्ममहाराज' असे वाचन केले असून सुकेतुवर्मन हा मौर्य वंशातील असून भोज हे त्याचे मातुल कुल असल्याचे प्रतिपादन केले आहे.[१५] शिलालेखातील मजकुराच्या वाचनाच्या बाबतीत के. व्ही. रमेश यांचे मत बरोबर दिसते. कारण शंभर वर्षांपूर्वी या शिलालेखातील अक्षरे आजच्यापेक्षा अधिक स्पष्ट असताना स्व. भगवान-

लाल इंद्रजी यांनीही 'आर्य' ऐवजी 'मौर्य' असेच वाचन केले होते. 'मौर्य'[१६] या वंशनामाबरोबर 'भोज' या वंशनामाच्या उल्लेखाविषयी के. व्ही. रमेश यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे तेही तत्कालीन प्रथेस धरून असल्याचे जाणवते. उदा. कर्नाटकातील हळदीपूर येथील ताम्रपटात पल्लव वंशीय गोपालदेव याचे वर्णन 'कैकेयवंशोद्‌भव' असे करण्यात आले आहे, कारण त्याची आई कैकय वंशातील होती.[१७] इ. स. च्या चौथ्या शतकात गोवा आणि कर्नाटकाच्या तटीय प्रांतात भोज वंशाचे राज्य होते.[१८] मौर्य हे त्यांचे उत्तरेकडील शेजारी असल्यामुळे तत्कालीन प्रथेनुसार या दोन राजवंशांत शरीरसंबंध झाले असणे स्वाभाविक होय. विशेषतः भोज राजवंश दक्षिणेतील प्रतिष्ठित राजवंश होता. त्या घराण्याशी वैवाहिक संबंध आल्यामुळे सुकेतुवर्मनला कोंकणातील आपल्या राज्याच्या स्थापनेत भोजांचे सक्रिय साहाय्य लाभले असणेही संभवनीय आहे. त्यामुळे आपल्या कोरीव लेखात सुकेतुवर्मन याने मौर्य या आपल्या वंशनामाबरोबर भोज या नावाचा आवर्जून उल्लेख केला असे दिसते.

गुप्त सम्राट पहिला चंद्रगुप्त याला मगधचे राज्य त्याची राणी लिच्छवी राजकन्या कुमारदेवी हिच्यामुळे प्राप्त झाले, कारण गुप्तांच्या उदयापूर्वी मगधवर लिच्छवींचे शासन होते. याचे संस्मरण म्हणून चंद्रगुप्ताने आपल्या व राणी कुमारदेवीच्या प्रतिमेसह खास नाणे पाडले व त्यावर 'लिच्छव्यः' असे बिरुद कोरविले.[१९] चंद्रगुप्ताच्या राज्यप्राप्तीत त्याच्या लिच्छवी घराण्याशी आलेल्या वैवाहिक संबंधाचा जसा महत्त्वाचा वाटा होता तशीच स्थिती मौर्य सुकेतुवर्मन याची भोजांच्यामुळे झाली असावी आणि याचा गौरव म्हणून त्याने आपल्या मौर्य या वंशनावाबरोबर भोजांचे नावही आपल्या लेखात कोरविले असे दिसते. त्यामुळे सुकेतुवर्मन हा मौर्यवंशीय होता याविषयी तर संशय राहात नाहीच; शिवाय या दोन्ही घराण्यांत वैवाहिक संबंध होते ही माहितीही वाडा शिलालेखावरून मिळते.

वाडा शिलालेखाव्यतिरिक्त सुकेतुवर्मनच्या बाबतीत दुसरा कुठलाही ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे त्याच्या कारकीर्दीविषयी निश्चित माहिती देता येत नाही. परंतु इ. स.च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस त्याने स्थापन केलेले कोंकणातील मौर्यांचे राज्य इ. स. च्या सातव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत म्हणजे दोन शतकांहून अधिक काळपर्यंत अस्तित्वात असल्याची माहिती बदामीचा चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी याच्या इ. स. ६३४–३५ मधील ऐहोळे शिलालेखावरून मिळते.[२०] अगोदरचे सातवाहन आणि नंतरचे शिलाहार यांच्याव्यतिरिक्त एवढ्या प्रदीर्घ काळापर्यंत कोंकणवर मौर्यांशिवाय दुसऱ्या कुठल्याही राजवंशाची सत्ता टिकली नाही. अशा राज्याचा संस्थापक म्हणून सुकेतुवर्मनचे कोंकणच्या मौर्यांच्या इतिहासातील स्थान निश्चितच महत्त्वाचे आहे.

इ. स. च्या तिसऱ्या शतकाच्या प्रारंभी सातवाहन सत्तेचा शेवट होऊन दक्षिणेत आभीर राजवंश सत्तेवर आला. परंतु याच शतकाच्या अखेरीस आभीरांचे सामंत विविध

प्रांतांत स्वतंत्र झाले व आभीरांची सत्ता खानदेशापुरती मर्यादित झाली. पश्चिम किनारपट्टीतील महाराष्ट्र आणि गुजरातच्या सलग प्रदेशावर त्रैकूटक राजवंशाचे आधिपत्य प्रस्थापित झाले. या राजवंशातील पाच राजांनी पुढील एक शतक कोंकण आणि दक्षिण गुजरातवर राज्य केले. चौथ्या शतकाच्या उत्तरार्धात कर्नाटकातील कदंब राज्यसंस्थापक मयूरशर्मन याने पश्चिम महाराष्ट्रावर आक्रमण करून आभीर त्रैकूटक राज्यांना जबरदस्त तडाखा दिला. परिणामतः पुढील काळात त्रैकूटकांची सत्ता खिळखिळी होऊन त्यांच्या सामंतांनी बंडाचे निशाण उभारले. चौथ्या शतकाच्या अखेरीस दक्षिण गुजरातवरील त्रैकूटकांची सत्ता संपुष्टात आल्याची माहिती त्या भागातील सुनावकाला येथील ताम्रपटावरून मिळते. तिथे संगमहिंग नामक सामंत स्वतंत्र झाला. त्याच्याप्रमाणे सुकेतुवर्मन हा उत्तर कोंकणात स्वतंत्र झाला असे दिसते.[२१]

सुकेतुवर्मनचे राज्य महाराष्ट्राच्या किनारपट्टीपुरते मर्यादित होते असे दिसते. वाडा शिलालेखातील ' भोजानां ' या उल्लेखावरून तो भोजांच्या राज्याचा अधिपती असावा अशी शक्यता के. व्ही. रमेश यांनी व्यक्त केली आहे, परंतु ते शक्य दिसत नाही, कारण सुकेतुवर्मनच्या नंतरच्या काळात होऊन गेलेल्या भोजवंशीय कापालिवर्मन या राजाचे त्याच्या ताम्रपटात ' धर्ममहाराज ' या सार्वभौमदर्शक बिरुदासह वर्णन करण्यात आले आहे.[२२] तसेच सुकेतुवर्मनच्या राज्यापेक्षा भोजांचे राज्य विस्तृत असून त्यांचे सामंत शासन चालवीत असल्याची नोंदही त्यांच्या कोरीव लेखात आढळते.[२३] त्यावरून मौर्य आणि भोज हे निदान सुकेतुवर्मनच्या काळात तरी आपापल्या राज्यात सार्वभौम होते असा निष्कर्ष निघतो. उलट सुकेतुवर्मनला राज्यस्थापनेत मदत केल्यामुळे त्याने भोजांचे ज्येष्ठत्व मान्य केल्याचा संकेत वाडा शिलालेखातील ' भोजानां ' या उल्लेखावरून मिळतो.

सुकेतुवर्मनचे उत्तराधिकारी

दोन शतकांहून अधिक काळ कोंकणवर राज्य करणाऱ्या या मौर्यवंशातील सुकेतुवर्मनशिवाय केवळ दोनच राजांची नावे त्यांच्या कोरीव लेखाद्वारे प्रकाशात आली आहेत. ती म्हणजे गोवा ताम्रपटातील चंद्रवर्मन[२४] आणि बांदोडा ताम्रपटातील अनिर्जितवर्मन ही होत.[२५] लेखांच्या अक्षरवाटिकेवरून हे दोन्ही राजे इ. स. च्या सहाव्या शतकात होऊन गेल्याचे संशोधकांचे मत आहे. सुकेतुवर्मन हा इ. स. ४०० च्या सुमारास राज्यावर आल्याची माहिती त्याच्या वाडा शिलालेखावरून मिळते. त्याने २५–३० वर्षे राज्य केले असे मानले तरी त्याच्या आणि गोवा ताम्रपटातील चंद्रवर्मन याच्या काळात जवळ जवळ एक शतकाची तफावत राहते. या कालावधीत किमान तीन शासकांनी राज्य केले असावे, परंतु दुर्दैवाने त्यांच्याविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही.

या संदर्भात दण्डीच्या दशकुमारचरितातील कुमारगुप्त नामक कोंकणच्या राजाचा

उल्लेख विचारात घेणे आवश्यक आहे. कै म. म. वा. वि. मिराशी यांच्या मते कुमार-गुप्त ही ऐतिहासिक व्यक्ती असून कोंकणचा राजा म्हणून आलेल्या त्याच्या उल्लेखा-वरून तो त्रैकूटक राजवंशातील असावा.[२६] कोंकणात त्रैकूटकांची सत्ता होती हे ऐतिहासिक सत्य असले तरी त्या वंशाशी कुमारगुप्ताचा संबंध असण्याची शक्यता नाही. कारण सुमारे एक शतक सलगपणे राज्य केलेल्या पाच त्रैकूटक राजांची माहिती त्यांच्या राज्यकालासह कोरीव लेखाद्वारे प्रकाशात आली आहे. त्यात कुठेही तफावत जाणवत नाही. त्यामुळे कुमारगुप्त हा त्रैकूटक राजवंशातील असणे शक्य नाही.[२७]

मिराशींनी प्रतिपादिल्याप्रमाणे कुमारगुप्त या कोंकणच्या राज्याची ऐतिहासिकता मात्र सत्याधिष्ठित वाटते. कारण दण्डीच्या दशकुमारचरितात भानुवर्मन नामक वन-वासीच्या राजाचे जे वर्णन आले आहे तो वनवासीच्या कदंब राजवंशात होऊन गेल्याचा पुरावा त्यांच्या कोरीव लेखात आढळतो.[२८] त्या आधारे कुमारगुप्त या कोंकणच्या राजाची ऐतिहासिकता मानायची झाल्यास त्याला कोंकणच्या मौर्य राजवंशातील सुकेतु-वर्मनचा नजीकचा उत्तराधिकारी मानावा लागेल. या अंदाजास पुष्टी देणारा पुरावा मौर्य अनिर्जितवर्मन याच्या बांदोडा ताम्रपटात मिळतो. हा ताम्रपट जारी केला तेव्हा राजाचा मुक्काम ज्या ठिकाणी होता त्याचे नाव 'कुमारद्वीप' असे होते.[२९] स्थलनामांना प्रमुख राजांची नावे जोडण्याची प्रथा प्राचीन भारतात रूढ होती. उदा. प्रवरपूर ही वाकाटक प्रवरसेनाची राजधानी आणि सध्याचे वर्धा जिल्ह्यातील पवनार[३०] कुमारद्वीप आणि कुमारगुप्त यांच्यातील अन्योन्य संबंध तसे असण्याची शक्यता आहे. तसे असल्यास कुमारगुप्त हा मौर्य सुकेतुवर्मन या नजीकचा उत्तराधिकारी होता असेच मानावे लागेल. तसेच भौगोलिक घटकाशी त्याचे नाव जोडले गेले हे सत्य असल्यास या वंशातील तो एक महत्त्वाचा राजा होता असे म्हणावे लागेल.

वाकाटक हरिषेण याच्या अजिंठा शिलालेखानुसार त्याने इ. स. च्या पाचव्या शतकाच्या अखेरीस त्रिकूट, लाट इत्यादी पश्चिम किनारपट्टीतील राज्यांवर आक्रमण केले होते.[३१] यातील त्रिकूट म्हणजे महाराष्ट्राच्या किनारपट्टीतील मौर्यांचे राज्य होय.[३२] या काळातील कोंकणातील मौर्य शासक बहुधा दुर्बल असावा. परंतु हे आक्रमण म्हणजे केवळ एक मोहीम होती, असे दिसते. कारण हरिषेणानंतर वाकाटकांचे राज्य संपुष्टात आले. याउलट कोंकणात मौर्यांची सत्ता आणखी एक शतकाहून अधिक काळ टिकली हे पुढील काळातील कोरीव लेखावरून स्पष्ट होते.

चंद्रवर्मन मौर्य :

सुकेतुवर्मनच्या उत्तराधिकाऱ्यांतील चंद्रवर्मन हा एक महत्त्वाचा शासक होता. गोव्यात उपलब्ध झालेल्या शिवपुर किंवा गोवा ताम्रपटावरून त्याची माहिती प्रकाशात आली.[३३] या ताम्रपटाचे प्रथम संपादक कै. मो. गं. दीक्षित यांच्या वाचनात 'मौर्य'

हे वंशनाम आले नव्हते. त्यामुळे त्यांनी चंद्रवर्मन हा पूर्वी गोव्यात होऊन गेलेल्या कदंब राजवंशातील असावा असे मत व्यक्त केले होते. परंतु नंतरच्या संशोधकांनी त्यातील 'मौर्य' हे वंशनाम वाचल्यामुळे चंद्रवर्मन हा कोकणच्या मौर्य राजवंशातील होता हे स्पष्ट झाले आहे.[३४] गोवा ताम्रपटात चंद्रवर्मन याच्या दुसऱ्या राज्यवर्षाची नोंद आहे; परंतु निश्चित काळाची नोंद नाही. अक्षरवाटिकेच्या आधारे तो ५ व्या ६ व्या शतकातील असावा असे मत व्यक्त करण्यात आले आहे. त्यावरून तो इ. स. च्या सहाव्या शतकाच्या प्रथमार्धात होऊन गेला असे म्हणता येईल. या काळातील दक्षिणेतील राजकीय स्थिती मौर्यांना अनुकूल होती. विदर्भ–मराठवाड्यातील वाकाटकांची सत्ता संपुष्टात आली होती. महिष्मतीच्या कलचुरींचा आणि बदामीच्या चालुक्यांचा उदयही झालेला नव्हता. मौर्यांचे त्या वेळचे समकालीन म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील मानपूरचे राष्ट्रकूट, कर्नाटक गोवा किनारपट्टीतील भोज, आणि पश्चिम कर्नाटकातील वनवासीचे कदंब.

वरील समकालीनांपैकी वनवासीचे कदंब सर्वांत बलाढ्य होते. परंतु त्यांच्या आणि मौर्यांच्या राज्यात भोज आणि मानपूरचे राष्ट्रकूट असल्यामुळे कदंबांच्या विस्तारवादाची झळ मौर्यांना लागणे शक्य नव्हते. कदंबांनी भोजांचा हलशी (जि. बेळगाव) सभोवतालचा प्रदेश जिंकून त्यांना गोवा-कारवार भागात ढकलल्याची माहिती त्यांच्या कोरीव लेखावरून मिळते. भोज–कदंबांच्या या संघर्षात मौर्यांनी भोजांना मदतीचा हात दिल्यामुळे गोवा–कारवार प्रांत त्यांना आपल्या ताब्यात ठेवता आला व कदंबांच्या भीतीने भोजांनी मौर्यांचे आधिपत्य स्वीकारले असे या दोन्ही राजवंशांच्या कोरीव लेखावरून दिसते.[३५]

चंद्रवर्मन मौर्यांच्या गोवा ताम्रपटात शिवपुर येथील बौद्धविहारास राजाद्वारे भूमिदान केल्याची नोंद आहे. या शिवपुराचा गोव्यात शोध लागला नाही आणि ते गोव्यात असण्याची शक्यताही नाही, कारण प्राचीन काळात गोव्यात बौद्धविहार असल्याची माहिती नाही. या उलट भोज कापालिवर्मन याच्या अर्गा ताम्रपटातील दान दिलेले गाव आणि विषय मुख्यालय शिवपुर असे होते,[३६] तसेच भोज आशंकिताच्या हिरेगुट्टी ताम्रपटात कारवारजवळील एका महाविहाराला दिलेल्या दानाची नोंद आहे.[३७] यावरून शिवपुर येथील बौद्धविहार कारवार परिसरात होता हे स्पष्ट होते. चंद्रवर्मन याचे भोजांच्या प्रदेशातील भूमिदान त्याचे भोजावरील सार्वभौमत्वाचे निदर्शक मानावे लागेल. त्याशिवाय चंद्रवर्मनचा उत्तराधिकारी अनिर्जितवर्मन याच्या बांदोडा ताम्रपटातील भूमिदान 'द्वादश ग्राम देशातील' असल्याची त्यात नोंद आहे. प्रस्तुत ताम्रपटाच्या संपादकांनी याचा अर्थ 'बारा देशातील बारा गावात' असा घेतला तो बरोबर नाही.[३८] द्वादशग्राम हे भौगोलिक नाव असून त्याची निश्चिती उत्तर गोव्यातील बारदेश भागाशी केली जाऊ शकते. हे दानही भोजांच्या प्रदेशातीलच होते. भोज हे मौर्यांचे मांडलिक होते याचा हा आणखी एक पुरावा. चंद्रवर्मन आणि अनिर्जितवर्मन यांचा भोज वंशातील समकालीन

राजा पृथ्वीमल्लवर्मन हा होता. गोव्यात आणि कोल्हापूर इथे त्यांचे एकूण तीन ताम्रपट प्राप्त झाले आहेत. परंतु त्यात त्याच्या नावाबरोबर कुठलेही राजबिरुद नाही. यावरून वरील विधानास आणखी पुष्टी मिळते.[३९]

अशा प्रकारे चंद्रवर्मन याच्या काळात उत्तरेत महाराष्ट्र–गुजरात सरहद्दीवरील संजान (जि. बलसाड, गुजरात राज्य) पासून दक्षिणेस कारवार (कर्नाटक राज्य) पर्यंतचा संपूर्ण पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश मौर्यांच्या राज्यात समाविष्ट होता. त्यापैकी महाराष्ट्रातील कोंकणपट्टी मौर्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात असून गोवा–कारवार किनारपट्टीत भोजांचे शासन असून त्यावरही मौर्यांचे अप्रत्यक्ष नियंत्रण होते. दक्षिण महाराष्ट्रातील मानपूरच्या राष्ट्रकूटाकडून मौर्यांना भीती नव्हती, कारण कदंबांच्या विस्तारवादातून आपल्या प्रदेशाचे रक्षण करण्यावर त्यांना लक्ष केंद्रित करावे लागत होते.[४०] या परिस्थितीमुळे चंद्रवर्मनचा राज्यकाल मौर्य राज्याच्या दृष्टीने सर्वांत उत्कृष्ट होता असे दिसते.

मौर्यांची राजधानी पुरी म्हणजे आजचे मुंबई जवळील घारापुरी किंवा एलिफंटा बेट. बदामीच्या चालुक्यांच्या आणि शिलाहारांच्या कोरीव लेखात तिचे चंद्रपुरी किंवा चंद्रपूर असे वर्णन आढळते. पुरीला विविध राजवटींतील प्रमुख व्यक्तींच्या नावावरून विविध पूर्वपदे लावण्यात आली होती. ' चंद्र ' हे पूर्वपद चंद्रवर्मन मौर्याच्या नावावरून लावले गेले असावे.[४१] कोरीव लेखाशिवाय आठव्या नवव्या शतकातील अरब खलाशांच्या वृत्तान्तातही चंद्रपूर म्हणजे कोंकणातील एक अतिशय समृद्ध बंदर आणि व्यापारी पेठ म्हणून नमूद करण्यात आले आहे. दुसऱ्या पुलकेशीच्या ऐहोळे शिलालेखात तर ' अपर जलधेर्लक्ष्मी ' (पश्चिम सागरातील लक्ष्मी) असे पुरीचे वर्णन करण्यात आले आहे.[४२]

मौर्य अनिर्जितवर्मन

गोव्यातील बांदोडा इथे उपलब्ध झालेल्या ताम्रपटामुळे अनिर्जितवर्मनची इतिहासकारांना ओळख झाली.[४३] या ताम्रशासनातही कालोल्लेख नाही. परंतु अक्षरवाटिकेवरून तो चंद्रवर्मनच्या गोवा ताम्रपटानंतरचा होय हे स्पष्ट होते. तो चंद्रवर्मनचा उत्तराधिकारी असून सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला असावा.

बांदोडा ताम्रपटात अनिर्जितवर्मनच्या २९ व्या राज्यवर्षाची नोंद आहे. यावरून त्याने किमान तीन दशके राज्य केले हे सिद्ध होते. अनिर्जितवर्मनची बहुतेक कारकीर्द बदामीच्या चालुक्यांशी लढण्यात गेली असे दिसते. बदामीच्या चालुक्यांच्या कोरीव लेखातील वर्णनावरून पहिला कीर्तिवर्मन (इ. स. ५६७ ते ५९७), मंगलेश (इ. स. ५९८ ते ६१०) आणि दुसरा पुलकेशी (इ. स. ६११ ते ६४२) अशा सलग तीन पिढ्यांतील राजांनी मौर्यांचे राज्य जिंकण्याचा प्रयत्न केला होता. शेवटी दुसऱ्या पुलकेशीला मौर्य सत्ता नामशेष करण्यात यश आले ही माहिती त्याच्या इ. स. ६३४–३५ मधील ऐहोळे शिलालेखावरून मिळते.[४४] चालुक्य-मौर्यांतील हा संघर्ष इ. स. च्या

सहाव्या शतकाच्या आठव्या दशकात सुरू होऊन सातव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात संपला. म्हणजे जवळ जवळ अर्धशतक हा लढा चालू होता. या संघर्षात कीर्तिवर्मन आणि मंगलेश यांच्याशी लढा देणारा मौर्य राजा अनिर्जितवर्मन हाच असला पाहिजे. त्यात त्याला भोज पृथ्वीमल्लवर्मन याचे साहाय्य लाभले असे दिसते. याला पुरावा म्हणजे अनिर्जितवर्मनचा बांदोडा ताम्रपट आणि भोज पृथ्वीमल्लवर्मन याचे तिन्ही ताम्रपट विजयी शिबिरातून जारी करण्यात आले आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे चालुक्यांच्या ताम्रपटात त्यांनी पराभूत केलेल्या शत्रूंची नावे असलेला जो श्लोक आहे त्यात मौर्यांचा पाडाव केल्याच्या संदर्भात 'निर्जित मौर्य' असा प्रयोग केलेला आहे. अनिर्जितवर्मन याच्या नावावरील ती कोटि आहे हे सहज स्पष्ट होते. तसेच त्याच श्लोकात 'पृथु' असे दुसऱ्या शत्रूचे नाव आले आहे.[४५] तो कोण होता हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. तो पृथ्वीमल्ल वर्मन हा भोज राजाच असावा. अनिर्जित वर्मन आणि पृथ्वीमल्ल वर्मन या दोघांनीही तीन दशकांहून अधिक काळ राज्य केले. त्यावरून कीर्तिवर्मन आणि मंगलेश यांच्याविरुद्ध लढणारा मौर्य राजा अनिर्जितवर्मन हाच असला पाहिजे.

ऐहोळे शिलालेखात चालुक्य कीर्तिवर्मन पहिला याचे वर्णन 'मौर्यांना कालरात्री-समान' असे करण्यात आले आहे. यावरून त्याने मौर्यांच्या राज्यावर आक्रमण करून त्यांचा प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न केला होता हे स्पष्ट होते. परन्तु कीर्तिवर्मनच्या काळात तरी चालुक्यांना मौर्यांनी आपला प्रदेश मिळू दिला नाही. अनिर्जितवर्मनच्या प्रखर प्रतिकारामुळेच हे घडले.

कीर्तिवर्मनचा उत्तराधिकारी चालुक्य मंगलेश याने मौर्यांच्या विरुद्धची मोहीम आणखी प्रखर केली. कोंकण हा सागरी प्रदेश असल्यामुळे त्याने आरमारी छावण्यांवर अधिक भर दिला. रेवतीद्वीप (चौल आणि मुरुड जंजिरा) जिंकण्यासाठी मंगलेशाने सैन्य पाठविण्यासाठी नौकासेतु बांधल्याचे वर्णन चालुक्यांच्या कोरीव लेखात आढळते.[४६] या मोहिमेत मंगलेशास यश लाभले. रेवतीद्वीपासहित चार प्रांतांवर त्याने आपला अंमल बसविला आणि नवीन जिंकलेल्या या प्रदेशाच्या प्रशासनासाठी ध्रुवराज इंद्रवर्मन बप्पूर या आपल्या नातेवाइकांची नियुक्ती केल्याची माहिती इंद्रवर्मनच्या गोवा ताम्रपटावरून मिळते.[४७] यावरून मंगलेशाने कारवार-गोव्यापासून चौलमुरुड जंजिऱ्यापर्यंतचा कोकणचा प्रदेश आपल्या अंकित केला हे स्पष्ट होते. त्यामुळे मौर्यांच्या ताब्यात रायगड जिल्ह्याचा उर्वरित भाग आणि ठाणे-मुंबई एवढाच प्रदेश उरला. अनिर्जितवर्मन बहुधा या लढाईत धारातीर्थी पडला असावा असे दिसते, कारण त्यानंतर चालुक्य पुलकेशीने पुरीवर जो हल्ला केला त्या वेळी अनिर्जितवर्मनऐवजी कुणी दुसरा मौर्य राजा होता. तो अर्थातच अनिर्जितवर्मनचा उत्तराधिकारी असला पाहिजे.

अशा प्रकारे अनिर्जितवर्मन याने बदामीच्या चालुक्याशी प्रखर आणि प्रदीर्घ संघर्ष करून आपले राज्य टिकविण्याचा प्रयत्न केला. या कामी त्याने आपल्या शेजारच्या

प्रमुखांची मदत घेतली व त्या बदल्यात त्यांना संरक्षण दिले. यापैकी भोज पृथ्वीमल्ल-वर्मन याचा उल्लेख वर आला आहेच. त्याशिवाय मानपूरच्या राष्ट्रकूटांनाही अनिर्जित-वर्मन याने मदतीचा हात दिल्याची माहिती त्याच्या बांदोडा ताम्रपटावरून मिळते. बांदोडा ताम्रपटाद्वारे अनिर्जितवर्मन याने जी भूमी आणि घरे दान दिली होती ती पूर्वी कुणा राष्ट्रकूट प्रमुखाच्या मालकीची होती अशी त्यात नोंद आहे.[४८] यावरून शक्यता अशी दिसते की, इ. स. च्या सहाव्या शतकाच्या मध्यास बदामीच्या चालुक्यांनी अगोदर मालपूरच्या राष्ट्रकूटांचे राज्य जिंकले. परिणामतः काही पराभूत राष्ट्रकूट-प्रमुखांनी कोंकणातील मौर्यांच्या प्रदेशात आश्रय घेतला. या किनारपट्टीतील राष्ट्रकूटांचे अस्तित्व इ. स. च्या आठव्या शतकाच्या मध्यापर्यंत असल्याची माहिती बदामीचा चालुक्यराजा दुसरा विक्रमादित्य याच्या नखण ताम्रपटावरून मिळते. त्यात राष्ट्रकूट शिवराजपुत्र गोविंदराज हा दक्षिण कोंकणात चालुक्यांचा प्रांताधिकारी असल्याची नोंद आढळते.[४९]

अनिर्जितवर्मन हा कोंकणच्या मौर्य राजवंशातील शेवटचा बलाढ्य शासक होता असे म्हणावे लागेल. बदामीच्या चालुक्यासारख्या आपल्याहून अधिक शक्तिशाली शत्रूशी त्याने जी चिवट आणि प्रदीर्घ झुंज दिली ती नक्कीच विशेष मानावी लागेल. त्याशिवाय चौल-जंजिऱ्याजवळ मंगलेशाच्या सैन्यास रोखून त्याने पुरीचे रक्षण केले आणि मौर्य सत्तेस आणखी काही काळ जीवदान दिले.

अनिर्जितवर्मनचे उत्तराधिकारी

इ. स. ६३४-३५ मधील ऐहोळे शिलालेखातील वर्णनानुसार दुसऱ्या पुलकेशीने कोंकण विजयाचे उर्वरित काम पूर्ण केले. पुरी आणि भोवतालचा प्रदेश जिंकण्यासाठी त्याने शेकडो युद्धनौकांचा वापर केला आणि शेवटी मौर्यांच्या या राजधानीवर आपला ध्वज फडकावला अशी माहिती ऐहोळे शिलालेखात आढळते.[५०]

पुलकेशीचा समकालीन मौर्य राजा कोण होता याची निश्चित माहिती आढळत नाही. परंतु तो अनिर्जितवर्मनचा उत्तराधिकारी असावा असे पुलकेशीचा भाऊ चालुक्य बुद्धवर्ष याच्या संजान ताम्रपटातील वर्णनावरून दिसते. संजान ताम्रपटातील माहितीवरून बुद्धवर्ष हा उत्तर कोंकणचा प्रांताधिकारी असून पिनुक (पेण, जि. रायगड) इथे त्याचे मुख्यालय होते. प्रस्तुत ताम्रपटाद्वारे दान दिलेली गावेही त्याच परिसरातील होती.[५१] बुद्धवर्षाचा हा संजान ताम्रपट चालुक्य पुलकेशीचा उत्तराधिकारी पहिल्या विक्रमादित्याच्या काळातला असला तरी बुद्धवर्षाची कोंकणवरील नियुक्ती पुलकेशीच्या काळातील असली पाहिजे, कारण बुद्धवर्ष हा पुलकेशीचा भाऊ होता. ऐहोळे शिलालेखात वर्णिलेल्या पुरी विजयानंतर ही नेमणूक झाली असणार हे उघड आहे. त्यावरून पुलकेशीच्या मौर्याविरुद्धच्या मोहिमेत बुद्धवर्षाचा सहभाग होता हेही

ओघाने आलेच.

संजान ताम्रपटात बुद्धवर्षाची जी प्रशस्ती देण्यात आली आहे त्या संदर्भात त्याने ' अचत्यनगण ' नामक शत्रूच्या चार सुळे असलेल्या हत्तींना ठार केल्याचे वर्णन आले आहे. ताम्रपटाचे संपादक स्टेनकॉनो यांनी ' अचत्यनगण ' म्हणजे ' अचत्यायन नामक शत्रूची आघाडी ' असा लावला आहे. त्यावरून काहीच अर्थबोध होत नाही. हे बहुधा बुद्धवर्षाने पराभूत केलेल्या शत्रूचे नाव असले पाहिजे; कारण 'गण' हे उपपद त्या काळी राजवंशातील व्यक्तिनामात आढळते. उदा. दहगण त्रैकूटक, शंकरगण कलचुरी इत्यादी. त्या आधारे ते नाव ' अच्युतगण ' असून त्वष्ट्याच्या चुकीने ताम्रपटात 'अचत्यनगण' असे कोरले गेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. मौर्यांकडून उत्तर कोंकण जिंकल्यानंतर पुलकेशीने त्या प्रदेशात बुद्धवर्षाची नेमणूक केली होती; या पार्श्वभूमीवर अच्युतगण हा अनिर्जितवर्मनचा उत्तराधिकारी असून पुलकेशी आणि बुद्धवर्षाने पराभूत केलेला शेवटचा मौर्य राजा होता असा निष्कर्ष निघतो.

उत्तर भारतातील मौर्य

सातव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत म्हणजे जवळजवळ पाचशे वर्षे मौर्य घराण्यातील व्यक्तींच्या दक्षिणेतील हालचाली दाखविणारा पुरावा आजवर उपलब्ध झालेला नाही. याउलट नेमक्या सातव्या शतकापासून पुढील काळात उत्तर भारतात मौर्य शासकांचे कोरीव लेख आढळतात उत्तर प्रदेशातील मथुरा इथे दिंडिराज ऊर्फ कर्कनामक मौर्य राजाचा इ. स. च्या सातव्या किंवा आठव्या शतकातील एक शिलालेख कै. डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी प्रसिद्ध केला आहे. प्रस्तुत आलेखात या राजघराण्याची वंशावळ पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.[५२]

कृष्णराज
|
चंद्रगुप्त
|
आर्यराज
|
दिंडिराज ऊर्फ कर्कराज

वरीलपैकी शेवटच्या तीन शासकांच्या कारकीर्दी सलग होत्या. कृष्णराज आणि चंद्रगुप्त यांचे नाते काय होते ते स्पष्ट नाही. तसेच या वंशाचे मूळ कोणते हेही स्पष्ट नाही. तथापि ते मगधच्या आणि पर्यायाने कोंकणच्या मौर्यांचे वंशज असण्याची शक्यता सरकार यांनी व्यक्त केली आहे.

तशी शक्यता गृहीत धरण्यास बराच वाव आहे, कारण दोन्हींचे वंशनाम तर एक आहेच; शिवाय कोंकणचे मौर्य आणि मथुरेचे मौर्य यांच्या राजमुद्रेवरील लांछन एकच (वराह) आहे. विशेष म्हणजे मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्ताचे नावही या दोन्ही वंशावळींत आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पुष्यमित्र शुंगानंतर एक हजार वर्षे मौर्य राजवंशाचे अस्तित्व दाखविणारा पुरावा उत्तरेत आढळत नाही, आणि जेव्हा तो आढळतो त्यापूर्वी काही काळ चालुक्य पुलकेशीने कोंकणच्या मौर्यांचे राज्य पूर्णपणे जिंकलेले असते. या सर्व घटनांमागे ऐतिहासिक कार्यकारणभाव असावा.

इ. स. च्या सातव्या शतकात दक्षिण आणि उत्तर भारतात एकाच वेळी दोन महत्त्वाकांक्षी समबल राजपुरुष होऊन गेले. ते म्हणजे दक्षिणेतील बदामीचा चालुक्य दुसरा पुलकेशी आणि उत्तरेतील हर्षवर्धन. हर्षाला नर्मदेच्या पलीकडे रोखण्यात पुलकेशी यशस्वी झाला होता. मौर्यांचे कोंकणातील राज्यही पुलकेशीने संपुष्टात आणले होते. अशा परिस्थितीत शत्रूचा शत्रू म्हणजे आपला मित्र समजून कोंकणच्या मौर्यांच्या वंशजांनी हर्षाच्या राज्यात स्थलांतर केले व हर्षाने त्यांचा मथुरा किंवा उत्तरेत इतरत्र पुनर्वास केला असणे असंभवनीय नाही. विशेष म्हणजे हर्ष-पुलकेशीच्या काळात भारतभर भ्रमण केलेला चिनी प्रवाशी ह्यूएन त्संग याने आपल्या वृत्तान्तात वरील विधानास पोषक अशी नोंद करून ठेवली आहे. तीनुसार सम्राट अशोकाचा शेवटचा वंशज असलेल्या पूर्णवर्मन नामक मगधच्या राजाने गौडनरेश शशांक याने उद्ध्वस्त केलेल्या बोधिवृक्षाचे पुनरारोपण केले.[५३]

मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर त्यांच्या नंतरच्या शुंग व कण्व राजवंशांना पाटलिपुत्राहून माळव्यातील विदिशा आणि गंगा-यमुना खोऱ्यातील कौशांबी इथे स्थलांतर करावे लागले होते. अशा परिस्थितीत मौर्यांच्या वंशजांचे मगधात पुढील काळातील अस्तित्व शक्यच नाही. त्यावरून पूर्णवर्मन हा हर्षाच्या आश्रयास आलेला कोंकणच्या मौर्यांचा वंशज असण्याचीच अधिक शक्यता आहे. तो अशोकाचा वंशज असल्यामुळे आणि हर्ष हा बौद्ध धर्माचा आश्रयदाता असल्यामुळे त्याने पूर्णवर्मन यास त्याचे मगधचे पैतृक राज्य दिले असावे. हर्षानंतर कनोजच्या राज्यात पुन्हा बंडाळी सुरू झाली. त्यामुळे पूर्णवर्मनच्या वंशजांनी मथुरेकडे स्थलांतर केले असावे. हर्षानंतर कनोजच्या स्वामित्वासाठी जो संघर्ष सुरू झाला त्यात मथुरा शिलालेखात उल्लेखिलेल्या मौर्य दिंडिराजाने भाग घेतला होता. त्याने कनोजवर आक्रमण करून ते नगर भस्मसात केले व त्यामुळे त्याला कर्क (अग्नि) अशी उपाधी प्राप्त झाल्याची माहिती मथुरा शिलालेखात आढळते.

राजस्थानातील झालरापाटण येथील इ. स. ६९० मधील एका शिलालेखात मौर्य वंशीय दुर्गगण नामक राजाची माहिती आढळते. तो मथुरेच्या मौर्यांच्यापैकी असला पाहिजे. याच प्रांतात आठव्या शतकाच्या मध्यास धवल मौर्य याचे शासन असल्याची

नोंद तिथे उपलब्ध झालेल्या कोरीव लेखात आलेली आहे. तो दिंडिराजाचा उत्तराधिकारी असावा असा डॉ. सरकार यांचा अंदाज आहे.[५५]

वरील धवल मौर्यांचे वंशज राजस्थान-सौराष्ट्र प्रदेशात शासन करीत असताना पश्चिम भारतावर अरबांचे आक्रमण झाले. त्याची झळ बसलेल्या शासकास मौर्य असल्याची माहिती गुजरातमधील चालुक्यांच्या कोरीव लेखात आढळते.[५६] कदाचित त्याचा परिणाम म्हणून सौराष्ट्रातील मौर्यांना देशत्याग करावा लागला व त्यांनी महाराष्ट्रातील खानदेशात स्थलांतर केले असावे. जळगाव जिल्ह्यातील वाघळी येथील शिलालेखात ज्याची माहिती आली आहे तो गोविंद मौर्य या स्थलांतरित शाखेचा वंशज होता असे दिसते. अकराव्या शतकातील यादवांच्या या मांडलिकाने सौराष्ट्रातील वलभीच्या मौर्य वंशातील आपल्या १८ पूर्वजांची नावे असलेली दीर्घ वंशावळ या शिलालेखात दिली आहे.[५७]

गोविंद मौर्यांच्या वंशजांनी मुस्लिम राजवटीत महाराष्ट्रात जहागिरी मिळविल्या असे दिसते. सतराव्या शतकात सातारा जिल्ह्यातील जावळी येथील आदिलशाही सरंजामदार चंद्रराव मोरे हे त्यापैकी असावेत. शिवकालापूर्वी सात पिढ्या या घराण्याची सत्ता जावळीवर होती. विशेष म्हणजे 'चंद्रराव मोरे' हे एका व्यक्तीचे नाव नसून त्या घराण्याचे नाव बनले होते. सतराव्या शतकाच्या मध्यास शिवाजी महाराजांनी जावळीच्या हनुमंतराव चंद्रराव मोऱ्यांचा शेवट केला.[५८] चंद्रगुप्त मौर्य या संस्थापकाच्या नावाचा प्रभाव या राजवंशावर अशा प्रकारे शेवटपर्यंत कायम होता.

सातवाहनांच्या नजीकच्या उत्तराधिकाऱ्यांत दक्षिणेच्या पश्चिम किनारपट्टीवर सर्वांत जास्त काळ राज्य करणारे म्हणून कोंकणच्या मौर्यांचा उल्लेख करावा लागेल. जवळ जवळ दोन शतके राज्य करणाऱ्या या राजवंशाचा कोंकणच्या प्राचीन संस्कृतीवर प्रभाव पडला नसता तरच नवल !

इ. स. ४०० मधील सुकेतुवर्मन मौर्यांच्या वाडा शिलालेखात वाटक (वाडा, जि. ठाणे) इथे राजाचा तलवार सिंहदत्त याने कोटेश्वर, वसिष्ठेश्वर आणि सिद्धेश्वर इ. देवालये बांधल्याची नोंद आहे. प्रस्तुत शिलालेखात ब्रह्मा, विष्णु आणि हर (शिव) या देवत्रयीचाही उल्लेख आहे. देवालयाच्या परिसरात तटाक किंवा तलावही बांधले होते. तसेच या देवालयांच्या नित्य-नैमित्तिक पूजा-अर्चेसाठी वाडा परिसरातील भूमी दान देण्यात आली होती. विशेष म्हणजे हिंदू देवालये बांधल्याचा दक्षिणेतील हा सर्वांत प्राचीन पुराभिलेखीय उल्लेख असल्यामुळे प्राचीन भारतीय स्थापत्याच्या इतिहासाच्या दृष्टीने त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वरीलपैकी तलावाचे अवशेष आजही वाडा इथे आहेत. देवालयांपैकी बहुतेक काळाच्या उदरात गडप झाली आहेत. खंडेश्वर नामक एक नंतरच्या काळातील मंदिर आजही वाडा इथे आहे. कदाचित वरीलपैकी एखाद्या मंदिराचे ते नूतनीकरण केलेले मंदिर असू शकेल.[५९]

अनिर्जितवर्मन याच्या बांदोडा ताम्रपटातील भूमिदान हस्त्यार्य नामक सामवेदी ब्राह्मणास दिलेले होते. भूमीचे वर्णन ' खज्जन ' (मराठी खाजण) असे करण्यात आले आहे. खांदून तयार केलेल्या भाताच्या खाचराचा हा बहुधा सर्वांत प्राचीन पुराभिलेखीय उल्लेख असावा.

चंद्रवर्मनच्या गोवा ताम्रपटातील भूमिदान शिवपुर येथील महाविहारास दिलेले होते. हा महाविहार बौद्ध किंवा जैनही असू शकेल. यावरून प्राचीन भारतातील तिन्ही प्रमुख धर्मपंथांना राजाश्रय देण्याची परंपरा इतर राजवंशांप्रमाणे मौर्यांनीही कोंकणपुरती चालू ठेवली होती. कोंकणातील कोल, कुडा, महाडपाले आणि कान्हेरी येथील काही विहार आणि चैत्य मौर्यांच्या काळात कोरविले गेले असले पाहिजेत.

कोंकणच्या मौर्यांची राजधानी पुरी म्हणजे आजचे मुंबईजवळील घारापुरी किंवा एलिफंटा बेट. या बेटावरही लेणी आहेत. त्यातील लेणी क्र. ५ आणि ६ या मुख्य लेण्याहून (क्र. १) प्राचीन आहेत, कारण त्यांच्याजवळ बौद्ध स्तूपाचे अवशेष सापडले आहेत. बेटाच्या पूर्वेकडील बाजूस प्रस्तरात कोरलेला हत्ती होता. या हत्तीवरूनच पोर्तुगीजांनी या बेटाचे एलिफंटा असे नामकरण केले. हा हत्ती सध्या मुंबई येथील जिजामाता[१०] (पूर्वीचा राणीचा बाग) उद्यानातील भाऊ दाजी लाड संग्रहालयात आहे. विशेष म्हणजे दक्षिण कोंकणातील रेडी (चालुक्यकालीन शिलालेखातील इरिडिगे) येथील किल्ल्यातही असाच कोरलेला हत्ती आहे. हे कोरीव हत्ती बघून अशोककालीन ओरिसातील धौली येथील हत्तीची आठवण येते. हे सर्व अवशेष कोंकणच्या मौर्यांच्या स्थापत्याचे होत.

कोंकणच्या मौर्यांची दुसरी महत्त्वाची कामगिरी म्हणजे बंदर आणि आरमाराचा विकास. बदामीच्या चालुक्यांना कोंकण जिंकण्यासाठी तीन पिढ्या आणि पन्नास वर्षांचा अवधी लागला यावरून मौर्यांचे हे कोंकण किनारपट्टीतील छोटेसे राज्य असूनही त्यांचे आरमार कसे सक्षम होते याची प्रचीती येते. संजान, सोपारा, कल्याण, चौल, आणि रेडी ही राज्यातील प्रमुख बंदरे असून त्यामार्फत विदेशी व्यापार चालत असे. बंदरांचे संरक्षण करण्यासाठी कशा प्रकारे सुसज्ज आरमार ठेवले जात असे याचा पुरावा चालुक्य मंगलेशाच्या रेवतीद्वीप (चौल-जंजिरा) विजय वर्णनावरून मिळतो. पुरी हे राजधानीचे शहर व व्यापारी बंदर असून मुख्य भूभागापासून तुटक असल्यामुळे त्याच्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्या काळी पुरीचा संपर्क उरण न्हावा-शेवा परिसरातील समुद्रतीराद्वारे होता. आजच्या न्हावा-शेवा बंदराच्या जागी समगिरी-पट्टण नामक बंदर बांधण्यात आल्याची माहिती चालुक्यांच्या कोरीव लेखावरून मिळते[११]. याच जागी आजचे जवाहरलाल नेहरू बंदर हे मुंबईला पर्यायी म्हणून नवीन बंदर अस्तित्वात आले आहे. तेथून पुरी बेटाशी संपर्क असे पुरी बेटावर पूर्वेकडील बाजूस बंदर होते. मौर्यांनी ते बांधले असल्याची खूण आजही त्याच्या मोराबंदर या नावावरून पटते.

संदर्भ टीपा

१. R. C. Majumdar (ed.) The Age of Imperial Unity, Bharatiya Vidyabhavan, Bombay, 1968, pp. 54–94.
२. D. C. Sircar, Successors of The Satavahanas in the Lower Deccan, pp. 11-12.
३. The Age of Imperial Unity, of. cit., p. 61.
४. K. V. Ramesh, Chalukyas of Vatapi, Sundeep Prakashan, Delhi, 1987, pp. 33–34.
५. B. C. Law " Early History of Surashtra ", Journal of Indian History, Vol. XLIV, Part II, August 1966, Sr. No. 131, pp. 339-347.
६. H. Kielhorn, Epigraphia Indica, 1894, Vol. II, pp. 221–228.
७ K. D Bajpai, Journal of the Epigraphical Society of India, 1979, p. 63.
८. B. C. Law, Ancient and Medieval Indian Kshatriya Tribes, p. 153.
९. P. V. Parabrahma Shastri, Ajaya–Sri, Recent Studies in Indology, Sundeep Prakashan Delhi, 1989, p. 71.
१०. K. V. Ramesh, Epigraphia Indica, Vol. XL, Part II, pp. 51–54.
११. हरिहर ठोसर, संशोधक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, डिसेंबर १९८९, पृ.२-२२
१२. वा. वि. मिराशी, संशोधन मुक्तावली, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, सर १०, पृ १४४.
१३. M. G. Dikshit, New Indian Antiquary, Vol. IV, pp. 181–184.
१४. P. R. Shrinivasan, Journal of Indian History, Vol. LVII–VIII, p. 40.
१५. K. V. Ramesh, E. I. XL, op. cit.
१६. Bhagwanlal Indresi, Gazetteer of the Bombay Presi dency, Vol XIV, Thane District, p. 372.

१७. Haldipur Grant, Epigraphia Indica, Vol. XXI, p. 173.
१८. G. S. Gai, Indian Historical Quarterly, Vol. XXXVII, Dec. 1961, pp. 240-242.
१९. R. C. Majumdar and A. S. Altekar, The Vakataka Gupta Age, Motilal Banarasidas, Delhi, 1967, p. 302.
२०. Epigraphia Indica, Vol. VI, pp. 1-12.
२१. हरिहर ठोसर, संशोधक, डिसेंबर १९८९, उपरोक्त.
२२. A. M. Annigeri, Epigraphia Indica, Vol. XXXI, pp. 234-36.
२३. P. B. Desai, Epigraphia Indica, Vol. XXVIII, pp. 70-75.
२४. M. G. Dikshit, New Indian Antiquary, op. cit.
२५. G. S. Gai, Epigraphica Indica, Vol. XXXIII, pp 293-96.
२६. V. V. Mirashi, Studies in Indology, Vidarbha Samshodhan Mandal, Nagpur, Vol. I, pp. 165-77.
२७. हरिहर ठोसर, संशोधक, डिसेंबर १९८९ उपरोक्त.
२८. V. V. Mirashi, Studies in Indology, op. cit.
२९. G. S. Gai, E. I. XXXVIII, op. cit., pp. 293-96.
३०. S. B Deo, Paunar Excavations, Nagpur University, 1967, pp. 1-4.
३१. Burgess and Bhagwanlal Indraji, Inscriptions from The Cave Temples of Western India, 1881, p. 69, Ins. No. 3 V. V. Mirashi, C. I. I. Vol V, pp. 101-111
३२. हरिहर ठोसर, संशोधक उपरोक्त.
३३. M. G. Dikshit, N. I. A., Vol. IV, op. cit.
३४. G. S. Gai, I. H. Q., Vol. XXXVII op. cit.
३५. D. C. Sircar, The Successors of the Satavahanas, op. cit, pp. 255-260.
३६. A. M. Annigeri, E. I., Vol. XXXI, op. cit.
३७. P. B. Desai, E. I., Vol. XXXVIII, op. cit.

३८. G. S. Gai, E. I., Vol. XXXIII, op. cit., pp. 293-96.
३९. Ibid, pp. 61-64.
४०. हरिहर ठोसर, भारतीय इतिहास आणि संस्कृती, ऑक्टोबर-डिसेंबर १९८९, पृ. ३-१५.
४१. हरिहर ठोसर, संशोधक, सप्टेंबर १९८८, पृ. ४६-५८.
४२. H. S. Thosar, Journal of the Elphinstone College Staff Academy, 1989, Vol. I, pp. 49-54.
४३. G. S. Gai, E. I. XXXIII, op. cit., pp. 293-296.
४४. K. V Ramesh, Chalukyas of Vatapi, op. cit, pp. 65-84.
४५. L. D. Barnet, Epigraphia Indica, Vol. XII, pp. 142-155.
४६. K. V. Ramesh, Chalukyas of Vatapi, op. cit., pp 65-66.
४७. Ibid.
४८. G. S. Gai, E. I., Vol. XXXIII, op. cit., pp 293-96.
४९. ग. ह. खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, खण्ड १०, क्र. १, पृ. ९-१६.
५०. Epigraphia Indica, Vol. VI, pp. 1-12, op. cit.
५१. Sten Konow, Epigraphia Indica, Vol. XIV, p. 144.
५२. D. C. Sircar, Epigraphia Indica, Vol. XXXII, p. 207-212.
५३. K. A. Nilakanthasastri (ed.) The Comprehensive History of India, Calcutta, 1957, Vol. II, p. 48.
५४. K. D. Bajpai, Journal of the Numismatic Society of India, Vol. 26, Part I, 1964, pp. 1-6.
५५. D. C. Sircar, E. I., Vol. XXXII, op. cit.
५६. R. C. Majumdar (ed.) The Classical Age, op. cit., p. 158.
५७. E. K. Keilhorn, E. I., Vol. II, op. cit.
५८. R. C. Majumdar (ed.) The Mughal Empire, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1974, pp 256-257.

५९. Bombay Gazetteer, Vol. XIV, Thane. District, pp. 372–73.
६०. Hirananda Shastri, Guide To Elephanta, Bombay, 1934, pp. 58–59.
६१. H. S. Thosar, Journal of The Elphinstone College Staff Academy, op. cit.

" शिवकालीन न्यायालयीन कार्यपद्धती व वैशिष्ट्ये "

प्रा० गजानन भिडे, एम. ए. (इति.), एम. ए. (प्रा. भा. सं.)
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासात अभ्युदयाचा कालखंड होय. इस्लामी सत्तेच्या राजकीय नियंत्रणाखाली दबलेल्या समाजाला राष्ट्रभक्तीच्या विचारांनी जागृत करण्याचे, कार्यक्षम बनविण्याचे व त्यांच्या मदतीने व स्वसामर्थ्यावर महाराष्ट्रात 'स्वतंत्र राज्य' स्थापन करण्याचे कार्य शिवाजीने केले. राष्ट्रनिर्मितीबरोबरच या राष्ट्राचा कारभार करणाऱ्या निरनिराळ्या संस्था त्यांनी निर्माण केल्या. त्यांची कार्यपद्धती ठरविली. त्यांच्या कार्याला विशिष्ट व वेगळी दिशा दिली. 'निःपक्षपातीपणे न्यायदानाचे कार्य करीत असलेल्या शासनावरच लोकांचा विश्वास असतो,' या तत्त्वांची छ. शिवाजीला जाणीव होती, म्हणूनच या काळात न्यायसंस्थेची कार्यपद्धती व वैशिष्ट्ये यांना निश्चित स्वरूप देणे व ते कायम टिकविणे याकडे शिवाजीने विशेष लक्ष दिले.

शिवकालीन न्यायसंस्थेचे स्वरूप

छ. शिवाजीने न्यायसंस्थेच्या स्वरूपाची आखणी करताना आदिलशाही शासनपद्धतीतील काही गोष्टींचा स्वीकार केला असला तरी त्याने आपल्या गरजेनुसार व परंपरेनुसार त्यात आवश्यक ते बदल घडवून आणले. राजा हा राजकीय जीवनाप्रमाणेच धार्मिक व सामाजिक जीवनाचाही प्रमुख मानलेला होता. त्यामुळेच राजाचे न्यायालयीन अधिकार श्रेष्ठ मानलेले होते. राजमंडळ किंवा 'हुजूर हजिर मजलिस' हे राजाच्या वतीने श्रेष्ठ न्यायालय म्हणून काम करीत असे हुजूर मजलिसमध्ये या राजमंडळातील सभासदांबरोबरच गोतसभेचाही समावेश होता. महत्त्वाच्या खटल्याच्या बाबतीत किंवा पुनर्परीक्षणासाठी (appeal) आलेल्या खटल्यांच्या बाबतीत न्यायदान करण्याचे काम 'हुजूर मजलिस' करीत असे. हुजूर मजलिसला 'धर्मसभा' असेही म्हणत. इस्लामी सत्तेत

' मजलिस 'च्या मदतीने फक्त स्थानिक न्यायालयातच न्यायदान केले जात होते. शिवाजीने केंद्रीय सत्तेच्या प्रमुख न्यायालयातही मजलिस किंवा गोतसभेच्या मदतीने न्यायदान करण्याची पद्धत स्वीकारली. शिवाजीच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या एका धर्मसभेला एकूण २३८ सभासद उपस्थित होते त्यांपैकी फक्त २९ शासकीय अधिकारी होते.[१]

छ. शिवाजीने स्वराज्याचे तीन प्रमुख विभागांत विभाजन केलेले असून ते विभाग पंतप्रधान, अमात्य व मंत्री यांच्या नियंत्रणाखाली होते. या प्रमुख तीन विभागांचे सरसुभा (प्रांत), सुभा किंवा परगणा (जिल्हा), तर्फ (तालुका) व ग्राम असे विभाजन केलेले होते. सरसुभ्याला काही वेळा प्रांत राजमंडळ म्हणत. सरसुभ्याच्या ठिकाणी न्यायदानाच्या बाबतीत मजलिसची (गोतसभेची) मदत घेतली जात होती किंवा नाही हे निश्चितपणे आढळत नाही. सुभ्याच्या प्रमुखाला सुभेदार किंवा ' दिवाण ' म्हणत. त्याच्या मदतीला मुजुमदार व कारकून असत. न्यायदानाचे काम सुभामजलिस करी. त्यात सुभेदार, अधिकारी, सुभ्यातील देशमुख-देशपांडे, शेटे-महाजन, सुभ्यातील -खेड्यांचे पाटील, नाईकवाडी (पोलिस), मिरासदार व प्रतिष्ठित लोक यांचा समावेश होता. ' तर्फ 'या विभागाच्या न्यायालयीन कामकाजात अधिकारी, देशमुख, देशपांडे शेटे महाजन, नाईकवाडी, पाटील, कुलकर्णी, चौगुला व बलुतेदार (सोनार, शिंपी, माळी, तेली, सुतार, लोहार, परीट, न्हावी, मुलाणा, कुंभार, चांभार, गुरव, वगैरे) यांचा समावेश होता, तर ग्रामाच्या ' मजलिस 'मध्ये मोकदम, कुलकर्णी, चौगुला, बलुतेदार, थळकरी किंवा मिरासदार व लोकांचे प्रतिनिधी किंवा सर्वसामान्य लोक यांचा समावेश होता. धर्मज्ञान, परंपरा यांचे ज्ञान असलेला ' सभासद ' व मुस्लिम धर्मप्रमुख ' काजी ' यांचा हुजूर व सुभा मजलिसमध्ये समावेश होता.

हुजूर मजलिस, सुभा मजलिस, तर्फ मजलिस किंवा ग्राम मजलिसमध्ये न्यायदानाचे काम अधिकारी व या गोतसभेच्या सभासदांसमोर चाले. निःपक्षपातीपणे न्यायदान करून सर्वांच्या संमतीने निर्णय घेतला जाई. महजरवर या सभासदांच्या सह्या किंवा खुणांची चिन्हे काढली जात. त्यानंतरच त्या निर्णयाला महत्त्व मिळे. या खुणाही ठरलेल्या होत्या. उदा. शेटे महाजन–तराजू, पाटील–नांगर, चांभार–रापी, इत्यादी. या महजरमधील निर्णयाची अंमलबजावणी शासकीय अधिकारी करीत.

यापैकी कोणत्याही विभागात न्यायदानाचे काम एकटा राजा किंवा शासकीय अधिकारी करीत नसे. गोतसभेचे सभासद, धर्मज्ञाते व व्यवहारज्ञ यांचे सहाय्य घेतले जात होते. विविध गटांतील चाणाक्ष लोक व व्यावसायिक आपल्या गटातील अपराधी व त्याच्या अपराधाचे स्वरूप सहजपणे ओळखू शकत, तसेच गुन्हेगार व साक्षीदारही आपल्या लोकांसमोर खोटी माहिती द्यावयास धजत नसे. त्यामुळे न्यायदान योग्य व निःपक्षपातीपणे होत असे. तसेच लोकांना तात्काळ, विनाखर्च किंवा अल्पखर्चात निःपक्षपातीपणे व त्यांच्या ठिकाणीच न्याय मिळू शकत असे. आपले ठिकाण सोडून

दुसरीकडे न्यायासाठी धाव घेण्याची त्यांना गरज राहिली नाही. त्यामुळे, छत्रपती शिवाजीने स्वीकारलेले हे न्यायसंस्थेचे स्वरूप लोकप्रिय झालेले दिसते.

न्यायालयीन कार्यपद्धतीचे स्वरूप

छत्रपती शिवाजीच्या काळात लिखित स्वरूपाचा कायदा किंवा कार्यपद्धतीचे स्वरूप आढळत नाही. तथापि उपलब्ध होणाऱ्या विविध न्यायनिवाड्यांच्या महजरवरून त्या काळातील कायदा व न्यायालयीन कार्यपद्धतीच्या स्वरूपावर प्रकाश टाकता येतो. श्रुति व स्मृतिप्रणीत नियमाला तसेच परंपरागत चालीरीती, शिष्टाचार यांना कायदा मानलेले होते. याशिवाय वर्णजातिसंस्थेचे समाजाने मान्य केलेले काही नियम, धर्मपालन, राष्ट्र-पालन व प्रजापालनाच्या दृष्टीने आवश्यक असलेले व परंपरेने चालत आलेले नियम यांनाच कायदा मानले जात असे. राजा किंवा शासकीय अधिकारी या परंपरागत कायद्यात बदल करीत नसत. वतन, कुटुंब–सरहद्दी, धार्मिक बंधनाचे वा जातिबंधनाचे पालन, सामाजिक जीवनातील काही शिष्टाचारांचे नियम यांना कायदा म्हणून मान्यता मिळालेली असून त्याच्या मदतीनेच न्यायदान केले जात होते. विवाह[२], संपत्तीची वाटणी[३], वारसाहक्क, दत्तकविधान याविषयाच्या बाबतीत समाजाने मान्य केलेल्या व परंपरेने चालत आलेल्या नियमांनाच कायदा म्हणून मान्यता होती. राष्ट्ररक्षणाच्या दृष्टीने काही गुन्ह्यांना गंभीर शिक्षाही दिली जात असे. कारण या नियमांचे समाजात काटे-कोरपणे पालन होणे आवश्यक मानलेले होते.

शिवकालातील न्यायालयीन कार्यपद्धती ठरावीक पद्धतीची होती व तिचे येथील समाजाला पूर्ण ज्ञान होते असे दिसते.[४] वादी शक्यतो ज्या विभागात घटना घडली असेल तेथेच आपली तक्रार किंवा खटला नोंदवीत असे.[५] तथापि वादीला कोणत्याही ठिकाणी आपला खटला दाखल करण्याची मुभा होती असे दिसते.[६] सामान्यतः ज्या विभागात घटना घडली असेल त्या तर्फेच्या किंवा सुभ्याच्या हवालदाराकडे वादीची ही तक्रार येई. हा खटला धार्मिक बाबीसंबंधी किंवा जातिबंधनाच्या संबंधी असेल तर तो खटला धर्मसभा किंवा जातिसभेकडे निर्णयासाठी पाठविला जात असे. या प्रश्नांच्या बाबतीत त्या त्या सभांचे अधिकार श्रेष्ठ मानले जात.

वादीने खटला दाखल केल्यानंतर शासकीय अधिकारी स्वतः किंवा देशमुखाच्या मदतीने मजलिस सभासदांना निमंत्रित करीत असे. मजलिसची बैठक बहुदा पिंपळाच्या पारावर, मंदिरात किंवा चावडीत भरत असे. मजलिसच्या बैठका ज्येष्ठ व माघ महिन्यात सामान्यतः भरत. या बैठकांचा सभानायक म्हणून सुभेमजलिसमध्ये देशमुख, ग्राम-मजलिसमध्ये मोकदम, कसबा किंवा पेटा मजलिसमध्ये शेटे-महाजन काम पाहात असे तर तीर्थक्षेत्र किंवा पवित्र ठिकाणी भरणाऱ्या ब्रह्मसभेचा धर्माधिकारी सभानायक असे.[७] वादी आपल्या अर्जात (करीना) घटनेचे पूर्ण वर्णन व आपणावर झालेल्या अन्यायाची

संपूर्ण माहिती देत असे.[८]

मजलिसच्या बैठकीच्या वेळी प्रथम वादीकडून घटनेची माहिती घेतली जाई, तसेच त्याचे म्हणणे/मत समजावून घेतले जाई. संबंधित शासकीय अधिकारी नाईकवाडी (पोलिस) पाठवून प्रतिवादीला मजलिसच्या बैठकीसमोर बोलावून घेत असे. प्रतिवादी सभेपुढे उपस्थित राहिल्यानंतर त्याला वादीच्या तक्रार अर्जातील प्रमुख मुद्दे सांगितले जात व त्याबाबतीत त्याचे मत विचारले जाई. प्रतिवादीचे म्हणणे सविस्तरपणे लिहून घेतले जाई. प्रतिवादीने किंवा आरोपीने वादीने केलेला आरोप अमान्य केल्यास या न्यायदानाचे कामकाज पुढे चालू केले जाई. त्याने आरोप स्वीकारल्यास निर्णय घेऊन महजर तयार केली जात असे. न्यायालयीन कामकाजाच्या सविस्तर सुरुवातीपूर्वी वादी व प्रतिवादीकडून मजलिसने दिलेले निर्णय आम्हाला मान्य आहे व आम्ही त्याप्रमाणे वागू असे प्रतिज्ञापत्र (राजीनामा) साक्षीदारांसमोर लिहून घेत. खटला चालू असताना न्यायालयात उपस्थितीबद्दल व चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन घेतला जाई. वादी व प्रतिवादीचे मत ऐकून घेऊन कामकाजाला सुरुवात केली जात असे. वादी व प्रतिवादीला आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ लिखित पुरावे व साक्षीदार आणावे लागत. लिखित पुराव्यांना विशेष महत्त्व होते. साक्षीदाराची पूर्ण तपासणी केली जाई, त्यांचे म्हणणे लिहून घेतले जात असे. लिखित पुरावा किंवा साक्षीदार यांच्याशिवाय वादी किंवा प्रतिवादीने मागणी केल्यास 'दिव्य' केले जात असे. अशा दिव्याची उदाहरणे दिव्यप्रकारात जास्त दिसतात. सर्व प्रकारचा पुरावा ऐकून घेतल्यानंतरच निर्णय घेतला जाई.

यासाठी मजलिसच्या दोन किंवा तीन बैठका होत. काही खटल्यांच्या बाबतीत तीन महिन्यांतही निर्णय घेतला जात असे. मजलिसच्या कार्यपद्धतीवर देखरेख ठेवणे व विनाकारण विलंब होणार नाही याची दक्षता घेणे हे शासकीय अधिकाऱ्याचे काम असे. सभेनी दिलेल्या निर्णयाची महजर लिहिली जात असे. महजरमध्ये वादीच्या अर्जात्र थोडक्यात मसुदा, प्रतिवादीचे उत्तर, दोघांचा लिखित पुरावा, साक्षीदार, त्यांचे हुद्दे व त्यांचे मत, चर्चा, सभ्यांचे मत व शेवटी सभेचा निर्णय. या महजरवर सभानायकाबरोबरच सभेला जमलेल्या सर्व सभासदांची नावे व चिन्हे असत. छत्रपती शिवाजीने महजरलेखनाची पद्धत इस्लामी सत्तेपेक्षा बदलली असून, ती स्मृतिग्रंथातील 'जयपत्राशी' मिळतीजुळती होती. देशकुलकर्णी व कुलकर्णी हे अनुक्रमे सभा व कसबा-ग्राम येथील मजलिसच्या सर्व लेखनाचे कार्य करीत. ते एकमेकांच्या अधिकारांवर अतिक्रमण करीत नसत. महजर सामान्यतः कागदावर लिहीत. महजर ५ ते २० फूट लांब व ४ ते ६ इंच रुंद असे. कागदाचे तुकडे एकसारखे एकमेकांना चिकटवून ती लांब केलेली होती. चिकटविलेल्या ठिकाणी मागच्या बाजूस शिक्के मारीत. त्यामुळे खोटा कागद तयार करण्याची भीती राहात नसे. महजरच्या सुरुवातीच्या काही ओळी देशपांडे किंवा कारकून आपल्या हस्ताक्षरात लिहीत निरनिराळ्या वतनदार व सभासदांच्या त्याखाली

सह्या किंवा चिन्हे घेतली जात. महजर बांबूच्या नळकांड्यात किंवा दगडीत ठेवून त्यांचे रक्षण करीत.

मजलिसने महजर यशस्वी पक्षाला दिल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्या विभागाच्या प्रमुख शासकीय अधिकाऱ्यावर पडत असे. तो अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना त्याप्रमाणे सूचना पाठवीत असे.[९] वादी व प्रतिवादीकडून अगोदरच 'वर्तुणूक जामीन' घेतलेला असल्याने या निर्णयाच्या अंमलबजावणीची खात्री असे.

पुनर्परीक्षण (appeal) व बदल

खटला चालवीत असताना वादी व प्रतिवादीच्या, खटला चालविण्याविषयीच्या समाधानाकडे विशेष लक्ष दिले जात होते. त्यांनी जर खटला दुसऱ्या ठिकाणी हल-विण्याची मागणी केली तर ती स्वीकारली जात असे.[१०] ज्या ठिकाणी घटना घडली तेथील मजलिसकडून योग्य निर्णय मिळणार नाही असे संबंधितांना वाटल्यास त्यांना दुसऱ्या स्थळी' पाठविले जाई,[११] किंवा मयस्थळाच्या मजलिसला योग्य निर्णयासाठी हा खटला दुसरीककडे पाठविणे आवश्यक वाटल्यास तो पाठविला जात असे.[१२] थळच्या निर्णयाला थळपत्र म्हणत. थळपत्र मिळाल्यानंतर मयथळ मजलिस महजर तयार करीत असे. धार्मिक बाबीसंबंधीचे खटले तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या 'ब्रह्मसभा'कडे पाठ-विण्यात येत. शिवकाळात या न्यायालयांच्या बाबतीत ज्येष्ठताक्रम ठरविलेला नव्हता. तसेच प्रत्येक न्यायालयाचे कार्यक्षेत्रही ठरवून दिलेले नव्हते. त्यामुळे यापैकी कोणत्याही न्यायालयाला अपील न्यायालय म्हणता येत नाही. तथापि सामान्यतः स्थानिक न्यायालयात मिळालेल्या निर्णयाविरुद्ध पुनर्परीक्षणासाठी (appeal) वादी किंवा प्रतिवादीला ज्येष्ठ प्रशासकीय विभागाच्या न्यायालयात जाता येत असे. हुजूर मजलिस-पर्यंत तक्रार नेण्याची मुभा होती.

न्यायालयीन शुल्काविषयी नियम ठरलेले नव्हते. तथापि निर्णय झाल्यानंतर विजेत्या किंवा पराभूत पक्षाकडूनही दिवाण किंवा शासकीय अधिकारी 'हरकी' किंवा 'गुन्हेगारी' (शुल्क) घेत असे. एखाद्या पक्षाला शुल्क देणे अशक्य असल्यास त्याला सूट दिली जात होती. विजयी पक्ष आपल्या आर्थिक कुवतीनुसार गोतसभेच्या सभासदांना जेवण व भेट म्हणून वस्त्रे देत असे.

वैशिष्ट्यपूर्ण किंवा महत्त्वाच्या खटल्यांच्या बाबतीत खटल्याचा निकाल लागेपर्यंत खटल्याशी संबंधित असलेली स्थावर किंवा जंगम संपत्ती शासन ताब्यात घेई. कित्येकदा खटल्याचा निकाल लागेपर्यंत वादी व प्रतिवादीला नजरकैदेत किंवा तुरुंगात ठेवण्याचीही तरतूद होती.

आधुनिक काळातील न्यायसंस्थेचे स्वरूप व कार्यपद्धतीशी तुलना करू पाहता या

मुसलमान होता तर प्रतिवादी हिंदू होता. तथापि प्रतिवादी हिंदू असूनही वादी दिव्यास उतरताच त्याला न्याय दिला. यावरून या काळातील न्यायसंस्था निःपक्षपातीपणे व धर्मजातनिरपेक्ष भूमिकेतून, सर्वधर्मसमभावनेच्या जाणिवेतून कार्य करीत होती. असे मानता येते ![१४]

संदर्भ सूची

१. The Judicial System of The Marathas– V. T. Gune, p. 125

२. The Judicial System of The Marathas– V. T. Gune, p. 21.

३. मराठ्यांच्या इतिहासाची साधने- वि. का. राजवाडे, खंड २०, पत्रक्रमांक १२६, १२७, १६९.

४. The Judicial System of The Marathas, Gune, p. 133

५. SCS 7,38, 44 etc.

६. मराठ्यांच्या इतिहासाची साधने-राजवाडे, खंड २०, पृ. ९२; ऐतिहासिक संकीर्ण साहित्य पृ. ५, ६१, ७९; The Judicial System of The Marathas, Gune Appendix I, Nos. 4, 26, 44, etc.

७. मराठ्यांच्या इतिहासाची साधने– राजवाडे, खंड २०, पृ. २७९.

८. म. इ. सा.– राजवाडे, खंड १७, ५.४, खंड २०, पृ. ४१.

९. मराठ्यांच्या इतिहासाची साधने– राजवाडे, खंड २१, प. १११ व ११२

१०. मराठ्यांच्या इतिहासाची साधने– राजवाडे, खंड २०, प. ३०

११. मराठ्यांच्या इतिहासाची साधने– राजवाडे, खंड १५ व ६.

१२. म. इतिहासाची साधने– राजवाडे, खंड २०, प. २१७.

१३. The Judicial System of The Marathas, V. T. Gune, p. 133.

१४. प. सा. सं., खंड ३, पृ. ७९, शके १५७९ मार्गशीर्ष व॥ १३ सन १६५७, डिसेंबर २३.

थोरल्या रघुजीच्या प्रशासनाचे काही पैलू

डॉ. प्रभाकर गद्रे, आमगाव

नागपूरकर भोसल्यांच्या प्रारंभिक प्रशासनाबद्दलची आपली माहिती श्री. या.मा. काळे यांनी संपादित केलेल्या आणि विदर्भ संशोधन मंडळाने प्रसिद्ध केलेल्या "नागपूरकर भोसल्याची बखर" या अभिलेखावर आधारलेली आहे. तथापि या बखरीच्या प्रकाशनानंतर काही मूळ अभिलेख प्रसिद्ध झाल्यामुळे या माहितीबद्दल मला शंका वाटू लागली आणि गेल्या १० वर्षांत पुणे अभिलेखागारातील शाहू दफ्तरातील कागदपत्रे व इंडिया ऑफिस, लंडन येथील संग्रहित कागदपत्रांचे संकलित वाचन केल्यावर भोसल्यांच्या प्रारंभिक प्रशासनाचे अगदी वेगळे आणि नवीन चित्र सादर करता येईल असे वाटू लागले. प्रस्तुत शोध-लेख या विचाराचाच परिणाम आहे.

नागपूरच्या राज्याचा विस्तार

कान्होजी भोसल्याने वारंवार स्वाऱ्या करून अर्धविजित केलेल्या प्रदेशात स्वतःची भर टाकून त्याचे सुसंघटित राज्य करणे ही महत्त्वाची कामगिरी अठराव्या शतकातील थोर राजकारणी मुत्सद्दी आणि सेनापती रघुजी भोसले याने केलेली आहे. त्याच्या आयुष्याची कथा पर्शियन, इंग्रजी, फ्रेंच, मराठी, ओडिया आणि हिन्दी भाषांतील अभिलेखात विखुरलेली आहे.

परसोजी, कान्होजीचे घराणे अजिबात बुडाल्यामुळे अभिलेखागारातील कागदपत्रांशिवाय त्याची माहिती मिळणे शक्य नाही आणि ते घराणे रघुजीला शत्रुवत असल्यामुळे रघुजीला अगदी शून्यातूनच प्रारंभ करावा लागला. त्याला अक्षरशः "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, मन आणि शरीर अंतर्बाह्य" अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागले. यशस्वी होण्याची आशा जवळपास नव्हतीच. हिंगणीकर भोसल्याच्या घराण्यात सुद्धा रघुजीचे नेतृत्वावर एकमत नव्हते. थोरल्या पातीचा रायाजी भोसले आपल्या योग्यतेचा आणि सामर्थ्याचा विचार न करता रघुजीला उलथून पाडून आपल्या

वडिलांनी गमावलेले राज्य परत मिळविण्याची संधी पाहात होता. रघुजीचे शत्रू सुद्धा अनुभव, युद्धनेतृत्व आणि साधनांच्या बाबतीत त्याच्यापेक्षा काकणभरही कमी नव्हते, तरीपण त्याने आपल्या राज्याची निर्मिती करून वंशाची स्थापना केली.

रघुजीच्या मृत्यूच्या वेळी त्याचे राज्य माणिकदुर्गव्यतिरिक्त वर्धा नदीच्या पूर्वेपासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरले होते. दक्षिणेला त्याच्या राज्याची सीमा वैनगंगा आणि वर्धा नदीच्या संगमापासून गोदावरी नदीपर्यंत तेथून वाकड्या तिकड्या रेषेने एलूरपासून उत्तरेला चिल्का सरोवरापर्यंत होती. उत्तरेला ओरिसा बंगालच्या सीमेवरील सुवर्णरेखा नदीपासून महाकोशलच्या पठारी प्रदेशातील अनिश्चित सीमेने पेशवा भोसल्यातील विवादग्रस्त मंडला राज्यापर्यंत, तेथून नर्मदेच्या काठाने होशंगाबादपासून दक्षिणेला मकडाई, गाविलगड व वऱ्हाडच्या उत्तर सीमेवरून वर्धा नदीपर्यंत या राज्याची सीमा होती. याशिवाय वऱ्हाडातील चौथाई सरदेशमुखीच्या हक्कासह सहा प्रांतांवर सहा सुभेदार होते. पूर्वेचा ओरिसा प्रांत स्थानिक मांडलिकासह एका स्वायत्त मुस्लिम सुभेदाराच्या अखत्यारात होता. रतनपूरचा सुभा म्हणजे एक मांडलिक राज्यच होते. त्यात स्थानिक राजघराण्याच्या मोहनसिंग या फितुरास भास्कराने सत्तारूढ केले होते. मोहनसिंगाला मराठी बखरकाराने उपहासाने 'लेकावळा' म्हटले आहे.[1] देवगड, चांदा, वऱ्हाड येथे रघुजीने नेमलेले सुभेदार काम पाहात होते.

रघुजीने शेवटच्या पाच वर्षांत जिंकलेल्या दारव्हा, भाम वगैरे प्रदेशास निजामशाहीने जागीर म्हणून मान्यता दिली होती. या प्रदेशाखेरीज गढामंडल्याचा विवाद रघुजीच्या मृत्यूपर्यंत सुटला नव्हता. राजा शाहूने या राज्यातील चौथाई-सरदेशमुखीचा हक्क रघुजीला तर मोगलाई हक्क म्हणजे वारसा शुल्कासह एकूण राजस्वाच्या ६५ टक्के रक्कम पेशव्यास दिली.[2] पण स्थानिक राजाने दोघांच्या भांडणात स्वतःचा फायदा साधून या समझोत्याची अंमलबजावणी होऊ दिली नाही.

या विजित अगर मांडलिक प्रदेशाव्यतिरिक्त वऱ्हाडपासून गोदावरी नदीपर्यंतच्या प्रदेशावर रघुजीचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता. पण या प्रदेशातून म्हणजे गंगथडीतून तो घासदाणा घेत असे.

राजस्व आणि खजिना

सर्व बखरी आणि तवारिखींनी रघुजीने बंगालामधून फार मोठी संपत्ती आणली असे वर्णन केले आहे. पण त्यात काही तथ्य नाही. कान्होजीने शाहू महाराजांविरुद्ध बंड केले त्या वेळी तो २९ लाखाचा लष्करी सरंजामी होता, रघुजीचा सरंजाम ९ लाखाचा होता आणि हिंगणीकर भोसल्यांचा एकूण सरंजाम ७४ लाखांचा होता.[3] यात बंगालची खंडणी १२ लाख रुपये व ओरिसाची खंडणी ४ लाख रुपये जोडले तर ९० लाख होतात. शिवाय घासदाण्याचे ५–१० लाख जोडले तर रघुजीचे एकूण उत्पन्न एक

कोटीच्या घरात जाते. या कागदी आकड्यापेक्षा प्रत्यक्ष वसुली बरीच कमी असावी. कारण रघुजी आणि त्याच्या सुभेदाराभोवती नेहमी घेणेकऱ्यांचे धरणेच दिसते. म्हणून रघुजी जेव्हा "ऐश्वर्याच्या ऐन भरात" दिवंगत झाला तेव्हा त्याने मुलांसाठी मोठा खजिना ठेवण्याऐवजी काही लाखांचे कर्जच ठेवले होते.[४]

राजस्वाचे धोरण

प्रशासकीय दृष्टीने सेनासाहेबसुभापदावर रघुजीची नियुक्ती म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे जादा काम करणाऱ्या राजस्व आयुक्ताची नियुक्ती होती. त्याच्या प्रत्येक सनदेत त्याचा मोकासदार म्हणून स्पष्ट उल्लेख केलेला आहे.[५] रघुजीचे लष्करी पराक्रम प्रसिद्ध असले तरी मनाने तो शेतकरीच होता. अवघ्या दोन पिढ्यांपूर्वी त्याच्या पूर्वजांनी आपल्या भूमीच्या रक्षणासाठी हत्यार उचलले होते त्यामुळे शेतकऱ्यांचे हित त्याच्या मनात नेहमीच होते हे अनेक चक्षुर्वैसत्यम् पुराव्यावरून सहज सिद्ध करता येईल.[६] शेतीव्यवसाय हा राजस्वाचा मुख्य आधार असल्यामुळे शेतकऱ्याच्या हिताचे रक्षण हे मराठा राज्यकर्त्यांचे सर्वसाधारण धोरण होते. युद्ध, दुष्काळ इतर आपत्तीच्या वेळी जमीनदार व रयतेला राजस्वात सूट देणे ही सरकारची रीतच होती.[७] सरकार शेतकऱ्यांना अग्रीम तकावी देण्याचीही तरतूद करीत असे.[८]

देशमुख-ठाकूर यांसारख्या जमीनमालकाच्या मध्यम वर्गास समाप्त करावे असे रघुजीच्या मनात होते. रघुजीने गोंडवन आणि ओरिसात आपले राज्य स्थापल्यावर हे लोक अनियंत्रित झाले व त्यांनी जमिनीचा कब्जा घेतला. मोगलांसाठी राजस्व वसूल करणारे हे वंशानुगत जमीनदार आपल्या संग्रहित संपत्तीच्या जोरावर बलदंड झाले. ते सरकारच्या कमावीसदारांना भेटत नसत आणि खेड्याने सरकारला जास्त सारा द्यावा असे म्हटले तर भांडायला उठत,[९] पण अशा प्रबळ वर्गाला नष्ट केले तर सरकारी यंत्रणा त्यातच गुंतून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला असता. बराच काळ हा पेचप्रसंग सहन केल्यावर रघुजीने मध्यम मार्ग काढला. त्याने जुनी वतने कायम ठेवून मराठ्यांनी निर्माण केलेली नवी वतने रद्द केली.[१०] अशा तऱ्हेने वतनदारी पद्धत नियंत्रित करण्याचा प्रयत्न केल्यावर अखेर रघुजीने या पद्धतीशी जुळवून घेतले, कारण तोही अखेर एक वतनदारच होता.

सैन्यशक्ती

अस्सल कागदपत्रांच्या ढिगाऱ्यातून आता रघुजीच्या सैन्याच्या वाढीचा आलेख काढता येतो. त्याच्या लष्करी कारकीर्दीच्या प्रारंभी त्याच्या जवळ त्याचा चुलता राणोजीच्या दोन हजार घोडेस्वारांसह चार हजाराचे सैन्य होते.[११] नागपूर येथेच समाप्त झालेल्या एका बंगाल मोहिमेत त्याच्या जवळ सर्वात जास्त म्हणजे २० हजार

घोडेस्वार, २५ हजार पायदळ आणि ३०० तोफा होत्या.[१२] कर्नाटक स्वारीत त्याने सर्व मराठा सरदारांच्या ५० हजार सैन्याचे नेतृत्व केले हे एक नवलच होते.[१३] पण भास्करपंत कोल्हटकरांच्या पहिल्या बंगाल स्वारीत केवळ १२ हजार घोडेस्वारच होते.[१४] रघुजीने स्वतः बंगालवर स्वारी केली तेव्हा त्याच्याजवळ फक्त दहा हजार घोडेस्वारच होते.[१५] आसफजाही युद्धात त्याच्या मुलाजवळ सुमारे १५ हजार घोडेस्वार होते; तरीही रघुजीजवळ जुजबी प्रतिकारासाठी काही सैन्य राखीव होतेच.[१६] त्याच्या घोडेस्वाराचे शिलेदार आणि पागा असे दोन मुख्य विभाग होते.[१७]

रघुजीच्या यशात त्याच्या उत्साही मुस्लिम सेवकांचा मोठाच वाटा आहे. रघुजीच्या राजकारणाप्रमाणे त्याच्या लष्करी कारकीर्दीत आणि प्रशासनात त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. अलीकरवाल ह्या प्रमुख मुस्लिम अधिकाऱ्याने भास्करपंत कोल्हटकराबरोबर आपलेही प्राण गमावले. मीर हबीब आणि मिर्झा सालेह हे त्याचे ओरिसातील सुभेदार होते. सरमस्तखान पन्हीं अफगाण हा निजामाच्या दरबारात त्याचा राजदूत होता.

नागरी प्रशासन

छ. शिवाजीप्रमाणे रघुजी आपले मंत्री निवडण्यास स्वतंत्र नव्हता. त्याचे मंत्री त्याच्या स्वतःच्या नियुक्तीसोबतच नेमले गेले आणि तात्त्विकदृष्ट्या ते सर्व राजनिष्ठ होते. पण प्रत्यक्षात रघुजीने या राजकीय मंत्र्यांच्या हाती फारच थोडी सत्ता राहू दिली. वस्तुतः तो स्वतःचाच मंत्री होता.

नागपूरच्या राज्याचा सर्वोच्च अधिकारी 'सेनासाहेबसुभा' या पदाची ब्रिटिश भारतातील गव्हर्नर जनरलच्या पदाशी तुलना करता येण्यासारखी आहे. दोघेही राज-कृपेने नियुक्त व निवृत्तमान होते; दोघांनाही प्रादेशिक सुभेदारावर देखरेख ठेवावी लागे, दोघेही स्थानिक अधिकारी या नात्याने युद्ध किंवा शांतता करार करू शकत. आवश्यक पडल्यास दोघेही न्यायालयात हस्तक्षेप करीत. राजकीय, लष्करी आणि न्याय विभागा-संबंधी राजाज्ञेचे त्याला पालन करावे लागे.[१८] छत्रपतीच्या दरबारात फारसे हजर राहावे लागत नसल्यामुळे त्याला बरेच कृतिस्वातंत्र्य होते.

कान्होजीच्या काळातील भोसल्याच्या प्रशासन मंडळात दिवाण, मजुमदार, पोतनीस, फडणीस व जमेनीस हे पाच अधिकारी होते पण इ. स. १७३३ मध्ये रघुजीची नियुक्ती झाली तेव्हा २३ मे १७३३ रोजी सहा मंत्र्यांची नियुक्ती झाली[१९] आणि जादा महत्त्वाच्या तीन मंत्र्यांची नियुक्ती ७ सप्टेंबर रोजी झाली.[२०] स्वतः रघुजीची नियुक्ती २२ नोव्हेंबर १७३३ रोजी झाली.[२१]

(१) दिवाण–राज्याचे सामान्य कल्याण पाहणे, सर्व दरखदारांत एकमत राखणे व राज्यप्रमुखाच्या गैरहजेरीत त्यांचे प्रतिनिधित्व करणे हे त्याचे कर्तव्य होते. त्याचे

वार्षिक वेतन ५००० होन होते.

(२) मजुमदार–याला सार्वजनिक आयव्ययाचे सर्व हिशेब तपासून राज्यप्रमुखास माहिती द्यावी लागे. राज्य आणि प्रांताच्या हिशेबावर तो प्रतिहस्ताक्षर करीत असे. त्याचे वार्षिक वेतन ५००० होन होते.

(३) फडनवीस–हा राजस्वाचे सर्व हिशेब आणि परगण्याची सर्व कागदपत्रे बाळगत असे. सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन ४००० होन होते.

(४) जमेनवीस–राज्यातील सर्व सरदार आणि सैन्याचे हिशेब तो तयार करीत असे. सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन ४००० होन होते. जमेनविसाच्या मदतीला दोन कारकुनासह २००० होन वार्षिक वेतनाचा एक मजुमदार असे.

(५) शिक्केनवीस–जाणाऱ्या सर्व पत्रांचे मसुदे योग्य आहेत की नाही ते तपासून त्यात दुरुस्त करून त्यावर शिक्का मारत असे. सरकारी घोड्यासह वार्षिक वेतन ३००० होन होते.

(६) सबनीस–सैन्याची हजेरी लिहून त्यांच्या वेतनाचे बिल तयार करीत असे. सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन २००० होन होते.

(७) चिटणवीस–सर्व प्रकारचे पत्रव्यवहार, आदेश, परवाने लिहून त्यावर तारीख टाकण्याचे काम करीत असे. त्याचे वार्षिक वेतन १००० होत होते.

(८) डबीर किंवा मुन्शी– निजाम-उल-मुल्क आणि अलीवर्दी यांच्याशी स्वतंत्र पत्रव्यवहार सुरू झाल्यावर रघुजीने या पदाची निर्मिती केली असावी. पहिला मुन्शी चिटकोपंत होता पण त्याचा सहायक हैदर कुली हाच काम पाहात असे. त्याचे वेतन माहीत नाही.[२२]

चिटणिसाखेरीज सर्व मंत्री ब्राह्मण होते व अखेरचे दोन सोडून बाकीच्यांना सैन्य घेऊन स्वारीवर जावे लागे. सर्वांना हाजर जमानत्नी व ओलिस द्यावे लागत.

गुप्तचर व्यवस्था

कौटिल्याने राजाला चारचक्षु म्हटले आहे. याला नागपूरचे राज्यसुद्धा अपवाद नव्हते. या विभागाचे नावच गुप्तचर असल्यामुळे त्याचे संदर्भ फारच दुर्मिळ आहेत. निरोप्या, जासूद, हरकारा हे या व्यवस्थेचे कनिष्ठ घटक होत. पाच ते २५ लोकांच्या एका गटास जथा म्हणत. प्रत्येक गुप्तहेर आपल्या जथ्याच्या नावे ओळखला जाई. फितुरी टाळण्यासाठी एका जथ्यात कमीत कमी दोन जासूद तरी ठेवलेच जात. जथ्याच्या प्रमुखाला

नाईक म्हणत.[२३] नाईक साक्षर असे तो त्याच्या जासुदांनी मिळविलेली बातमी स्वतः किंवा दरोगा–ए–हरकारा मार्फत राज्यप्रमुखास देत असे.[२४] या महत्त्वाच्या पदावर रघुजीने संताजी नाईक यास नियुक्त केले होत.[२५] मराठा वकील हा आपल्या मालकासाठी हेरगिरी करीत असे.

पाणीपुरवठा, नद्यांचे उतार, लपविलेली संपत्ती, राजकीय कारस्थाने आणि शत्रु-सैन्याच्या हालचाली इ. सर्व महत्त्वाच्या बाबी कळविणे हे गुप्तचरांचे कर्तव्य होते.[२६] साधू, संन्यासी व प्रवाशाच्या वेशात गुप्तहेर वावरत.[२७] ते परस्परांशीही पत्रव्यवहार करीत.[२८] गुप्तहेर शत्रूच्या हाती सापडला तर त्याला मारहाण व इतर शिक्षा होण्याची मोठीच भीती असे.[२९] वकिलांना तर प्राणदंड होण्याची किंवा तुरुंगात पडण्याची शक्यता निश्चित असे.[३०] रघुजीचे गुप्तचर इतके तत्पर होते की, ते आपल्या प्रतिपक्षीयांपेक्षा पुढेच राहत असत.[३१] कर्नाटक आणि बंगाल्यातील रघुजीच्या यशाचे बरेच श्रेय त्याच्या राज्याच्या गुप्तचर व्यवस्थेकडे जाते.

न्यायव्यवस्था

न्यायव्यवस्था ही ग्राम पातळीवर सुरू होत असे. खुनासारखे गंभीर गुन्हे सुद्धा स्थानिक पातळीवर दंड पावत, त्यांना फक्त उच्चाधिकाऱ्यांची संमती आवश्यक असे. वादीप्रतिवादी किंवा स्थानिक अधिकारी पंचायतीची किंवा लवादाची नियुक्ती करीत.[३२] आमील, सुभेदार, सेनासाहेब सुभा आणि राजाकडे दाद मागण्याची नेहमीच सोय असे. राजा शाहू तत्परतेने न्याय मिळवून देण्यास मदत करीत. एका प्रकरणात तर त्याने आपल्या अधिकाऱ्याप्रमाणे निजामाच्या अधिकाऱ्यासही ताकीद देण्यास कमी केले नाही.[३३]

दिवाणी व फौजदारी खटल्यात काहीच फरक नव्हता. सुनावणीची पद्धत सोपी आणि संक्षिप्त होती. लेखी जबानी व खटल्याचे नियम उपनियम नव्हते.[३४] तरीपण महत्त्वाचे निर्णय उभय पक्षाचे युक्तिवाद व पंचायतीच्या सारांशासह लिहिले जात. उभय पक्षाच्या संमतीने झालेले निर्णय आपोआपच दोघांनाही बंधनकारक राहात.[३५]

शिक्षेचे प्रकार ठरविताना जुन्या परंपरेचे अनुकरण केले जाई. इंधन चोरणाऱ्या किरकोळ चोरास आर्थिक दंड दिला जाई.[३६] दरोडा, खून यासारख्या गंभीर गुन्हेगारास तुरुंगवास किंवा अंगभंगाची शिक्षा दिली जाई.[३७] मानवी पुरावा नसल्यास दैवी साक्ष मिळविण्यासाठी लालभडक तापविलेली लोखंडी शलाका धरण्याचे किंवा उकळत्या तुपात हात घालण्याचे दिव्य करावे लागे.[३८] अशाही प्रकरणात पंच लवादाशी तर्कयुक्त युक्तिवाद करता येत असे आणि म्हातारपण किंवा दिवाळखोरीच्या निमित्ताने गुन्हेगारास सौम्य शिक्षा होत असे.[३९]

रघुजीच्या राजवटीचा परिणाम

हे सारे रघुजीच्या राजवटीचे तात्त्विक विवेचस झाले, पण तो प्रत्यक्ष हजर नसला तर ही तत्त्वे धाब्यावर बसविली जात. त्यामुळे "शिवाजी महाराजांच्या काळात सुरू झालेली युरोपीयन व्यापाऱ्याची मैत्री त्याला हवी आहे." हा रघुजीचा दावा[४०] ओरिसातील त्याच्या अधिकाऱ्यांच्या इंग्रजांशी झालेल्या वागणुकीने लटका पडतो.[४१] रघुजीला सदासर्वकाळ सर्वत्र राहणे शक्य नव्हते म्हणून त्याच्या बारगिरांची व बाजारबुणग्यांची लुटालूट तो रोखू शकत नव्हता. मराठी सैन्याच्या पिछाडीस लुटारूंच्या टोळ्या चालत.[४२] लुटालूट करणाऱ्या मराठी सैन्याची तर्कशुद्ध परिणती पेंढारगर्दीत झाली त्यात सामूहिक बलात्कारांचेही उल्लेख आहेत.[४३]

रघुजीने आपल्या शेजाऱ्याच्या लुटालुटीचे समर्थन केलेले नाही; ते करणे शक्यही नव्हते. त्याच्याजवळ लेखी राजाज्ञा होती म्हणून त्याला कोणाचीच पर्वा नव्हती. मराठा राज्याचे अस्तित्वच त्याच्या शेजारच्या मुस्लिम राज्याच्या मुळावर येणारे होते आणि त्यांची येनकेन प्रकरेण प्राणहानी, वित्तहानी करणे हे त्याचे कर्तव्य होते.[४४] तथापि गोंडवनातील प्राचीन हिंदू गोंड राजाचा तो त्राता असल्यामुळे प्रत्यक्ष युद्धाखेरीज एकदाही लुटालूट झाल्याचे वृत्त नाही. एवढेच काय पण गोंडवनाच्या रक्षणासाठी त्याने राजकीय समझोते करण्यासही मागेपुढे पाहिले नाही.[४५]

त्याच्या साधनांचा नैतिक दर्जा कोणताही असला तरी त्यांचे यश एक देदीप्यमान सत्य आहे. हा पितृहीन मराठा मुलगा त्याच्या काळातील बलिष्ठतम मोगल किंवा मराठा नेतृत्वाचा दुर्दम्य प्रतिस्पर्धी ठरला. ही वस्तुस्थिती भारतीय तसेच विदेशी समकालीनांना पक्की ठाऊक होती. रघूजीचा बंदोबस्त कसा करावा हे कोणालाच उमगत नव्हते. बंगाल्यात त्याचा खून करणे जमले नाही म्हणून त्याचे चारित्र्यहनन करण्यात आले. निजाम आणि त्याच्या मुलांनी संतुष्टीकरणाचे धोरण अंगीकारले तर पेशवा आणि त्याच्या बंधूंनी आकाशपातळ एक केले. एकाने त्याचा मित्रासह घात करण्याचा सल्ला दिला तर दुसऱ्याने त्याच्या मुलाचा खून करण्याचे दिवास्वप्न पाहिले.[४६] भारतातील सर्वोत्तम फ्रेंच सेनापती आणि मुत्सद्दी मॉसिएर बुसी याने रघुजीशी उभय पक्षी अहस्तक्षेपाचा समझोता केला. पण हा समझोता आपल्या फायद्याचा नाही आणि चिरकाल टिकणारा नाही असे फ्रेंच भारताचा गव्हर्नर जनरल मॉसिएर डुप्लेला वाटत होते.[४७] बंगालचा नबाब सिराजउद्दौला याचे मत अगदी विरुद्ध होते. "मराठ्यांजवळ ईश्वरीय पुस्तक नाही तरीही त्यांनी बंगालच्या चौथाईचा करार प्रामाणिकपणे पाळला."[४८] सतत १० वर्षे त्रस्त झालेल्या शत्रूकडून अशी आदरांजली मिळणे हेच रघुजीचे खरे यश आहे.

परीशिष्ट १

रघुजीचे प्रांतिक सुभेदार

प्रांताचे नाव	सुभेदाराचे नाव	साधन
देवगड	आप्पाजी विठ्ठल	वैद्य, खंड ४, १९ जून १७४४
	रघुजी करांडे	जेंकिन्स, खंड १, पृ. १०६
चंद्रपूर	महादजी केशव	वैद्य, खंड ४,२४ ऑगस्ट ४६
	कृष्णाजी नारायण	वैद्य, खंड ४,२३ जानेवारी ४८.
रतनपूर	मोहनसिंग	वैद्य, खंड ४, ऑगस्ट ४६
वऱ्हाड	कृष्णाजी गोविंद	वैद्य, खंड ५, पृ. २२, ले. २७
ओरिसा	मीर हबीबुल्लाखान	सी सी सी पार्ट २, पृ. ४३५
	मिर्झा सालेह	सियार खंड २, पृ. ११७

परिशिष्ट २

नागपूरच्या राज्याचे मंत्री (१६९८ ते १७५५)

दरखदार	रघुजी	कान्होजी	परसोजी
दिवाण	त्रिंबक महादेव, सिदभट, गंगाजी गोपाल आव्हाड	संकराजीपंत केशव फडनीस	
मजमुअदार	कोन्हेरराम कोल्हटकर, येसाजी कृष्ण	गंगाधर महादेव, जगजीवन बालकृष्ण	बापूजी सोनाजी दिघे
फडणीस	विश्वंभर देवाजी, गणेश महादेव	मल्हारपंत	
जमेनीवीस	केशव रंगाचार्य, महिपत बापूजी	बापूजी सोनाजी, महिपत बापूजी	
सिक्केनीवीस	हरबाजी विठल साबणे		
सबनीस	नागो मेघश्याम		
चिटणीस	रामचंद्र गणेश		
पोतनीस	संकराजी रघुनाथ, महिपतराव बापूजी	अंताबा नाईक भिडे गोविंद नाईक भिडे	

साधने : शाहू दफ्तर, ए सिरीज ४०९८, २८८५०, ७१४१ हे अभिलेख रघुजीच्या दरखदारांची नियुक्तीपत्रे आहेत तर कान्होजीचे दरखदार शाहू दफ्तर ए सिरीज २८११, ४७१९, १०१७९, १४१४९ आणि पेशवा दफ्तर खंड १० पृ. ७ लेखांक ३; खंड २०, पृ. ४७, लेखांक ५४ यात उल्लेखित आहेत.

परिशिष्ट ३

रघुजीचे राजदूत, दूत वगैरे

सत्ताधारी	प्रतिनिधी	आधार
बादशाह महमदशाह	केशवराव	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. १८, लेखांक २५
बादशाह अहमदशाह	कृष्णाजी केशव	पेशवा दफ्तर, खंड ३०, पृ.७३, लेखांक ८२
राजा शाहू	वैद्य बंधू	वैद्य दफ्तर
पेशवा बाळाजी बाजीराव	त्रिंबकजी भोसले	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ.६५, लेखांक ७७
नबाब अलीवर्दी खान	निळोपंत पाराशर	वैद्य दफ्तर, खंड ४, २ ऑगस्ट १७४५
	शिवभट साठे	वैद्य दफ्तर, खंड ५, २ ऑगस्ट १७५५
निजाम-उल-मुल्क	गिरमाजीराव	पेशवा दफ्तर, खंड २८, पृ.४९, लेखांक ३७
	देवराव विठ्ठल	पेशवा दफ्तर, खंड २५, पृ.४६, लेखांक ४३
नासरजंग	देवराव विठ्ठल	पेशवा दफ्तर, खंड ६, पृ. ५१, लेखांक ५८
सलाबतजंग	सरमस्तखान पन्ही	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ.४३, लेखांक ५४
फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी	आपाजी विठल	मार्टिन्यू डुप्ले, खंड २, पृ. २२
	विठल नागनाथ	पिलै डायरी, खंड १, पृ. १४७–४८
	गोपाल आनंद	मार्टिन्यू डुप्ले, खंड २, पृ. २२

परिशिष्ट ४

रघुजीकडे राजदूत

सत्ताधारी	प्रतिनिधी	आधार
बादशहा महमदशहा	वेंकाजी देवराय	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. १८, लेखांक २५.
अलीवर्दीखान	सरमस्तखान पठाण	पेशवा दफ्तर, खंड २७, पृ. १०, लेखांक ११
	सद्र-उल-हक	वैद्य, खंड ५, २ ऑगस्ट १७५५
नासरजंग	भुरा मिया	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. ४४, लेखांक ५४
सलाबतजंग	आपाजीपंत	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. ६९, लेखांक ८०.
पेशवा बाळाजी बाजीराव	विसाजी भिकाजी	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. २८–२९ लेखांक ३५–३६
	भिकाजी काळे	पेशवा दफ्तर, खंड २७, पृ. ९, लेखांक १०
	व्यंकाजी मोरेश्वर	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. ४३, लेखांक ५३
	माधोराव मोरेश्वर	
	लंबोदरपंत धुंडीराम	पेशवा दफ्तर, खंड ६, पृ. १३१, लेखांक १४८
हिरदेशाह बुदेला	सुरतसिंग	पेशवा दफ्तर, खंड २०, पृ. ३२, लेखांक ४०
इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी	कुप्पय्या, आदि वेंकप्पा	कॅलेण्डर ऑफ मद्रास रेकार्डस् १७४०-४४, पृ. १६२, लेखांक १३७

संदर्भ सूची

१. नागपूरकर भोसल्याची बखर–(संपा.) या. मा. काळे, पृ. ५५ व ७८
२. ऐतिहासिक पत्रव्यवहार- संपादक गो. स. सरदेसाई, इ. पृ. २५–२६, लेखांक ३५–३६
३. शाहू दफ्तर –' ए ' सिरीज २८७१५, पुणे अभिलेखागार, पुणे (अप्रकाशित)
४. नागपूर अफेयर्स– त्र्यंबक शंकर शेजवलकर, खंड १, पृ. १, लेखांक १, नागपूर प्रांताचा इतिहास– या. मा. काळे, पृ. १०३
५. ऐतिहासिक पत्रव्यवहार– पृ. १९, ले. २५, पृ. २०, लेखांक २६, पृ. ४३१, लेखांक ४३८

मासिर उल उमरा– समसानउद्दौला शाहनवाजखान अनु. हेन्री बेव्हरिज– संपा. बेनिप्रसाद, खंड १, पृ. २०७

६. संशोधकासाठी निवडलेली कागदपत्रे– वाय सिरीज ४०९७, पुणे अभिलेखागार (अप्रकाशित), पेशवे दफ्तरातून निवडलेली कागदपत्रे–संपा. गो. स. सरदेसाई; खंड २०, पृ. ३१, लेखांक ३९, पृ. ३४, लेखांक ४२, खंड २५, पृ. १४७, लेखांक १३५
७. इंडिया ऑफिस– मराठी डॉक्युमेंट ३५–३६, पृ. ७८–८०, इंडिया ऑफिस लायब्ररी लंडन (प्रकाशित)
८. जयपूर ट्रान्स्क्रीप्ट– ॲडिशनल पर्शियन खंड २, पृ. ११९, लेखांक १८७; पृ. १४७, लेखांक २०२ इंग्रजी अनुवाद श्री. नटनागर शोध संस्थान, सीतामऊ (अप्रकाशित)
९ पेशवा दफ्तर– खंड २०, पृ. ३७, लेखांक ४५, ओरिसा अंडर मराठाज– बाभनीचरण राय पृ.
१०. वैद्य दफ्तर– संपा. शं. ल. वैद्य, खंड ४ दिनांक २३ जानेवारी १७४८ ओरिसातील ठाकूर आणि गोंड राजेरजवाड्यांच्या बंडाळीतील साम्य लक्षणीय आहे.
११. पेशवा दफ्तर– खंड १०, पृ. ७, लेखांक ३, पृ. २३, लेखांक २७
१२.
१३. कॅलेण्डर ऑफ मद्रास रेकार्ड– खंड १ (१७४०–४४), संपा. हेन्री डॉडवेल, पृ. २४, लेखांक ७०–७१, पृ. ३३, लेखांक ११०
१४. वैद्य– खंड ४ दिनांक २५ आक्टो १७४२ आहे पण ५ नोव्हें. १७४१ हवा.
१५. पेशवे दफ्तर– खंड २७, पृ. ६ लेखांक ७
१६. रेकार्ड ऑफ फोर्ट सेंट जॉर्ज (कन्ट्री कॉरस्पॉण्डन्स) १७५४–पृ.९६, लेखांक १७९.
१७. पेशवा दफ्तर– खंड २०, पृ. ३३, लेखांक ४१

१८. शाहू दफ्तर– (संपा.) राजकीय आज्ञा, पृ. १०१, लेखांक २२३, लष्करी आज्ञा पृ. ८०, लेखांक १६२, आर्थिक आज्ञा पृ. ८२, लेखांक १६७, न्यायविषयक आज्ञा शाहू दफ्तर ए सिरीज २७०५ (अप्रकाशित)
१९. शाहू दफ्तर– ए सिरीज २८८५८ परिशिष्ट २ पाहावे
२०. कित्ता– ए सिरीज ४०९८ अप्रकाशित
२१. गुप्ते बखर– पृ. ४२
२२. कित्ता– पृ. ५९; ऐतिहासिक पत्रव्यवहार पृ. ४०० ते ४२५
२३. शाहू दफ्तर– ए सिरीज २४६९, ४३२६, ४४६४, ५२८४, ५२८५ (अप्रकाशित)
२४. फ्रेंच रेकॉर्ड ऑन मराठा हिस्ट्री– संपादक व्ही. जी. हाताळकर, खंड ७, पृ. ३०१
२५. संशोधनांजली– देविदास लांडगे, पृ. ३१
२६. कॅलेण्डर ऑफ मद्रास रेकॉर्ड १७४०–४१– पृ. ४३, लेखांक १४३ रेकार्ड ऑफ फोर्ट सेंट जॉर्ज (कन्सल्टेशन) २२ मे १७४०
२७. सियार-उल-मुताखेरीन– खंड २, पृ. ५४६
२८. पेशवा दफ्तर– खंड २०, पृ. ३९, लेखांक ४७
२९. फ्रेंच रेकॉर्ड– खंड ८, पृ. ४७९
३०. पेशवा दफ्तर– खंड २७, पृ. १० लेखांक ११; द प्रायव्हेट डायरी ऑफ आनंद रंगा पिलै– (संपा.) प्राईस फ्रेड्रीक, खंड १, पृ. १४८, १६५–६६.
३१. पेशवा दफ्तर– खंड २०, पृ. २७, लेखांक ३४
३२. ओरिसा अंडर मराठाज– बाभनीचरण राय, पृ. १४१
३३. शाहू दफ्तर– ए सिरीज ८३७७–७९,२७०५ (अप्रकाशित) शाहू दफ्तर, पृ. १९२, लेखांक २२८.
३४. ओरिसा अंडर मराठाज–बाभनीचरण राय, पृ. १४१
३५. डिसीजन ऑफ शाहू– संपा. सी. जी. वाड, पृ. ७४–८८
३६. ओरिसा अंडर मराठाज, पृ. १४१
३७. इंडिया ऑफिस मराठी डॉक्युमेंट ३५–३६, पृ. २३–२५, ले. ९, कॅलेंडर ऑफ पर्शियन कॉरस्पॉन्डन्स, खंड ५, ले. १९७७
३८. ओरिसा अंडर मराठाज, पृ. १४२
३९. कित्ता
४०. कॅलेण्डर ऑफ मद्रास रेकार्ड (१७४०–४४), पृ. १६५, लेखांक १५०
४१. बेंगाल पब्लिक प्रोसिडिंग १९ आक्टो. १७५१ (बलराम गढी लेटर नं. ८०); बेंगाल पब्लिक लेटर टू कोर्ट १७५३–५४, पृ. १७७–७९, पॅरा ११३–११५, बेंगाल पब्लिक प्रोसिडिंग २१ नोव्हेंबर १७५४ आणि २३ डिसेंबर १७५४.

४२. पेशवा दफ्तर– खंड २७, पृ. ११, लेखांक ११
४३. पंडित गंगारामकृत महाराष्ट्र पुराण–संपा. प्रतुलचंद्र गुप्ता व एडवर्ड डिमॉक ज्यु., पृ. २७.
४४. एटीन्थ सेंचरी डेक्कन– अनु. सेतु माधवराव पगडी, पृ. १४६–४७
४५. पेशवा दफ्तर– खंड २५, पृ. १४७, लेखांक १३५
४६. पुरंदरे दफ्तर– संपा. कृष्णाजी पुरंदरे, खंड १, पृ. ११२, लेखांक १५९
४७. फ्रेंच रेकार्ड– खंड ८, पृ. ४३१–४३२, ५१९–५२०, ५२३
४८. बेंगाल १७५६–५७– संपा. एच. सी. हिल्स, खंड २, पृ. २३०, लेखांक २३८.

विक्रमादित्याच्या राजसभेत कालिदास

डॉ० म० त्र्यं० सहस्रबुद्धे, निवृत्त संस्कृताध्यापक, नागपूर, पुणे

महाकवी कालिदासाच्या कालाबद्दल बरेच चर्वितचर्वण आतापर्यंत झाले आहे. परंतु अजूनही त्याच्या कालासंबंधी निर्णायक अनुमान झालेले नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. इसवी सनपूर्व प्रथम शतक व इसवी सनाचे चौथे शतक असे या बाबतीत दोन पक्ष प्रामुख्याने संशोधकांपुढे आहेत. जुन्या ग्रंथांचे अथवा कवींचे संबंधात काही निश्चयात्मक विधान करणे कठीण आहे, कारण या बाबतीत पुष्कळसा भर तर्कावर द्यावा लागतो. शिलालेख, नाणके, ताम्रपट इ. साधने काही अधिक माहिती देतात यात शंका नाही, परंतु हे सर्व साहित्य जुने असल्याने, त्यावरील अक्षरांचे वाचन करून जे निर्णय ठरवायचे असतात, त्यातसुद्धा व्यक्तिगत पूर्वग्रहांना भरपूर वाव असतो. थोडे विषयान्तर पत्करूनही एतद्विषयक एक उदाहरण पाहण्याजोगे आहे. खाल्डिया आणि इजिप्त (अथवा मिश्र) या देशांतून नाबोनास्सर Nabonassar) या राजाच्या नावाने एक कालगणना प्रचलित होती. त्या गणनेत वर्षमान भारतीय वैदिक आर्यांच्या वर्षमानाइतकेच आहे. ही गोष्ट विख्यात महाराष्ट्रीय ज्योतिर्विद श्री. वेंकटेश बापूजी केतकर यांनी आपल्या ग्रंथात दाखविली आहे. (पाहा : Indian and Foreign Chronology). भारतीयांनी खाल्डिया, इजिप्त इत्यादी देशांकडून ज्योतिषशास्त्र उसने घेतले, असे पाश्चात्त्य व तदनुसारी इतर विद्वान नेहमीचं प्रतिपादित असतात. नाबोनास्सरने पुरस्कारलेली गणना इसवी सनपूर्व आठव्या शतकातील होती, तर भारतीय गणना इसवी सनपूर्व बाराव्या शतकातील आहे असे श्री. केतकरांनी दाखविले आहे. तेव्हा उसनवारी कोणी केली असावी हे कोणीही विचारी मनुष्य सहज ओळखू शकेल ! तरीही कित्येकांना अजूनही भारतीयांनीच उसनवारी केली असे वाटते ! असो.

या दृष्टीनेच विक्रम संवत् कालगणनेच्या बाबतीत बराच घोटाळा झालेला दिसतो. पाश्चात्त्य संशोधक फर्ग्युसन यांनी विक्रम संवत–गणनेबद्दल चमत्कारिक मतप्रदर्शन केले आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे हा संवत इसवी ५४४ मध्ये कोरूर विजयाचे स्मारक म्हणून

सुरू झाला व त्याला अधिक महत्त्व प्राप्त व्हावे म्हणून, त्याचा आरंभ सहाशे वर्षे मागे ढकलला व संवत ६०१,६०२ अशी गणना सुरू केली. अर्थात इसवी सनपूर्व विक्रमराजा म्हणून कोणी झालाच नाही, अशी मतप्रणाली सुरू होऊन ती कित्येक विद्वानांनी मान्य केली (पाहा : संशोधन मुक्तावली, सर ३, पृ. ९)

परंतु ही उघड उघड बनवाबनवी होती. विक्रम संवत ४६१ म्हणजे इसवी सन ४०५ चे सुमारास उपलब्ध झालेल्या एका लेखात "श्रीमालवगणाम्नाते प्रशस्ते कृतसंज्ञिते" असा उल्लेख आहे. येथे 'आम्नात' हा शब्द महत्त्वाचा आहे व त्याचा अर्थ पूजनीय ग्रंथात सांगितलेला असा आहे. अर्थात धार्मिक पूज्य परंपरेने चालत आलेली अशी कालगणना त्या वेळी होती हे स्पष्ट आहे. तसेच 'कृतसंज्ञित' या शब्दाचा अर्थही 'कृत हे नाव असलेला' असा होतो. म्हणजे त्या वेळचे शास्त्रवेत्ते कृतनामक संवत्सराचा उल्लेख करीत होते हेही तितकेच स्पष्ट आहे. तात्पर्य, युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन इत्यादी शककर्त्यांची ज्योतिष परंपरेने चालत आलेली नावेही निव्वळ काल्पनिकच आहेत, असे निश्चयाने सांगणे उचित नाही.

श्री. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्या ग्रंथाच्या "भारतीय ज्योतिष" या अनुवादात पृ. २२३ वर पुढील उल्लेख आहे, "इस प्रकार यह बात उपपन्न हो जाति है कि पञ्चसिद्धान्तिकोक्त पांचों सिद्धान्त शककालसे प्राचीन हैं।" अर्थात सौर सिद्धान्त म्हणजेच मूळ सूर्यसिद्धान्त इसवी सनपूर्व आहे, हे त्यांना मान्य होते. इ. स. १९०४मध्ये मुंबईला अखिल भारतीय ज्योतिष संमेलन भरले होते. कै. लोकमान्य टिळकप्रभृती तेथे उपस्थित होते. उज्जयिनीहून त्या संमेलनाला कै. गो. स. आपटे, श्री. नारायण महाराज हे ज्योतिर्विद देखील गेले होते. त्यांनी त्या ठिकाणी निश्चयपूर्वक सांगितले की, ज्योतिष सिद्धान्त ग्रंथात उज्जयिनी मध्यरेखा मानण्याची परंपरा जवळजवळ दोन हजार वर्षे अखंड चालू असून, तेथूनच शून्य रेखांशाचे गणित करण्याला प्रारंभ होतो (उज्जयिनी दर्शन पृ. ९८). यावरून उज्जयिनी नगरीत ज्योतिषविषयक संशोधन इसवी सनपूर्व कालातदेखील चालत असे, असे दिसते. अर्थात साठ संवत्सरांची (प्रभव, विभव इत्यादी नावे) आणि कार्तिक महिन्यापासून वर्षारंभ या दोन नवीन सुधारणांचा आविर्भाव मूल सूर्यसिद्धान्ताने घडवून आणला असे मानणे भाग पडते आणि ही गोष्ट इसवी सनपूर्व घडली, ती सूर्यसिद्धान्तकाराच्या मतांचा दूरवर प्रभाव पडला होता म्हणून घडली. उज्जयिनीला सत्ता गाजविणाऱ्या शासनयंत्रणेने या महत्त्वाच्या कालगणनेकडे दुर्लक्ष केले असेल, हे संभवत नाही; शिवाय राजसत्तेचे पाठबळ असल्या-वाचून अशा गोष्टींचा दूरवर प्रसार प्रचार अशक्यप्रायच !

मूलतः वैदिकधर्मानुयायी ब्राह्मण असूनही नंतर 'क्षपणक' म्हणजे जैन साधू झालेले यति, जैनधर्मप्रवर्तक महावीराच्या निर्वाणानंतर ४६७व्या वर्षी म्हणजे इसवी सनपूर्व ५७ मध्ये उज्जयिनीला विद्यमान होते अशी माहिती, श्वेताम्बर संप्रदायाच्या 'खरतरगच्छ

पट्टावलि" वरून मिळते. काही कालविपर्यास असला, तरी कित्येक महत्त्वाच्या परंपरा ऐतिहासिक तथ्ये राखून ठेवतात, हेही ध्यानी घेणे अवश्य आहे. कारण विक्रमाच्या नवरत्नांचा नामनिर्देश ज्या श्लोकात आहे, त्यात क्षपणक हेही एक नाव आहेच. "अनृणां मेदिनीं कृत्वाऽचीकरद् वत्सरं निजः" असा उल्लेख प्रभाचंद्रसूरि याने केला आहे, व तो विक्रमादित्याला उद्देशून केला आहे. प्रभाचन्द्रसूरीप्रमाणेच धनेश्वरसूरि, जिनप्रभसूरि, मेरुतुंगाचार्य इत्यादी अचार्यांनी विक्रमविषयक आख्याने जतन करून ठेवली; ती मागाहून घुसडली आहेत, त्यांना सत्याचा काहीच आधार नाही, असे मानणे कितपत युक्त होईल ? वराहमिहिराने मूल सूर्यसिद्धान्त हा ग्रंथ लिहिला नाही. त्याने यथाशक्ति पितामह, वासिष्ठ, पुलिश, सूर्य व रोमक यांतील विचारांचे संकलन केले, म्हणून कित्येकांचा असा ग्रह झाला की सूर्यसिद्धान्ताचा कर्ता तोच असावा. परंतु आदिसूर्यसिद्धान्ताच्या संकलनात समावेश करणारा वेगळा व त्याचा प्रणेता वेगळा, हा फरक स्पष्ट झाल्यानंतर प्रणेता कोण ही समस्या तशीच राहिली. आता या ग्रंथाचे अस्तित्व जर इसवी सनपूर्व होते, तर कर्ता इसवी सनपूर्वच झाला असला पाहिजे एवढे स्पष्ट आहे. ओघानेच दुसरीही गोष्ट मान्य करावी लागते, की त्या ग्रंथाला व ग्रंथकर्त्याला राजमान्यता मिळाली असली पाहिजे.

इतिहासाचा मागोवा घेतल्यास असे दिसते की, मौर्य सम्राट बिम्बिसार अथवा बिन्दुसार याने इसवी सनपूर्व २७३चे सुमारास उज्जयिनीवर आधिपत्य मिळविले होते. बिम्बिसारानंतर सम्राट अशोकाची कारकीर्द आली; अशोकाचे उत्तराधिकारी निर्बल ठरल्यामुळे मौर्य बृहद्रथाचा वध करून पुष्यमित्र शुंगाने शासन आपल्या हाती घेतले. मौर्यांच्या दुर्बलतेचा उपयोग 'मलोई' संज्ञक गणसंघाने करून घेतला. हे मलोई म्हणजेच मालव जनसमुदाय होय (पृ. ४०). मालवजनांनी इसवीपूर्व १०० ते १५० या अवधीत न्यायपूर्ण लोकतंत्रीय शासन केल्यामुळे या प्रदेशास मालव संज्ञा प्राप्त झाली. या राजांच्या काही मुद्रा सापडल्या आहेत, त्यांवर 'मगज' अशी अक्षरे असून, ते 'मालवगणानां जयः' या पङ्क्तीचे संक्षिप्त रूप असावे असे तज्ज्ञांचे मत आहे. इसवी सन ५३० चे आसपासचा एक लेख सापडतो त्यात (पाहा उज्जयिनी दर्शन पृ. ९१) "मालवगणस्थितिवशात् कालज्ञानाय लिखितेषु" असा उल्लेख आहे. म्हणजे कालज्ञान व्हावे—अर्थात कुठलेही कृत्य करण्यास योग्य काल समजावा—म्हणून ग्रंथरचना झाली होती, परंपरेने होत होती, असा निष्कर्ष निघतो.

आतापर्यंतच्या विवेचनावरून एवढे तरी स्पष्टपणे जाणवते, की इसवी सनपूर्व प्रथम शतकात मालवप्रदेशावर कुणातरी न्यायी, पराक्रमी व विद्वान शासकाची सत्ता असावी. ही परंपरा काल्पनिक नसून तिला सत्याचा आधार आहे. अशा राजाने साहित्य, कला, ज्ञान इत्यादी गोष्टींना उत्तेजन देणे हेही स्वाभाविक आहे. साहित्यात तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब पडते ही गोष्ट सर्वमान्य आहेच. या दृष्टीने कालिदासाच्या साहित्याचे

निरीक्षण केल्यास काय आढळते ते पाहू. रघुवंशाच्या चौथ्या सर्गात असे वर्णन आहे.

दिग्विजयाला सिद्ध झालेल्या रघुराजाला, होमाग्नीने, आपल्या दक्षिणेकडे झुकलेल्या ज्वालारूपी हाताने जय प्रदान केला. हा होम शान्तिकर्म म्हणून केला जात होता व त्या वेळी सैन्यातील अश्व व गज यांचे पूजन होत असे.

> तस्मै सम्यग् हुतो वह्निः वाजिनीराजनाविधौ ।
> प्रदक्षिणार्चिर्व्याजेन हस्तेनेव जयं ददौ ॥

यावर टीकाकार लिहितात.– वाजिग्रहणं गजादीनामप्युपलक्षणम् तेषामपि नीराजनाविधानात् । म्हणजे अश्व आणि हत्ती या सैन्यातील दोन्ही उपयुक्त पशूंची गन्ध माल्य इत्यादींनी पूजा, व त्यांना कुठलीही बाधा होऊ नये म्हणून बलिदान, होम, इत्यादी होत असे. कौटिलीय अर्थशास्त्रात या विधीचे वर्णन आहे.

> " नीराजनामाश्वयुजे कारयेन्नवमेऽहनि ।
> यात्रादौ अवसाने वा व्याधौ वा शान्तिके रतः ॥ "

नवव्या दिवशी घोड्यांना अश्वयुजी नक्षत्र पाहून नीराजना विधी करून यात्राप्रसंगी, व्याधीपासून व यात्रेनंतर या विधीने त्यांची शांती करावी.

चातुर्मास्यातील ऋतुसंधीत तीन वेळा गजपूजा करावी. (पाहा–कांगलेकृत कौटिलीय अर्थशास्त्र, भाग १, पृ. ८६–८७–८८ व ९७) कौटिल्याच्या अर्थशास्त्रग्रंथाचा प्रचार चन्द्रगुप्त मौर्यापासून सुरू झाला हे सर्वविदितच आहे. कालिदासाचा स्थितिकाल त्यापासून शतक दोन शतकांपेक्षा अधिक नंतरचा नसावा.

मौर्य सम्राट बिम्बिसार अथवा बिन्दुसार याने सेलेउकसच्या वंशजामार्फत स्वतःच्या राजसभेकरिता ग्रीक तत्त्वज्ञाची मागणी केली होती. सेलेउकसचा मौर्यघराण्याशी संबंध आला होता; तो कौटुंबिक होता; व तेव्हापासूनच यवन दासदासींचा भारतीय राजपरिवारात समावेश होणे शक्य आहे. शाकुन्तल नाटकाच्या दुसऱ्या अंकाच्या प्रारंभीच, हातात धनुष्य घेतलेल्या व वन्यफुलांच्या हारांनी सजलेल्या यवनींच्या समवेत असलेल्या राजाचा प्रवेश दाखविला आहे. विदूषक म्हणतो " एष बाणासनहस्ताभिः यवनीभिः वनपुष्पमालाधारिणीभिः परिवृत इत एवागच्छति प्रियवयस्यः । " रघुवंशात (सर्ग ४ श्लो. ६०, ६१) रघुराजाने यवनांचा पराजय केल्याचे वर्णन आहे. कालिदासाचा काल मौर्यसम्राटांच्या कालापासून फार नंतरचा नसावा असा या वर्णनावरून तर्क होऊ शकतो.

शाकुन्तल नाटकाच्या पहिल्या अंकात झाडांना पाणी घालीत असलेली शकुन्तला व तिच्या मैत्रिणींचा प्रवेश आहे. पाण्याच्या शिडकाव्यामुळे एक भुंगा उडून शकुंतलेच्या चेहऱ्याभोवती घिरट्या घालतो. शकुंतला घाबरून भुंग्याच्या त्रासापासून सुटका करण्याकरिता मैत्रिणींना विनविते. मैत्रिणी थट्टेने म्हणतात, " आम्ही कोण तुला सोडविणार ?

दुष्यन्त राजाला हाक मार ! कारण तपोवनाचे रक्षण राजाच करतो." (के आवां परित्रातुम् ? दुष्यन्तमाक्रन्द । राजरक्षितानि तपोवनानि नाम ।) राज्याच्या सीमेवर–(प्रत्यन्ते) राजाच्या विहारासाठी मृगवने आणि गाईचा शब्द ऐकू जाईल अशी भूमी वेदाध्ययन व सोमसवनादी यज्ञ करणाऱ्या तपस्वी ब्राह्मणांना त्यातील सर्व मालमत्तेच्या रक्षणाची जबाबदारी घेऊन राहण्यास द्यावी. तेथे लतांची जाळी, मधुरफळांचे वृक्ष, व मृगयेला उपयुक्त हरिणे व इतर पशू, हत्ती हत्तिणी व त्यांचे छावे, नखे दात काढून घेतलेले हिंस्र पशू, जलाने तुडुंब भरलेल्या पुष्करिणी तेथे असाव्यात इत्यादी वर्णन असून, राजाने त्यांची नीट व्यवस्था ठेवावी, कारण ती राज्याच्या उत्पन्नाची महत्त्वाची बाब आहे, असा निर्देश कौटिलीय अर्थशास्त्रात आहे (पाहा, कौटिलीय अर्थशास्त्र भाग १, पृ. ३४, ३५) ही गोष्ट सुद्धा कालिदासाच्या स्थितिकालाची निदर्शक असू शकते.

विक्रमोर्वशीय या नाटकाचे कथानक पुरुरवस राजा व उर्वशी अप्सरा यांच्या प्रणयावर आधारलेले आहे. नाटकाच्या नावात मात्र पुरुरव्याचा उल्लेख नाही. विक्रमोर्वशीय असे नाव नाटकाला देण्यात स्वतःला आश्रय देणाऱ्या विक्रमादित्याचा गर्भित उल्लेख नाटककर्त्याला अभिप्रेत आहे हे उघड आहे. त्यात प्रथमांकात चित्ररथ गन्धर्व, राजाची स्तुती करताना म्हणतो ' दिष्ट्या महेन्द्रोपकारपर्याप्तेन **विक्रममहिम्ना** :वर्धते भवान्' येथेही 'पराक्रममहिम्ना' म्हणजे शौर्याच्या मोठेपणामुळे असा आशय व्यक्त करताना नाटककार 'पराक्रम' शब्द न वापरता '**विक्रममहिम्ना**' असे म्हणतो. तेथेच पुढे 'अनुत्सेकः खलु **विक्रमा**लङ्कारः' असे चित्ररथाचेच उद्‌गार आहेत. नाटककर्त्याच्या मनात विक्रमादित्याबद्दलचा आदरच येथे व्यक्त होतो. अभिज्ञान शाकुन्तलाच्या प्रस्तावनेत प्रेक्षकांच्या समूहाला उद्देशून सूत्रधार म्हणतो "रसभावविशेष–दीक्षागुरो**र्विक्रमादित्यस्य** अभिरूपभूयिष्ठा परिषदियम्"। अर्थात 'अत्यंत रसिक, नाट्यशास्त्रमर्मज्ञ अशा विक्रमादित्याच्या विद्वज्जनांची, प्रज्ञावंतांची ही परिषद' असे वर्णन तो करीत आहे. विक्रमादित्य व कालिदासाचा संबंध देखील येथे अभिप्रेत आहे.

मालविकाग्निमित्र या कालिदासाच्या नाटकात पुढील श्लोक आहे :

दाक्षिण्यं नाम बिम्बोष्ठि बैम्बिकानां कुलव्रतम् ।
तन्मे दीर्घाक्षि ये प्राणाः ते त्वदाशानिबन्धनाः ॥
(अंक ४, श्लो. १४)

भावार्थ : बिम्बकाच्या उत्तराधिकारी राजांचे स्त्रीदाक्षिण्य हे कुलव्रतच आहे. तथापि हे विशालनयने ! तुझ्या (प्राप्तीच्या) आशेवरच माझे प्राण (पंचप्राण) अवलंबून आहेत. हे उद्‌गार राजा मालविकेला उद्देशून काढीत आहे. येथे राजा स्वतःला "बैम्बिक" म्हणजे बिम्बकांचा उत्तराधिकारी म्हणवीत आहे. पतञ्जलीच्या महाभाष्यात 'बैम्बकि' या शब्दावरील कात्यायनाच्या वार्तिकात (४–१–९७) असे म्हटले आहे.

सुधातृव्यास...बिम्बानाम् इति वक्तव्यम्...बैम्बकिः।

यासंबंधी पुण्याचे विख्यात संस्कृताध्यापक प्रिन्सिपल् आर्. डी. करमरकर यांनी अतिशय सूचक उद्गार काढले आहेत. त्यांच्या प्रतिपादनाचा भावार्थ असा : पुराणांना अनुसरून विचार केल्यास, अग्निमित्राचा पिता पुष्यमित्र हा शुंग घराण्याचा संस्थापक होता. त्या घराण्यात बिम्ब अथवा बिम्बकाचा उल्लेख नाही. बिम्ब हा मौर्य बिम्बसार किंवा बिन्दुसार असेल काय ? आणि तसे असेल तर शुंगांनी राजकीय हेतूकरिता स्वतःला मौर्यकुलाशी सम्बद्ध केले काय ? कारण मौर्यांचा शेवटचा राजा पुष्यमित्राकडूनच मारला गेला होता. याचा थोडा अधिक विचार करणे युक्त होईल. इसवी सनपूर्व २९० हा स्थूलमानाने बिम्बिसाराचा काल धरल्यास अशोकाचा काल २७० इसवी सनपूर्व असा सरासरी येतो. यानंतर तीन पिढ्या गेल्यावर बृहद्रथ मौर्याचा काल इसवी सनपूर्व १८० ते १९० असा ठरावा. पुष्यमित्राने बृहद्रथाचा वध करून राज्यारोहण केले तो काल इसवी सनपूर्व १७८ येईल. पुष्यमित्र, अग्निमित्र, वसुमित्र यांचे उल्लेख मालविकाग्निमित्रात आले आहेत. शुंग अथवा मित्र नावाच्या घराण्याने सुमारे ११० अथवा ११२ वर्षे राज्य केले, असे वायुपुराणाचे मत आहे. तात्पर्य पुष्यमित्र हा मौर्य राजांचा उत्तराधिकारी, असे जर म्हटले तर तो स्वतःला बिम्बिसाराचा अनुसारी म्हणजे बैम्बक अथवा बैम्बिक म्हणवू शकतो. पतञ्जलि कात्यायन या वैयाकरणाचा काल इसवी सनपूर्व आहे; कारण "पुष्यमित्रो यजते...याजका याजयन्ति .." इत्यादी वचने महाभाष्यात वर्तमानकालीन घटनेला उद्देशून आहेत. म्हणजे महाकवी कालिदासाचा कालही इसवी सनपूर्वच मानायला हवा. कालिदास हा शिवभक्त होता, तर गुप्त राजवंश वैष्णव होता. त्यामुळे गुप्त राजवंशापेक्षा, शंकराच्या अष्टतनूंचा उल्लेख करणारा, नीललोहितापासून म्हणजे श्रीशंकराच्या प्रसादाने पुनर्जन्माचा म्हणजे जन्ममृत्यूच्या चक्राचा क्षय व्हावा अशी इच्छा करणारा कालिदास, उज्जयिनीच्या महाकालेश्वराशी व तेथील राजा विक्रमादित्याशी अधिक समरस व्हावा हेच उचित आहे.

अश्वघोष या बौद्ध कवीचे अनुकरण कालिदासाने केले असाही एक प्रवाद आहे. वरील विवेचनावरून या प्रवादाचे आपोआपच निराकरण होईल. दुसरे असे की, धर्म-प्रचाराकरिता अश्वघोषाने काव्य लिहिले, परंतु कालिदासाने प्रतिभेतून उत्स्फूर्त असे काव्य लिहिले. शिवाय भाषासाम्याचा मुद्दा उभयपक्षी लागू पडणारा आहे, व अश्व-घोषानेच अनुकरण केले असेही मत आहे. अधिक कृत्रिम काव्य हे कालदृष्ट्या साधारणतः अलीकडचे मानले जाते. सौंदरनंद या अश्वघोषाच्या काव्यात दुसऱ्या सर्गात श्लोक १२ पासून ४३ पर्यंत तृतीय भूतकाळाचा प्रयोग करून क्रियापदे वापरली आहेत. यावरूनही अश्वघोष कालिदासापेक्षा अर्वाचीन ठरतो.

प्रस्तुत लेखकाने कौटिलीय अर्थशास्त्राचा आधार घेऊन कालिदासाच्या कालाबद्दल

मतप्रदर्शन केले आहे, व ते आक्षेपार्ह ठरू शकते. म्हणून या ग्रंथाच्या कालाबद्दलही थोडे लिहावयास हवे. येथे एक गोष्ट अगोदर लक्षात ठेवावयास हवी, की पाश्चात्त्य विद्वानांनी, भारतीय ऐतिहासिक व्यक्तींचा अथवा घटनांचा काळ, फार अलीकडे ओढला आहे. यासंबंधी अथवा कौटिलीय अर्थशास्त्राच्या कालासंबंधी विस्ताराने लिहिण्यास सवड नाही. परंतु तत्त्वतः मान्य नसले तरी यासंबंधी डॉ. कीथ यांचे मत लेखकाला अनुकूल वाटत असल्याने ते उतरून घेतोः-

" It is however perfectly possible that the Arthashastra is an early work, and that it may be assigned to the first century B. C., while its matter very probably is older by a good deal than that."

(भावार्थ :—अर्थशास्त्र ग्रंथ प्राचीन आहे व तो इसवी सनपूर्व शतकात झाला असावा, परंतु ग्रंथविषय मात्र पुष्कळच जास्त प्राचीन आहे.)

विख्यात संशोधक डॉ. जयस्वाल यांचे मत यासंबंधी निर्णायक वाटते तें असे :—

" I agree with Dr. Konow that Vikramaditya of 58 B. C. was a historical figure, a national hero. I have maintained that view throughout."

(भावार्थ : इसवीसन पूर्व ५८ मध्ये विक्रमादित्य नावाचा एक ऐतिहासिक राष्ट्रीय महापुरुष असा राजा खरोखरच होऊन गेला. मी नेहमीच या मताचा पुरस्कार केला आहे.)

अद्यापही या विषयावर पुष्कळ लिहिता येईल. परंतु लेखाला मर्यादा असणेच उचित आहे. तेव्हा भारताला ललामभूत अशा उज्जयिनीनरेश विक्रमादित्याच्या राजसभेचे भूषण असलेला कालिदास इसवी सनपूर्व ५८ चे सुमाराचाच असावा, या विख्यात पुरातत्त्ववेत्ते डॉ. वाकणकर यांच्या निर्णयाशी प्रस्तुत लेखक सहमत आहे. इत्यलम्.

विक्रमादित्य व महाकवी कालिदास यांचे समकालीनत्व !

मूळ लेखक : पद्मश्री कै. डॉ. वि. श्री. वाकणकर (टिपण स्वरूपात)
शब्दांकन व रचना : श्री. श्रीपाद. के. चितळे–नागपूर (शिष्य डॉ. वाकणकर)

महाकवी कालिदास या श्रेष्ठ कविभूषणाबद्दल अनेक प्रकारच्या किंवदन्ती ऐकू येतात. पण त्या समस्येला प्रत्यक्ष पुरातत्त्वशास्त्राच्या कसोटीवर तावून सुलाखून घासण्याचा प्रयत्न कै. डॉ. वाकणकरांनी केला.

भारतीय इतिहास परंपरेतील एक विचका म्हणजे कालिदास या व्यक्तिमत्त्वाबद्दलची प्रचंड अशी सर्वंकष ओढाओढ ! कालिदास कोणाच्या दरबारी होता ? उज्जयनीच्या विक्रमाच्या की गुप्तसम्राट चंद्रगुप्त विक्रम याच्या. उभय नृपतींमध्ये सुमारे ४५० वर्षांचे अंतर आहे. परंपरा, जैन साहित्य, लोककथा, यांची समृद्ध भांडरे आजही असताना उज्जयनीच्या महापराक्रमी विक्रमादित्याची उचलबांगडी करून त्याचे अस्तित्व असत्य ठरविले. ह्या लेखातून कालिदासासंबंधी भ्रम दूर करण्याचा प्रयत्न आहे.

उज्जयनीच्या विक्रम दरबारी इ. स. च्या पहिल्या शतकात कालिदास झाला. ह्यास पुरावे उपलब्ध करण्यात मोठी परंपरा पुरातन जैन पंडितांची असून त्यात, धनेश्वरसूरि, अमितगति मेरुतुंगाचार्य, प्रभासचंद्रसूरि, जिनप्रभसूरि, सुबंधू आदी आहेत. महाकवी कालिदासही, (मी) विक्रम (पण हा विक्रम कोण ?) दरबारी होतो असे त्याने स्वतःच लिहून ठेवले आहे म्हणून बरे ! केवळ भारतीयच नव्हे तर विदेशी पंडितही उज्जयनीच्या विक्रमाची स्तुती करताना मुक्तकंठाने त्याच्या गुणांची कदर करतात व त्याचे नृपतित्व म्हणजे भारतीय इतिहासात सर्व गुणांचा व राजगुणांचा एक मापदंड म्हणून ते मानतात. जसे दाशरथी श्रीराम तसाच आपला विक्रमादित्य असा तो मापदंड होय. ह्या सर्व पंडितांच्या कथनाचा विचार करून त्या विक्रमास चंद्रगुप्त विक्रमादित्य (गुप्तनृपती) ठरविणाऱ्या पंडितांच्या कथनाचाही विचार करणे आवश्यक आहे.

विक्रमसंवताचा कर्ता विक्रम होता ह्यासंबंधी बऱ्याच मंडळींनी संशय व्यक्त केला आहे व त्याचे कारण म्हणजे विक्रमसंवताचा उल्लेख बराच नंतर म्हणजे इ. स. च्या

८ व्या शतकात प्रथमतः सापडतो. सौराष्ट्रात "धनी की काठी" ह्या ठिकाणी जैरुदेवाच्या ज्या शिलालेखात विक्रम संवत्सर असा उल्लेख आला आहे तो शिलालेख वि. सं. ७९४ चा आहे. तत्पूर्वी वि. सं. ७६७ या वर्षी वणप्पाच्या काळाचा लेख इंद्रगड-मानपूरा येथे सापडला आहे. त्यात "मालवानां नरेंद्राणां" असा उल्लेख आला आहे.

सर्व जाणतातच की विक्रम संवत, मालवसंवत व कृतसंवत ही एकाच संवत परंपरेची नामाभिधाने आहेत, ह्याबद्दल तज्ज्ञांचे दुमत नाही. पण हा संवत राजस्थान–पंजाब–माळवा ह्या क्षेत्रात तसेच पश्चिम गंगेच्या खोऱ्यात सुविख्यात व सर्वज्ञात होता. मालवजातीच्या गणसंघास ह्या क्षेत्रात बरेच महत्त्व होते. सिकंदरास पराजीत करणारे मालव हे पंजाबमधील माळवा ते मध्यभारतातील माळव्यापर्यंत पसरले होते. ह्यांचे लेख उदयपूर, जयपूर, मंदसौर, कोटा, धौलपूर, विदिशा व उज्जयनी एवढ्या मोठ्या क्षेत्रात सापडले आहेत. ह्याचाच अर्थ असा की गुप्तपूर्व तिसऱ्या शतकापासून ह्या क्षेत्रात मालव संघाचे प्रभुत्व होते.

मंदसौर अथवा दशपूरचे 'औलीकरवंशीय' मालव होते ह्याबद्दल शंका घेण्याचे कारणच नाही. हे औलीकर मालव आणि कृतसंवत्सरास एकच मानीत. (मालवगणाम्नाते कृतसंज्ञिते) ही गणपरंपरा आजच्या अर्थाने गणपरंपरा नव्हती. ह्यातही वंशपरंपरेचे राजाचे अधिष्ठान मान्य होते. मंदसौर क्षेत्रावर गुप्त नृपतीचा अधिकार फारच अल्प होता. साधारणपणे तो १४–१५ वर्षे इतका असून गुप्ताधिपत्यही नावापुरतेच होते. मंदसौरच्या बंधुवर्मनने आपल्या शिलालेखात (Epigraphs) गुप्तसंवताचा उपयोग न करता मालव संवताचा उपयोग केलेला दिसतो. मालवांचा स्वाभिमानच त्याच्या शिलालेखातून दृग्गोचर होतो आणि त्यातून तो गुप्तांचा अधीनस्थ असल्याचे मुळीच दिसत नाही, तर त्याने निव्वळ "कुमारगुप्तम् पृथ्वी प्रशासती" असे लिहिले आहे. वास्तविक मालव व कृत संवत एकच होते हे तर सर्वश्रुतच आहे. तथापि एक–दोन उदाहरणे देऊन हे अधिक स्पष्ट करतो. सं. ४६१ च्या एका अभिलेखात खालील उल्लेख महत्त्वाचा आहे.

"श्रीमालवगणाम्नाते प्रशस्ते कृतसंज्ञिते" अजमीरच्याही एका लेखात असाच उल्लेख आहे. "कृतेषु चतुर्षु वर्षशतेष्वे काशित्युत्तरेष्वस्यां मालव पूर्वायां।" कृतसंवत हा एका व्यक्तीने प्रारंभ केला, आणि मालवगणामध्येच त्याचा आविर्भाव झाला व मालवगणाने आपल्या नावाची जोड त्यास दिली आहे व पुढे कृत नाम लोप होऊन केवळ मालवगण संवत हेच तेवढे राहिले. संवत ४९३ मध्ये "मालव गण स्थित्या याते शतचतुष्टये" आणि संवत ५८९ मध्ये "मालवगणस्थितिवशात् कालाय लिखितेषु" असे स्पष्ट उल्लेख आढळतात.

राजशक्तीचे प्राबल्य

परिस्थिती बदलून हूणांचे आक्रमण मोडण्यास गणशक्तीपेक्षा राजशक्तीचे प्राबल्य

स्पष्ट झाले आणि त्यामुळे साहजिकच गणसंस्था मागे पडली, विस्मृत झाली, आणि इ. स. च्या ७ व्या शतकात भानपुरा लेखात "सप्तषष्ठधिकेयाते वर्षाणां शतसप्तके मालवानां नरेन्द्राणां पृथिव्या विसृतात्मना।" म्हणजे गणाच्या ऐवजी मालव नरेंद्राचे स्मरण होऊ लागले. संवत ७९५ मध्ये मालववंशाचा असाच उल्लेख आलेला आहे.

"संवत्सर शतैर्यातैः सपंचनवत्यगूर्गैः सप्तभिम्मलिवेशानां" मालवांचा अधिपती कृत विक्रमाच्या कथा लोककथेत व्याप्त होत्या त्यामुळेच मालवेश अथवा मालव नरेंद्राच्या जागी त्याला प्रतिष्ठित केले गेले. मुळात तो नव्हताच किंवा कुणी (काही तज्ज्ञांच्या मते) नवीन निर्माण केला असे नव्हतेच तर तो गण महात्म्याने प्रतिष्ठित होऊ शकला नाही. पण विस्मृतीमुळे पुनश्च विक्रमाचे स्मरण होऊ लागले.

धौलपूरच्या संवत ८९८ (इ. स. ८४१) च्या चौहान नृपती चण्डमहासेनाच्या लेखात 'विक्रम' असा उल्लेख आला आहे.

"वसुनव अष्टौ वर्षागतस्य कालस्य विक्रमाख्यस्य"

दक्षिणेत विजापूरच्या एका राष्ट्रकूट अभिलेखांतही "विक्रमकाले" असा उल्लेख आला आहे. म्हणजेच विक्रम संवताचा मालव व कृत संवताशी कसा निगडित संबंध आहे हे वरील उल्लेखांनी स्पष्ट होत आहे.

सिद्धसेन दिवाकराचे विक्रमादित्य कीर्तनम्, रत्ननंदीचे भद्रबाहुचरित, मेरुतुंगाचार्याची पट्टावली, अमितगाणीचे सुभाषित रत्नसंदोह आणि धर्मपरीक्षा, सोमदेवभट्टाचे कथासरित्सागर आणि धनंजयसूरिकृत शत्रुंजय माहात्म्य आदि अनेक ग्रंथांत विक्रमाचा गौरवपूर्ण उल्लेख करीत आहेत. हा विक्रम चंद्रगुप्त विक्रमादित्य (गुप्तवंशी) किंवा समुद्रगुप्त विक्रमादित्य नसून महेंद्र गर्दभिल्लपुत्र विक्रम आहे. ह्या परंपरागत ज्ञानाचा ठेवा डावलून चंद्रगुप्तास उज्जयनीच्या सिंहासनावर अधिष्ठित करणे अन्याय्य तर आहेच पण तत्कालीन इतिहासाचा चक्क विपर्यासच आहे.

स्वतंत्र आणि भिन्न विक्रम

सोमभट्टास पाटलिपुत्राचा विक्रमादित्य ज्ञात होता, पण त्याने उज्जयिनीचा विक्रम स्वतंत्र आणि भिन्न होता हे दाखविले असता त्याची उपेक्षा करून चालणार नाही. विक्रम हे बिरुद काही फक्त चंद्रगुप्तानेच स्वीकारले असे नसून त्याचा उल्लेख पूर्वीही होताच. समुद्रगुप्तानेही विक्रम बिरुद लावल्याचे सर्वश्रुत आहेच. नाशिक गुंफेतील उल्लेखही त्या दृष्टीने महत्त्वाचा आहे; तो असा, "आकारवंती राजस सक यवन पाल्हव निसुदनस वरवारण विक्रम चारु विक्रमस्य खखरात वंसनिखसेस करस" गुणाढ्य हा सातवाहन नृपती हाल याचा समकालीन (contemporary) होता आणि त्याने केलेला विक्रमाचा उल्लेखही दुर्लक्षून चालणार नाही. राजरंगिणीकार कल्हण आणि नवसाहसांकचरितकार परिमल उज्जयिनीच्या विक्रमादित्याशी परिचित होते.

(१) तत्रानेहस्युज्जयिन्यां श्रीमान हर्षापराभिधः
एकच्छत्रश्चक्रवर्ती विक्रमादित्य इत्यभूत ॥ रा. त. ३ तरंग ॥

(२) अस्ति क्षितीजावुज्जयीनीतिनामा पुरी विहायस्यमरावतीव ।
बबन्ध यस्यां पदमिन्द्रकल्पः श्रीविक्रमादित्य इति क्षितीशः ॥
(परिमलाचे न. सा. चरित)

राजतरंगिणीमध्ये कल्हण तर स्पष्ट उल्लेख करतो.
अथप्रतापादित्याख्येस्तैरानीय दिगंतरात् । विक्रमादित्यम् भूर्तुर्ज्ञातित्राम्यर्षिचत
शकारि विक्रमादित्य इति संभ्रयाश्रितै । अन्यैरस्थान्यथलिखि विसंवादी कदर्थिनम् ।
विक्रमाच्या काळी काश्मीर राजघराण्याचा निर्वंश झाला आणि तेथील लोकांनी
विक्रमाच्या बांधवांपैकी प्रतापादित्यास सिंहासनावर बसविले.

उज्जयिनीचे राजे

डॉ. स्व. स. ल. कात्रे यांनी निर्देशित केलेला विक्रमादित्याचे धर्माध्यक्ष हरिस्वामी
याच्या कालाचा निर्णयही महत्त्वाचा आहे. हरिस्वामी हा विक्रमाचा समकालीन
(contemporary) होता, आणि त्याचा धर्माध्यक्ष होता असा स्पष्ट उल्लेख
करत आहे.

श्रीमतो अवंतिनाथस्य विक्रमस्य क्षितीशितुः
धर्माध्यक्षो हरिस्वामी व्याख्या कुर्वे यथामति ।


ह्याने आपला कालही दिला आहे. डॉ. कात्र्यांनी संपादन असे केले
यदादीनां (यदाब्दानां) कलेर्जुग्मः सप्तत्रिशच्छतनिवै चत्वारिंशत्समाश्वान्यास्तदा
भाष्यमिदं कृतम् । डॉ. कात्रे यांनी त्याचा अन्वय स्पष्ट करून योग्य दिशा दिली
ती अशी.

यदा काले अब्दानां त्रिशच्छतानि सप्त अन्यः चत्वारिंशत्
समाः च जग्मु वै दता इयं भाष्यम् कृतम् ॥

आणि ह्या आधारे हा काल ३०४७ कलियुगाच्या प्रारंभापासून सुरू होतो. ह्या त्यांच्या
शोधास अमान्य करण्याचे काही कारण दिसत नाही. चंद्रगुप्त विक्रमाच्या अधीन अवंति-
नगरी किंवा उज्जयिनी हे कधीच नव्हते, हे इतिहासवेत्त्यांनी मान्य न कल्यामुळे सर्व
घोटाळा झालेला आहे. माळव्यावर गुप्तांचे आधिपत्य होते हे त्यांच्या शिलालेखातून
दिसते हे मात्र खरे ! पण हे पूर्व माळवा (दशार्ण, अथवा विदिशा) प्रदेशासंबंधी विधान
आहे. उज्जयिनीसंबंधी नाही. उज्जयिनीस त्या कालखंडात रुद्र, रुद्रिल, जिष्णू, रविल,
आदिराजे राज्य करीत होते. त्यांची नाणी उज्जैनला शेकड्यांनी मिळाली आहेत. ही नाणी

नाग आणि मालव नाण्यांप्रमाणेच लहान आहेत. मालवगणाचे उज्जयिनीवरचे वर्चस्व गुप्ताची अवाढव्य सत्ता घालवू शकली नाही, आणि म्हणूनच उज्जयनीस आजपावेतो गुप्त शिल्प, गुप्त अभिलेख, आणि गुप्त नाण्यांचा पूर्ण अभाव दिसून येतो. (एखादे-दुसरे नाणे हा उपोद्‌बलक पुरावा ठरू शकत नाही) दशपूर–मंदसौर येथेही गुप्तांच्याच नावाचे वर्चस्व होते हे मान्य ! पण ते कुमारगुप्ताच्या काळी व केवळ १४–१५ वर्षे ! गुप्ताशी सत्तासंघर्षात माळव्यात गुप्त काली काही विशेष निर्मिती झाली नाही. आणि त्या काळी कालिदासाची विशाला–विशाला नगरी वैभवात परिपूर्ण नव्हती. उज्जयिनी उत्खननाचे प्रमाण–पुरावेही महत्त्वपूर्ण आहेत. क्षत्रपांचे वर्चस्व संपताच उज्जयिनी येथे भौतिक उन्नतीचा मार्ग अवरुद्ध झाला. गुप्तांच्या आक्रमणाने अवंति जनपद आर्थिक-दृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ शकले नाही हेही मान्य, पण ती परिस्थिती अस्थिरतेचे द्योतक आहे. पूर्णजय नव्हे ! विदिशेसही गुप्त आले, आणि त्यांनी द्वितीय पुष्यमित्र शाखेस नमवले. भीतरीच्या गुप्तलेखात समुद्रगुप्ताने " पुष्यमित्राश्च जित्वा " असा उल्लेख केला आहे. पण या वंशावर गुप्तांचे आधिपत्य फार काळ टिकले असे दिसत नाही. कारण ह्यांच्या मुद्रांवर गुप्तमुद्रांचा मुळीच प्रभाव दिसत नाही.

ह्या वंशात (१) पुष्यमित्र, रजोमित्र, बंधुमित्र आणि शत्रुविग्रह या नावाचे राजे झाले, व संभवतः या शत्रुविग्रहाने गुप्तांची विदिशेहून बोळवण केली (पराजय) असावी !



मौर्यानंतर उज्जयिनीस शुंगांचे राज्य असेलही, पण ते अल्पकाल टिकले. सातवाहनाचे व सातवाहन मांडलिकांचे राज्य या क्षेत्रात होते. ह्यामध्ये रट्टी मदन हा महत्त्वाचा राजा

असून याची ५० नाणी सापडली आहेत. दुसरे राजे सवित्र, दत्त, भूमिमित्र, आणि विजयन्त ह्यांनीही अवंतीवर राज्य केले. विजयन्ताच्या नाण्यावर एकीकडे शक्ती व दुसरीकडे उज्जैनचिन्ह आहे, तर त्याच्या दुसऱ्या नाण्यावर गौतमीपुत्रासारखा (सातवाहन राजा) पण अधिक वास्तववादी ग्रीक शैलीतला चेहरा व विजयन्त असा लेख आहे. मागे ससकुट-सूमेक आहे. ही नवीन नाणी प्रयत्नपूर्वक शोधानेच मिळाली आहेत.

महत्त्वाचे प्रमाण असलेली मुद्रा

विक्रमाच्या नाण्याचा अभाव त्याचे अस्तित्वच संपुष्टात येत असता, उज्जयिनी येथे गजकालिकेच्या जुन्या वस्तीत डॉ. वाकणकरांचे स्नेही व विक्रमविश्वविद्यालय पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी (अनुभवाने हा माणूस श्रेष्ठ पुरातत्त्वशास्त्री झाला. नुकताच दिवंगत झाला.) कै. नारायण भाटी यास एक मुद्रा सापडली. ही मुद्रा आज माझ्याकडे सुरक्षित आहे. हिच्यावर मध्ये म-कार युक्त स्वस्तिक आणि चारीकडे ब्राह्मी अक्षरात " क, त, स, उ, जे, नी, य " असे लिहिले आहे. याचे संस्कृत रूप ' कृतस्य उज्जनियः ' होईल. कृत नावाचा राजा अथवा व्यक्ती याची मुद्रा ही प्रथमच सापडली, तेव्हा आता विक्रम कालाचा आणि व्यक्तीचा काल निर्धारित करणे अधिक सोपे झाले. मुद्रा लिपिशास्त्राच्या दृष्टीने विक्रमपूर्व प्रथम शतकातील असावी, म्हणजेच वि. पू. प्रथम शतकात शकारिकृत अथवा विक्रम नावाचा राजा होता, ह्याला हे एक महत्त्वपूर्ण प्रमाण होय.

कालिदासाचा काळ

अर्थातच कालिदासाचाही कालनिर्णय निश्चित बदलावा लागेल. गुप्त कालाशी त्याचा संबंध असणे शक्य नाही. हे त्याच्याच काव्याच्या अंतर्बाह्य प्रमाणावरून सिद्ध होत आहेच. पण त्याचे अभिज्ञान शाकुंतलम् हे नाटक ह्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यातील शेवटच्या अंकात भरत सिंहाचे दात मोजतो हे दृश्य फक्त कालिदासानेच दाखविले आहे. ही कल्पनाच मुळी त्याची आहे व ती एका मातीच्या गोल आकारात कोरलेली सापडली आहे व ही मृण्मुद्रा डॉ. जगदीश गुप्त (रीडर, प्रयाग विद्यापीठ कै. डॉ. वाकणकरांच्या माहितीप्रमाणे) ह्यांना उ. प्र. मधील हरदोई जिल्ह्यात शहाबाद तालुक्यातील अंगाईखेड या गावात आढळली. ह्या मुद्रेवर एक लहान मुलगा सिंहाचे तोंड उघडत आहे असे दर्शविले आहे. अभिज्ञान शाकुंतलाच्या सातव्या अंकात १४-१५ या श्लोकात भरताचे वाक्य आहे, त्याचेच हे चित्रण आहे. ही मुद्रा डॉ. गुप्ता यांनी पुरातत्त्वाच्या दुसऱ्या अंकात (Vol.) प्रसिद्ध केली आहे असे डॉ. वाकणकर म्हणतात. त्यात काही इतर ज्येष्ठ तज्ज्ञांचीही मते दिलेली आहेत. एक श्रेष्ठ तज्ज्ञ ह्या मुद्रेस मागील चिन्हावरून इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकात ठेवतात तर एक श्रेष्ठ तज्ज्ञ हीच मुद्रा इ. स च्या ५ व्या शतकात ठेवतात. पण कै. डॉ वाकणकरांचे मते ही

दोन्हीही मते अग्राह्य आहेत आणि हेच जर त्या उभय तज्ज्ञांचे मत असेल तर, त्याच्या मागील इतर विधानांचा विचार करावा लागेल, त्यात कालनिर्धारणाच्या कसोट्या पुनश्च अभ्यासाव्या लागतील. मुद्रेच्या मागच्या बाजूस एक अलंकरणयुक्त वर्तुळ असून त्यात बुद्ध मांगलिक चिन्हांपैकी त्रिरत्न आणि श्रीवत्स दर्शवीत आहे. ह्या चिन्हांचा उपयोग मौर्यापासून-शुंग-सातवाहनापर्यंत झालेला दिसतो. पुढे मात्र नाही. अर्थात इ. स. च्या ३ ऱ्या शतकानंतर ह्या चिन्हांना मानणे इष्ट होणार नाही.

मेघदूतातील उज्जयिनीचे समृद्धचित्र गुप्तकाळी कधीच नव्हते. दक्षिणेतील उज्जयिनी पुरवराधीश गुप्त हे औलीकर अथवा परवर्ती पश्चिम गुप्तांचे वंशज असतील पण ते गुप्त राजवंशीय होते ह्यास मात्र प्रमाण नाही.

स्वतः समुद्रगुप्ताने कृष्णचरित्रात पुरातन कवींचा उल्लेख केला आहे. सम्राट समुद्रगुप्त श्रेष्ठ साहित्यिक होता हे त्याच्या सुवर्णनाण्यांवरून सिद्ध होते. त्यात त्याने क्षुद्रकाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. क्षुद्रकाच्या दरबारी अभिज्ञान शाकुंतलकर्ता (समकालीन) होता असेही तो म्हणतो. अनेक विद्वानांनी ह्या ग्रंथास प्रक्षिप्त मानले आहे. जर या ग्रंथाचा पूर्ण भाग सापडला तरच ह्याचे आणखी स्वरूप स्पष्ट होईल. ह्या ग्रंथात समुद्रगुप्ताने क्षुद्रकास शकारी आणि संवतप्रवर्तक असे म्हटले आहे व तो समुद्रगुप्तापूर्वी (इ. स. चे ४ थे शतक) झाला हेच ह्यातून सिद्ध होते.

गुप्तपूर्व काळाचे प्रमाण

स्वतः कालिदास अभिज्ञान शाकुंतलात " रसभावविशेषदीक्षागुरौ विक्रमादित्य अभिरूप भूयिष्ठा परिषदे " असा उल्लेख करतो. प्रारंभ विक्रमादित्याने व भरतवाक्यात " गणोल्लेख गणराज परिवर्ते "च्या रूपात करून गणाधिपती विक्रमाचा संकेत करतो. सम्राट विक्रमाचा नव्हे. गणाधिपती विक्रमाच्या जागी सम्राट विक्रमास आणून विद्वत्-जनांनी काय साधले कुणास ठाऊक ? पण उज्जयिनीचे अधिक विस्तृत व भव्य उत्खनन झाल्यास स्वच्छ प्रकाश पडू शकेल असा विश्वास वाटतो. तथापि आजपर्यंत उज्जैन उत्खननात जी काही पुरा सामग्री सापडली आहे, त्यावरून गुप्तकाळात उज्जयिनीची समृद्धता मुळीच दिसत नाही.

महाकवी कालिदासाचा काळ निश्चित होताच अनेक समस्या सुटू शकतील. कालिदासाने गुप्तराजांचा कुठेच उल्लेख केला नाही. उलट उल्लेख आढळतात ते गुप्तपूर्व कालातील उदयन, वासवदत्ता, अग्निमित्र, विक्रमादित्य यांचे ! चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, कुमारगुप्त व स्कंदगुप्त यांचे नव्हे; आणि भविष्यातील राजांचे तो उल्लेख कसा करेल ? त्याचे वर्णन माळव्याशी अधिक निगडित आहे. मगध, अयोध्या आणि कौशांबीशी नाही. तो शक-हूणांना भारतीय सीमेच्या बाहेर दाखवीत आहे. मालविका आणि मालव यांचा अन्योन्य संबंध आहेच. ह्या अंतर्बाह्य पुराव्याप्रमाणेच भरताचे चित्रही काल-

निर्णयासाठी सहाय्यक ठरत आहे. गुप्त काळापूर्वीच ते कोरले गेले, हे त्याचे महत्त्वाचे प्रमाण आहे; आणि त्याचमुळे कालिदासाचा काळही गुप्तपूर्व असणार यात शंका नाही. अर्थात् ह्या दोन पुराव्यांचे (मुद्रा व पदक) ह्या संदर्भात मूल्यमापन किंवा पुनर्मूल्यांकन (Revaluation) व्हायला हवे.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारताचे थोर इतिहासकार कै. वाकणकर ह्यांच्या संशोधन-कार्यरूपी स्मृतीला पुनश्च वंदन !! इति अलम् ।

संदर्भ सूची :

(१) तरुण भारत दीपावली अंक–१९७६
(२) विक्रम व कालिदास–श्री. के. चितळे (लेख)
(३) विक्रमांकदेव चरित
(४) कालिदास–डॉ. वा. वि. मिराशी

राधिकाविनोद

डॉ. रमेश आवलगावकर

वि. ल. भावे यांनी प्रकाशित केलेल्या महानुभाव महाराष्ट्र ग्रंथावली कविकाव्य सूचीमध्ये माधव कवीच्या नावावर रुक्मिणीपत्रिका व राधाविनोद ५० श्लोक अशी दोन काव्ये दिलेली आहेत. एरव्ही माधवमुनी नावाचा कोणताच महानुभावीय संत व त्याच्या साहित्यनिर्मितीबद्दलची माहिती वाचण्यात आलेली नाही.

महानुभावांच्या अनेक तत्त्वज्ञानात्मक वा गद्य-पद्याच्या बाडात अगदी शेवटी उरलेली जी पाने असतात, त्यावर स्फुटकाव्ये लिहिलेली पाहावयास मिळतात. बहुतांश हस्त-लिखितांच्या शेवटी ही रचना असतेच. या रचनांचे स्वरूप पत्र, आरती, पदे, चौपद्या, विनोदी काव्य, तत्त्वज्ञानात्मक चर्चा, चित्रे, यंत्रे इ. प्रकारे असते. प्रस्तुत काव्य अशाच एका हस्तलिखिताच्या मागे पाहावयास मिळाले. बदनापूर येथील श्री. शेवळीकर, महानु-भाव आश्रमातील संस्कृतचे गाढे अभ्यासक व महानुभाव तत्त्वज्ञानाचे चिंतक श्री. मनोहर शास्त्री यांचे जवळ असलेल्या पोथीत राधिकाविनोद हे काव्य लिहिलेले होते. या पोथीचा आकार ४½" × ३" असा असून त्यात पुढील विषय आलेले आहेत.

(१) संतोषमुनीकृत रुक्मिणीस्वयंवर संपूर्ण, लिपी : सकळा
(२) मंगलाष्टके ८ कडवी, लिपी : देवनागरी
(३) राधाविनोद ५० श्लोक संपूर्ण, लिपी : देवनागरी
(४) बीलमंगल २९ ओव्या संपूर्ण, लिपी : देवनागरी

पोथीचा कागद १००-१२५ वर्षांपूर्वीचा असावा. पोथीच्या शेवटी समाप्तिलेख नाही. पोथीच्या प्रत्येक ओळीत सुमारे १६ अक्षरे असून प्रत्येक पानावर १० ते ११ ओळी लिहिलेल्या आहेत. शाई काळी आहे.

राधिकाविनोद काव्याच्या शेवटी "संतोश जाला मग माधवासी" असा उल्लेख आला आहे. त्यावरून हे काव्य कवी माधवाने लिहिले असावे असे वाटते. परंतु

" माधव " हे कविनाम म्हणून समजणे अवघड आहे. रागावलेल्या राधिकेच्या मनाचे सांत्वन झाल्यावर, राधा कृष्णाची पूजा करून त्याचे स्तवन करते.

बैसोनिया मंचक आरुवारीसी
पूजा करूनी स्तविला मुरारी
संतोश जाला मग माधवासी
स्वानंद सुख दीधले तियेसी (४८)

या श्लोकावरून माधव हे कविनाम नसून ते कृष्णाला उद्देशून म्हटले आहे, असे वाटते. तथापि कृष्णाचे श्रीहरी (१, १३, १६, ४९); हरी (४७); मुरारी (१९, २७, २८, ४०, ४६, ४८); मुकुंद (२२); ही नावेदेखील पाहावयास मिळतात. शिवाय कृष्णाला उद्देशूनच " बोले मग माधव राधिकेसी : कावो अबोला धरीला आम्हासी " (१७) असा माधव म्हणूनही उल्लेख आहेच. तेव्हा माधव वा माधवमुनी नावाच्या एखाद्या महानुभाव संताची ही रचना असू शकेल, असे संभवत नाही. म्हणजेच या काव्याचा कर्ता अनामिकच राहतो.

राधिकाविनोद हे काव्य शृंगाररसपूर्ण काव्य असून यात राधा व कृष्णाचा संवाद अतिशय सुंदर शब्दात वर्णन केलेला आहे. ओव्यांची भाषा अत्यंत सोपी आहे. एके दिवशी राधेला तिच्या घरी येण्याचे आश्वासन देऊन श्रीकृष्ण निघून गेला. श्रीकृष्ण येणार म्हणून तिने आपले शयनागार सजवले. अभ्यंग स्नान करून विविध अलंकारांनी तिने स्वतःला सजविले; आणि श्रीकृष्णाच्या आगमनाची वाट पाहात ती बसली. तिची तनू कामासक्त झाली होती. मनोमनी वेगवेगळी स्वप्ने पाहू लागली. तिच्या मनाची तगमग चालली होती. रात्र तरुण झाली, तरी कृष्ण आला नाही; रात्र निघून गेल्यावरच श्रीकृष्ण आलेला पाहून ती रुसून बसली. रात्री आणखी दुसरी वधू आपण भोगून आलात नि मला फुकटचे आश्वासन दिले; मी आपली वाट पाहात रात्रभर तळमळत होते, असा ती आपला राग व्यक्त करते. यावर श्रीकृष्ण तिची समजूत घालून तिचा राग शांत करतो व शेवटी राधाकृष्णाचे मीलन होते व शेवट गोड होतो. हा या काव्याचा विषय आहे.

या काव्यात राधा ज्या वेळी नटते, तेव्हा तिने परिधान केलेली अलंकरणे पाहण्या-सारखी आहेत. तकटांबराची चोळी, वेणीवर विविध पाने व फुले खोवली आहेत. खड्याच्या अंगठीवर केतकीची गुंफण केलेली आहे. कुंकुवाची कुहिरी कासव व त्यावर मासळी अशा आकाराची आहे. डोक्यावर गुंफण्याची चंद्रहंस फुले, कानातली कुंडले, रत्नाच्या माळा, मोहनमाळ, वाळेसरी, बाजुबंद, रत्नबंध असलेल्या बांगड्या, पाटल्या, दहाही बोटांतील अंगठ्या, पैंजण, घुंगरू असलेली जोडवी इत्यादी अलंकार लक्षणीय आहेत.

रात्र उलटून गेल्यावर श्रीकृष्ण आला म्हणून राधा रुसून बसली आहे. ती रुसून बसली कशी हे कवी वर्णन करतो.

कमळावरी ठेउनी कमळाला
झाकुनी बैसे मुख पंकजाला ॥१७॥

दोन्ही हात कमळे व मुख हेही कमळच ! उपमा देण्याची ही हातोटीही लक्षणीय आहे.

राधा व कृष्णाचा प्रेमविषय काही मराठी कवींना नवीन नाही. श्रीधराच्या 'हरि-विजयात' तर कृष्ण-राधेच्या प्रेमाला उधाणच आलेले आहे. कदाचित त्यातील कथेचाही परिणाम की काय या कवीनेही तोच आशय या काव्यात आणलेला असावा. कृष्ण लहान असतानाच राधा व कृष्णाचा संबंध जोडण्यात कवीनी 'धन्यता' मानली आहे. हाही कवी त्याला पारखा नाही. रागात असलेली राधा कृष्णाला म्हणते की तू बाळ असतानाच मी जेव्हा तुला कडेवर घेतले तेव्हा तू माझे मुखपंकजाचे चुंबन घेतले व माझ्या दोन्ही स्तनांचे मर्दन केले. तेव्हापासूनच तुझ्या स्पर्शाने रतिसुखाची माझ्यात आवड निर्माण झाली. राधा कृष्णाच्या प्रेमाचा हा विषय आपल्या प्राचीन मराठी कवितेच्या अंगवळणी पडलेला आहे.

या काव्यातील राधा-कृष्णाच्या संवादातील शब्दसौंदर्य, अर्थसौंदर्य मुळातूनच पाहण्यासारखे आहे.

राधिकाविनोद

॥ श्रीपरेशायन्मा: ॥

येके दिसी श्रीहरी राधिकेसी : येतो म्हणे मि तुझिया ग्रहासि
श्रृंगारुनि मंदिर सिध किजे : उदागरे मंदीर धुपविजे ॥१॥

सांगोनि गेला हरि राधीकेसि : चंद्राननेच्या मग भुवनासि
येरिकडे ते मग राधीकेनें : अभ्यांग केलें सुमने स्नेहाने ॥२॥

मांडोनिया दर्पण एक थोर : राहोनि उभी करिते श्रृंगारें
दीव्यांबरें वेढुनि दाभ घाली : तकटांबराची मग चोळी घाली ॥३॥

घालुनी वेणी बहु कुशरीनें : पाने पट्या पाडुन विप्रतीनें
गुंफुनि नाडे मग केतकेसी : खोउनि बांधे मुदरा खडीसी ॥४॥

या नंतरें ताईत भोकरासी : मछातळीं काशव कुहीरीसी
बांधे मयोरा मग रावयासी : बोरें फळें आवळ्यासी ॥५॥

गोंडे झीबी गुंफुनी रम्य वेणी : रुळे नीतंबी जडीत आभरणी
बांधे मग सीस फुलें चंद्रहंस : त्या उर्द्रजाळी झळके वीशेशें ॥६॥

कर्नि मग घालीत कुंडलाम्री : बुगड्या सुरंगा आनी भोवरासी
पंखे लवंगा आणि खुंट बाळ्या : फुलें आनी कोतमीरी नीराळ्या ॥७॥

नागोतरे घालुनि कर्ण झेली : झोकीत कर्णा म्हणूनी निघाली
नयनांबुज रेखुनि मुक्तिकेसी : घालुनि भांग भरी कुंकुमासी ॥८॥

या नंतरें लाउनि भांगटिळा : पदके गळा घालुनि रत्नमाळा
यकावळी ताइत दुलडीसी : बांधोनि निघाली सरीसा खळ्यासी ॥९॥

पेटी अंबर सानव रत्नें जाळी : चीतांगतेची चपटी नीराळी
हारावरी मोहनमाळ घाली : या नंतरें ते हयकोल ल्याली ॥१०॥

त्या ताळेबंद्यावरी बाजुबंदें : घाली चुडयासी मग रत्नेंबंध
वाळेसरी आनीक पाटल्यासी : दसांगुळे मंडीत मुद्रीकेसी ॥११॥

घाली पदी पैंजन सांखळ्याला : वाळेशरे घुंगरु जोडव्याला
केला शृंगारें मग लोचनने : घाली मग मंचक दीव्यमानें ॥१२॥

सेजें करी सुमन आरुवारी : सभोवत्या लाउनि दोपहारी
पत्रें फळें कस्तुरी चंदनेसी : आणुन ठेवी उद आगरासी ॥१३॥

यैस्यापरी सर्वही सीध केलें : तेरा गुनाचें मग स्वीकरीलें
बैसोनि वाट पाहाती श्रीहरीची : कामतनु व्याकुळ राधीकेसी ॥१४॥

वांछी मनी मन्मथ थोर बाळा : उठे बसे ते मग वेळोवेळा
येउनीया बाहेर वाट पाहे : कोठे दीसेना मग आत जाये ॥१५॥

नीद्रा न लागे वीरहे ज्वराने : व्याकुळ केली रतीच्या पतीनें
कंदर्पव्यथा बहु सोसवेना : क्षणमात्र काही सहसा गमेना ॥१६॥

ऐस्या प्रकारें रजनी नीमाली : प्रभात वेळा मग ते उदैली
आले मगें श्रीहरी मंदीरासी : पाहोनी राधा रुसली तयासी ॥१७॥

कमळावरी ठेउनी कमळाला : झाकुनी बैसे मुख पंकजाला
बोले मग माधव राधीकेसी : का वो आबोला धरीला आम्हासी ॥१८॥

परी ते न बोले उगलीच आसे : चीत्रापरी मंडीत रूप भासे
कीमर्थ तु गे न वदेस गोष्टी : पुसे तीयेसी मग धुरजेणी ॥१९॥

जाउनि तिच्या धरीले करासी : झींजाडुनी दे मग सत्वरेंसी
आन्याय काय पुसती मुरारी : का रुसलीस मज सांग नारी ॥२०॥

तु प्राणप्रिया मनीची जीवाची : माझी सखीं तु आवडी प्रीतीची
आयेकोनि राधा मग बोलताये : आवडी प्रीतीची तीक[डे]च पाहे ॥२१॥

रात्री क्रमुनी नीशंक तेथें : का व्येर्थ यावें उगलेंचि येथें
जावे आता जे आवडे मनासी : आसैल जेथें सकी प्राणयची ॥२२॥

मी सीन्नली पाहाता वाट व्यर्थ : श्रुंगारुनी मंदीर हे समस्त
बोले मुकुंद आनी आदरेसी : तु व्येर्थ कां वे मज कोपलीसी ॥२३॥

नाही दुजा गे मज भाव पोटी : तु प्रीतीची गे मज यक श्रृष्टी
हे गोड बोल तुमचे असो द्या : जाणें मनीची तुमची कुविद्या ॥२४॥

संका न वाटे वदता तुम्हाला : भोगोनी नारी क्रमीले नीसेला
हळुचि आतां यउनी गृहासी : मीथ्यां वदावे गृह उतरासी ॥२५॥

प्रसीद्ध चिन्हें दिसतात गात्री : भाळी कुंकु कर्ज का द्विनेत्री
आरक्तता दीसत लोचनासी : कुचंबळेसे मुखपंकजासी ॥२६॥

का सुकलें सुमन हारकंठी : कां सुटली मस्तक मोरवेठी
चोळौनि गेली उटी चंदनाची : हे लागलीसे हळदी तीयेची ॥२७॥

ऐस्या खुणा दीसत फार देही : जा वाट पाहे प्रीतीची स्वगृही
तेऱ्हा मुरारी वदे राधीकेसी : तु व्येर्थ बोल मज लावीतेसी ॥२८॥

कैची दुजी आनीक कोण कांता : ते सांग राधे मज सीघ्र आता
हे सत्य मानी वचनासी नारी : राधा म्हणे जाण वदे मुरारी ॥२९॥

भोगोनि यावें दुशरे वधुसी : आनृत्य वाक्य वदीजे आम्हांसी
चेंद्राननेच्या सदनासी गेला : क्रमुनिया रात्र मग येथ आला ॥३०॥

जावें सदा तु तीकडेची आता : आवडे मनासी तुज तेचि कांता
हे सर्व मिथ्या म्हणती श्रीकृष्ण : घे भोग क्रिया आन हे प्रमाण ॥३१॥

काढोनि ते देतों तुजला ख्यासी : कीं तप्त तेलें न्हाउं परेसी
की वर्पुनी पाहार तुज दाउ : पान्यावरी चालुनि सीघ्र येउ ॥३२॥

की वीश भक्षु पाहासील आता : की सर्प हाती धरूनी प्राणहार्ता
आंतरीक्ष जाउन भूमंडळासी : की बोल उगे तरु स्वापदासी ॥३३॥

जे सांगसी ते करीना क्रीयेला : ऐकोनी राधा म्हणती हरीला
तू नाटक चेटक जाणतोसी : कौशाल्य मल्ल भवन त्रयासी ॥३४॥

भाव कळेना सीधसाधकाला : भाव कळेना रुषी ब्राह्मणाला
भाव कळेना धरणीधराला : भाव कळेना चतुराननाला ॥३५॥

वोडबरी मोहन लाघवासी : स्त्रीत्रैस्य करणे रती स्तंभनासी
कौटाल्येकर्नी बहु जाणतोसी : कौसाल्य तुझें न कळें सुरासी ॥३६॥

त्वा पावक ग्रासुनी भस्म केला : रीठासुर मर्दुनि फोडियला
नाना लीळा तुं करीसी चरित्र : नाना क्रीया लाघव काम तंत्र ॥३७॥

मी सर्व जाणे तुझीया कळेसी : जेव्हा हारी तु आवतरलासी
आले पाहाया सुख संभ्रमेसी : म्या घेतलें आवडीने कडेसी ॥३८॥

तेव्हा कसे चेष्टविलें तनुला : चुंबुनि माझ्या मुख पंकजाला
मर्दुनियां त्वां कुचक मळाला : केले मला त्वा रतीच्या सुखाला ॥३९॥

आश्चर्य जालें मजला मनात : कापटरूपी कळले जीवांत
तै पासौनी मी पाहात चरीत्र : असो आता हे वदता वीचीत्र ॥४०॥

बोले मुरारी वदतो प्रमाणें : तु राग आता करी साम्य जाणें
देवाल्यभुवनी हारी कीर्तनासी : आइकोनि तेथे क्रमलें नीसेसी ॥४१॥

भासेति चीन्हं तुजला तनुसी : आइकाभिप्रावों वदतो कथेसी
गेलो परा मी परता परेसी : सुभक्त माझे करीती पुजेसी ॥४२॥

ते लागलें कुंकुम नीडळाला : सुरमा पाहो गे नयनांबुजाला
मी माल्य युद्ध करीता उठीला : चोळोनि उटी तुटले हाराला ॥४३॥

मयोर कंठी सुटलीं धक्यानें : द्विनेत्र लाजले तयानें
मल्हारी वाघा मग तेथ आला : भांडार तो टाकुन सीघ्र गेला ॥४४॥

तुझ्या मनाला संसयो उदैला : जे भोगीलेसें आनीके वधुला
मज प्रीतीची तु बहु फार होसी : तु वेगळी स्त्री नवडे मनासी ॥४५॥

ऐकोनि राधा वदे उतरासी : चंद्राननेच्या वाहावें आनेसी
मी नावडे ते आवडे जीवासी : गोडी नवी लागलीसे तीयेची ॥४६॥

हे सर्व मिथ्या म्हणतो मुरारी : तू व्यर्थ वाणी वदसी वगत्री
ने नमनी मी अनुमात्र नारी : हास त्या भाव मनी आवधारी ॥४७॥

हांसौनि राधा मग सत्वरेसी : प्रणम्य केला हरीच्या पदासी
आलींगने देउनी संभ्रमेंसी : घेऊनि गेली निजमंदिरासी ॥४८॥

बैसोनिया मंचक आरुवारीसी : पूजा करुनी स्तविला मुरारी
संतोश जाला मग माधवासी : स्वानंद सुख दीधले तियेसी ॥४९॥

आहीक्य जालें हारी राधीकेसी : तुटोनी गेलें प्रीतीच्या कल्होसी
संतोश जाला कवीच्या मनासी : वदो पुढां श्रीहरीच्या कथेसी ॥५०॥

॥ एवं राधाविनोद संपूर्ण ॥

कसबा संगमेश्वर येथील गजांतक शिव

श्री. र. रा. बोरकर
पुरातत्त्व विभाग, लोकमान्य टिळक जन्मभूमी, टिळक आळी, रत्नागिरी.

कसबा संगमेश्वर हे गाव केवळ महाराष्ट्रलाच नव्हे तर, संपूर्ण भारताला छत्रपती संभाजी महाराजांच्या अटकेमुळे ज्ञात आहेच. त्यामुळे या गावी चालुक्यकालीन मंदिर-समूह आहे, इकडे म्हणावे असे लक्ष जात नाही. ग्रांथिक पुराव्यावरून तेथे एकूण ३६० मंदिरे उभारली गेली होती, असे दिसते. परंतु आज त्यांपैकी फक्त आठ-दहा मंदिरे बऱ्यापैकी निसर्गाशी झगडा करीत उभी आहेत. ह्या मंदिरांचा मुकुटमणी शोभावा असे



चालुक्य राजा कर्ण यांनी पायाभरणी केलेले कर्णेश्वर मंदिर आजही मोठ्या डौलात निसर्गाशी समर्थपणे सामना करीत उभे आहे. त्याच रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा संगमेश्वरच्या मंदिरसमूहाच्या परिसरात अनेक प्राचीन मूर्ती शिल्पे अस्ताव्यस्त असुरक्षित स्थळी पडली असल्याचे निदर्शनास येतात. त्यांपैकी काही मूर्ती अलीकडेच पुरातत्त्व विभागाच्या रत्नागिरी कार्यालयाने मूर्तींचे महत्त्व लक्षात घेऊन रत्नागिरी येथील

कार्यालयात स्थलांतरित केल्या आहेत. ह्यातीलच अशा एका मूर्तीचे शास्त्रदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दुर्मिळ समजल्या जाणाऱ्या गजासुरवध मूर्तीचे, असुराचा वध करणाऱ्या शिवाच्या एका आगळ्या वेगळ्या आणि दुर्मिळ अशा मूर्तीचा परिचय करून देण्यासाठी हा प्रपंच मांडला आहे.

गजासुरवधसंबंधीच्या कथा कूर्मपुराण, वराहपुराणात आढळतात. आणि या कथांवर आधारित गजासुरवध मूर्ती काही ठिकाणी मिळाल्याची उदाहरणे सुद्धा आहेत. त्याचा उल्लेख पुढे येईलच.

उक्त प्रकारच्या शिव प्रतिमेचे सामान्यतः दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते : (१) अनुग्रहमूर्ती आणि (२) संहारमूर्ती.

कसबा संगमेश्वर येथील मूर्ती 'संहारमूर्ती' प्रकारातील गजासुरवध मूर्ती होय.

मूर्तीचे वर्णन : गजासुरवध मूर्ती

सदर मूर्ती ०.८५ सें. मी. उंच, ०.७३ सें. मी. रुंद आणि ०.२२ सें. मी. जाड ह्या आकाराची असून मूर्ती काळ्या बेसाल्ट पाषाणात कोरली आहे. मूर्ती बनविण्यास वापरलेला पाषाण हा स्थानिक आहे, हे इथे अगत्याने नमूद करणे आवश्यक आहे. मूर्ती देवकोष्ठात कोरली आहे. देवकोष्ठाचे खांब गोलाकार असून वरील भाग नक्षीकृत आहे. खांबाच्या बाजूस सिंहव्याल कोरले आहेत. शिव त्रिभंग तांडव नृत्य करीत असून त्यास द्वादशभुजा आहेत. त्याने बारा हातांपैकी डाव्या बाजूच्या सहा हातांत अनुक्रमे वरून (१) गजचर्म (२) कपाल (३) नाग (४) अभय (५) खड्वांग (हात तुटलेले) आणि (६) उजव्या पायाच्या मांडीवर ठेवलेले. उजव्या बाजूकडील हातात अनुक्रमे वरून (१) गजचर्म (२) डमरू (३) कमळकळी (४) त्रिशूल (५) त्रिशूलाच्या टोकास आधार देत असलेले आणि (६) गजदंत इत्यादी आयुधे धरली आहेत. तसेच वरील दोन्ही हातांनी गजचर्म घट्ट पकडले आहे.

शिवांनी करंडमुकुट, कुंडले, केयुर, उदरबंध, वैजयंतीमाला, कटकवलय, पादवलय इत्यादी अलंकार परिधान केले आहेत. पाद पीठावर वीणावादक, मृदंगवादक, बासरी-वादक मंडळी कोरली आहेत. तसेच शिवाचे वाहन नंदी त्यांनी वर उचललेल्या उजव्या पायाजवळ कोरले आहे. शिवाने आपला उजवा पाय तांडव नृत्याकरिता उचललेला दिसतो. डाव्या पायाजवळ पार्वती भयभीत होऊन पळत सुटल्याचे दाखविले आहे. आणि शिवाने ज्या मदमस्त असुररूपी गजाचा संहार केला त्या हत्तीचे मुंडके डाव्या बाजूस दाखविले आहे. सर्वांत महत्त्वाचे ह्या मूर्तीचे लक्षण असे की, शिवाने त्या गजाचे गजचर्म संपूर्ण शरीराभोवती वरील हाताच्या आधारे धरले आहे आणि मूर्तीच्या सर्वांत वरच्या अंगावर हत्तीचे दोन पाय कोरले आहेत.

कूर्मपुराण आणि वराहपुराणातील गजासुरवध मूर्तींच्या संबंधातील कथा

कूर्म पुराणात गजासुरवधाची कथा वाराणशी येथील कृत्तीवासेश्वर लिंगाच्या
प्रसंगाने येते. ह्या शिवलिंगाच्या भोवती बसून नित्यनियमाने ब्राह्मण मंडळी ध्यानधारणा
पूजापाठ इत्यादी करीत असत. एक असुर, हत्तीच्या रूपात तेथे येतो व ब्राह्मणांच्या
पूजाविधीत ध्यानधारणेत व्यत्यय आणतो. त्याने ब्राह्मणास त्रास देण्यास सुरुवात
केली हे पाहून शंकराला त्या असुराचा फार राग आला आणि तो लिंगातून बाहेर येऊन
त्यांनी त्या गजासुराचा वध केला. त्याला ठार मारले आणि त्याचे कातडे उत्तरीय
म्हणून अंगावर पांघरले. अशी कूर्मपुराणात कथा आहे.

वराहपुराणात

असुराचा राजा अंधक पार्वतीस पळविण्याचा खटपटीत असता, नील नावाच्या
त्याच्या असुराने वेगळाच बेत करून हत्तीचे रूप घेतले आणि शंकराला मारण्याचे
ठरविले. शंकराचे वाहन नंदीस ही बातमी कळताच त्याने ती वीरभद्रास सांगितली.
वीरभद्राने सिंहाचे रूप घेतले आणि गजरूपी नीलाला मारले. त्याचे कातडे वीरभद्राने
शंकराला दिले. शंकराने ते उत्तरीय म्हणून पांघरले. यानंतर सर्व साहित्यासह (आयुधां-
सह) निघून शंकरांनी अंधकासुराला मारले अशी वराहपुराणात कथा आहे.

गजासुरवधाच्या कथेची काही इतरही रूपे वाङ्मयात आढळतात. काही विद्वानांच्या
मते उत्तर भारतात गजासुरसंहार आणि अंधकासुरसंहार याचे संमिश्रण केले जाते.
तसेच बंगालमध्ये याबरोबरच भैरवालाही स्थान देतात. शैवागमनात या प्रतिमेचे बरेच
वर्णन मिळते. हिची मुख्य ओळख म्हणजे शंकराने अंगावर घेतलेले हत्तीचे कातडे हे होय.

प्राचीन वाङ्मयात मूर्तींच्या संदर्भात उल्लेख

१. अभिलषितार्थ चिंतामणी

साधारणपणे शिवाला पण दहा हात व आयुधे, नृत्य मूर्तीप्रमाणे असावेत असा
उल्लेख केला आहे.

२. अंशमद्भेदागम

सामान्यपणे डाव्या पायाखाली गजाचे मस्तक, मुकुटावर गजाचे पुच्छ, उजवा पाय
वर उचललेला, डाव्या बाजूस स्कंद आणि पार्वती, चार किंवा आठ हात त्यात आयुधे,
जसे पाश, गजचर्म, गजदंत, शूल, डमरू, कपाल, खड्ग, ढाल, घंटा इत्यादी असावेत
असा उल्लेख आहे.

३. श्रीतत्त्वनिधीमध्ये

डावा पाय गजमस्तकी, उजवा उचललेला, सहा हात त्यात शूल, असि, शृंग, मृग, सूचिमुद्रा, इत्यादी आणि बाजूस उमा आणि स्कंद असावेत असा उल्लेख आहे.

प्रत्यक्षात शिल्परूपात केव्हा आले ?

गजासुरवधासंबंधीचे उल्लेख प्राचीन ग्रंथांतून मिळत असले तरी प्रत्यक्षात गजासुरवध मूर्तिरूपात घडविण्यास सुरुवात गुप्त काळापासून झाली होती, असे प्राप्त मूर्तिशिल्पावरून दिसते. कानपूर (उत्तर प्रदेश) जिल्ह्यातील भितरगाव येथील इष्टिका मंदिराच्या एका अतिशय खण्डित मृद्‌फलकाच्या आधारे करता येते. पण याला पाहून प्रतिमेच्या हाता किंवा आयुधांविषयी बोलता येत नाही. भुवनेश्वरच्या वेताळ मंदिरातसुद्धा गजासुरवधमूर्ती बसविलेली आहे. गजासुरवधमूर्ती प्रकाराविषयी सामान्यतः असे निदर्शनास येते की, ह्या मूर्ती उत्तरेपेक्षा दक्षिणेत संख्येने अधिक प्रमाणात मिळतात. त्यातही त्यांची ज्ञात असलेल्यांची संख्या बोटांवर मोजण्याइतकीच आहे. आजतागायत आपणास भितरगाव (उ. प्र.), भुवनेश्वर (ओरिसा), ग्वाल्हेर (म. प्र.), तंजावर (तामिळनाडू), कैलास लेणे (म. रा.), विरूपाक्ष मंदिर पट्टदकल (कर्नाटक) आणि हळेबीड इत्यादी ठिकाणच्या प्रतिमा ज्ञात आहेत.

विश्लेषण

गजासुरवध मूर्ती ही शिवाच्या ' संहारमूर्ती ' प्रकारापैकी आहे, हे आपण पाहिलेच आहे. तसेच संपूर्ण भारतात आजपर्यंत बोटावर मोजण्याइतक्याच प्रतिमा ज्ञात आहेत. आणि म्हणूनच संगमेश्वर येथील गजासुरवध मूर्तीस ओघानेच विशेष महत्त्व प्राप्त होते. याहीपेक्षा ही मूर्ती महत्त्वाची ठरते ती ह्यासाठी की, आजपर्यंत मिळालेल्या गजासुरवध मूर्ती ह्या आठ किंवा दहा हाताच्या आहेत. परंतु ही मूर्ती बारा (द्वादश) हातांची आहे. तसेच संपूर्ण हातातील आयुधांचे वर्णन करता येते. तसेच तिच्या संपूर्ण अंगोपांगाचे वर्णन करता येते. ह्याकरिताच ही मूर्ती मूर्तिशास्त्रदृष्ट्या महत्त्वाची ठरते. तसेच प्राचीन ग्रंथात वर्णनीत पुराव्यानुसार कलाकाराने संपूर्ण मूर्ती घडविली आहे. म्हणूनच ह्या मूर्तीचे अनन्य साधारण महत्त्व आहे. आणि मूर्तिशास्त्राच्या अभ्यासकास महत्त्वाची वाटावी ह्यात नवल नाही. इथे उणीव भासते ती स्कंदाची. श्रीतत्त्वनिधीनुसार पार्वती व स्कंद असावे असा उल्लेख आहे. पण इथे केवळ पार्वतीच दाखविली आहे. हे या मूर्तीचे अजून एक वैशिष्ट्य दिसते.

काळ

सदर मूर्ती देवकोष्ठात कोरली आहे. तसेच देवकोष्ठाच्या कडेला स्तंभाला लागूनच

सिंहव्याल कोरली आहेत. तसेच मूर्तीच्या इतर वैशिष्ट्यांवरून सदर मूर्ती इ. स. १०व्या शतकातील असावी असे निश्चितपणे सांगता येते.

निरीक्षण

कूर्मपुराणात उल्लेखित कथेशी संबंधित आणि अंशुभेदागमनात उल्लेखनीय मूर्ती-विषयीच्या योजना चित्र थोड्या फार फरकाने कलाकाराने जसेच्या तसे ह्या मूर्तीद्वारे उभे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. संपूर्ण योजना चित्र ह्या मूर्तीत सामावलेले आहे. नित्यनियमानुसार ध्यान, धारणा करणाऱ्या ब्राह्मणांस असुररूपातील हत्ती त्यांना त्रास देत आहे. त्यांच्या पूजाविधीत व्यत्यय आणीत आहे असे शंकरास कळल्यानंतर आणि ब्राह्मणांनी याचना केल्यावरून मुळातच उग्रप्रवृत्तीचे शंकर क्रोधाने लाल झाले असावेत. त्याच्या मुखावरील क्रोधमय भाव कलाकाराने मोठ्या खुबीने कोरले आहेत. रागाने बेभान झाल्यामुळे शंकराच्या डोक्यावरील केशसंभारसुद्धा विस्कटलेले अस्ताव्यस्त झालेले दिसते. गजासुराचा वध केल्यानंतर त्याच्या भक्तगणात आनंदाची लाट उसळली असावी असे दिसते. त्या प्रसंगाचे उत्कृष्ट भाव येथील पादपीठावर कोरलेल्या अन्य मूर्तींच्या चेहऱ्यावर दाखविले आहे. शंकरानी असुराचा वध करताच एक बासरी वाजवीत तर दुसरा मृदंग बडवीत आहे आणि तिसरा वीणेची तार छेडीत आहे आणि अशा प्रकारे ही मंडळी गजासुरवधाचा आनंदोत्सव मोठ्या थाटात साजरा करीत आहेत ह्याचा भास झाल्याशिवाय राहवत नाही. याप्रसंगी शिवसुद्धा त्रिभंग तांडव नृत्यात अगदी निमग्न झालेले आहे. ह्या सर्वांत महत्त्वाचे ते पार्वतीचे योजनाचित्र. शंकराचे क्रोधमय मुख आणि तांडवनृत्य बघून पार्वतीचे अगदी दमछाक झाल्याचे उत्कृष्ट भाव कलाकारांनी कोरलेले आहेत आणि पार्वतीस शंकराचा क्रोधाग्निमय चेहरा बघणे असहाय झाले म्हणूनच काय तिने तेथून पळ काढला आहे. ती अक्षरशः घाबरली आहे (अर्धांगी असूनसुद्धा). पार्वतीच्या पळत सुटण्याचे दृश्य खरोखरच कलाकाराने मोठ्या खुबीने येथे कोरलेले दिसते. त्याचे वर्णन करण्यास शब्दच नाही. त्याकरिता आणि इतर मूर्तींतील इतर सोहळा बघण्याकरिता सदर मूर्ती प्रत्यक्षातच बघावी लागेल; त्याशिवाय पार्वतीच्या चेहऱ्यावरील हावभावाची संपूर्णपणे कल्पना येणार नाही.

तिलकयुगीन इन्दौर और विस्मृत क्रान्तिकारी*

डॉ. वि. ना. हंडियेकर, ५२ शास्त्रीनगर, भंडारा

ई. १८५७ के प्रथम भारतीय स्वाधीनता संग्राम में मध्यभारत क्षेत्र का भी विशेष योगदान रहा है। उत्तर भारत में फैले इस दावानल से इस क्षेत्र का होलकर राज्य भी अछूता न रह सका। किन्तु इस स्वाधीनता संग्राम को अंग्रेजों ने नृशंसतापूर्वक कुचल दिया था। फिर भी कहना होगा कि स्वतंत्रता प्राप्ति की आग कभी बुझ न सकी। तत्कालीन इन्दौर राज्य के नरेश तुकोजीराव होलकर (द्वितीय) की भूमिका इस संदर्भ में संदिग्ध समझी जाती है। १८५७ के प्रारंभिक दिनों में वे देशभक्तों को गुप्त समर्थन एवं अप्रत्यक्ष रूपसे सहायता करते रहते थे।[1] किन्तु परिस्थितिवश वे आगे न बढ सके। अन्ततः यह संग्राम असफल हुआ। जून १८८६ इ. में तुकोजीराव का निधन हुआ। शिवाजीराव होळकर का १० जुलाई १८८६ को राज्याभिषेक हुआ। उन्होंने लगातार ब्रिटिश सरकार का विरोध किया। उनकी टकराव की भूमिका के कारण ब्रिटिश सरकारने ३१ जनवरी १९०३ को गद्दी छोडने के लिये बाध्य कर दिया।[2] इसके साथ ही ब्रिटिश सरकारने अनेक षड्यंत्र रचे। अपने राजा के प्रति किये गये षड्यंत्रों और दुर्व्यवहारों से प्रजा में रोष उत्पन्न होना स्वाभाविक था। राज्य प्रशासनपर ब्रिटिश हुकूमत की अप्रत्यक्ष स्थापना हुई।[3] फिर भी किसी को भी उसका प्रकट विरोध करने का साहस न हो सका।

ई. १८८५ में भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस की स्थापना से, ब्रिटिश विरोधी जनजागरण का वातावरण निर्मित होना प्रारंभ हुआ। लो. तिलक के अभ्युदय से युवकों में नई प्रेरणा, जागृति और चेतना निर्मित हुई। साथही स्वाधीनता के लिये कठोर संघर्ष, त्याग, बलिदान और स्वदेशी वस्तुओं के प्रचार की भावना भी बढी। राष्ट्रीय जागरण की वृत्ति को इससे गति आने लगी। इन्दौर रियासत के नवयुवकों ने कॉंग्रेस के

---

* नोट : १९ वे नागपूर– अमरावती विद्यापीठ इतिहास परिषद अधिवेशन अमरावती शोध निबंध प्रस्तुत एवं स्वीकृत जनवरी-फरवरी १९८७

अधिवेशन में भाग लेना शुरू किया।[4] साथही दिशा प्राप्त कर कार्य करना प्रारंभ किया। ई. १९०५ के बंगभंग की प्रतिक्रिया पर काशी में हुये और ई. १९०७ के सुरत के कॉंग्रेस अधिवेशन में होलकर महाविद्यालय के १५–२० छात्र भी सम्मिलित हुए थे।[5]

महाराष्ट्र के पूना, बंबई, कोल्हापूर, नासिक आदि स्थानों का इन्दौर से सीधा संपर्क रहा है। इन नगरों के मित्र परिवार एवं रिश्तेदार इन्दौर में रहते थे। इसलिये वहां की राष्ट्रीय गतिविधियों ने इन्दौर की राष्ट्रीय चेतना को भी प्रज्वलित किया। उदाहरण-स्वरूप कोल्हापूर का शिवाजी क्लब, पूना और बंबई के गणेश उत्सव और 'मुष्टिफंड', नासिक की 'अभिनव भारत' संस्था और 'मित्र समाज' आदि संस्थाओं की इन्दौर में भी अपने ढंग की स्थापना हुयी। उनसे सम्पर्क रहने लगा। इस कार्य में अनंत अप्पाजी लेले, दामुअण्णा भिडे गुरुजी और हणमंतराव अण्णाजी कुळकर्णी के नाम इसी संदर्भ में उल्लेखनिय हैं।[6] १८९१ में कोल्हापुर में स्थापित शिवाजी क्लब के लेले तथा कुळकर्णी सक्रिय सदस्य थे। उनकी क्रान्तिकारी गतिविधियों के कारण उन्हें महाराष्ट्र छोडना पडा था। लेले ने इन्दौर कोर्ट में नौकरी प्राप्त की और १९०४ में वे इन्दौर के 'शिवाजी क्लब' के संस्थापक सदस्य बने। भिडे गुरुजी भी शहीद चाफेकर के सहयोगी रहे थे। वे १८९९ के बीड में सरकार विरोधी कार्यों में सक्रिय भाग लेने के बाद इन्दौर में दाखिल हुए थे। उनका लोकमान्य तिलक से भी सम्पर्क रहा था। इन्दौर के जनरल बोराडे के माध्यम से महाराजा शिवाजीराव होलकर से, सेना में प्रवेश हेतू भेंट की, पर उन्हें व्यायाम शिक्षक के रूप में नियुक्ति मिली।[7] कुलकर्णी का प्रत्यक्ष संबंध इन्दौर से रहा था। क्रान्तिकारी प्रचार हेतु उन्होंने भारत एवं नेपाल की यात्रा की थी। अन्ततः वे इन्दौर में ई. १९०९ में, पी. डब्ल्यु. डी. विभाग इन्दौर में नौकरी करने लगे। क्रान्तिकारी विचारों के फैलाव के कारण ही ई. १९०५ में कोल्हापुर के दो क्रान्तिवीर दामू जोशी एवं दत्तोप्रसाद इन्दौर में दो पिस्तौल, एक रिव्होल्वर और छ कारतूस प्राप्त करने में सफल हुए थे।[8]

ई. १९०६ में इन्दौर में 'ज्ञानप्रकाश मंडल' की स्थापना की गई। उसका उद्देश बंगभंग विरोधी वातावरण तयार करना और स्वाधीनता हेतु लोगों में उत्तेजना पैदा करना। इस संस्था के प्रमुख थे भाई कोतवाल, वि. सी. सरवटे, स. कृ. दाते, रामभाऊ गोगटे आदि। राष्ट्रीय जागृति के संबंध में अपने कार्यों से यह संस्था शीघ्र ही सबके लिए आकर्षण का केंद्र बन गयी। उसमें प्रति रविवार को विभिन्न वक्ताओं के भाषण नियमित आयोजित किये जाते थे। प्रायः ५२ भाषणों द्वारा साल भर जनजागरण का कार्य किया। तत्कालीन राष्ट्रीय विचारधारावाली पत्र पत्रिकाएँ वाचकों के लिये निःशुल्क उपलब्ध कराई जाती रही जिनमें 'केसरी', 'वन्दे मातरम्', 'तलवार', 'युगान्तर', 'कर्मयोगी', 'इंडियन स्वराज्य', 'इंडियन सोशालिस्ट' आदि प्रमुख थी।[9] जिसका संपादन लो. तिलक, उपाध्याय, लाला हरदयाल, चटोपाध्याय, श्यामजी कृष्ण वर्मा,

मॅडम कामा आदि देशभक्तों द्वारा किया जाता था। स्वाधीनता के लिए प्रतिज्ञा दिवस भी मनाया जाने लगा। शारीरिक शिक्षा के लिए कक्षाएँ आयोजित की जाती थीं। साथही स्वदेशी प्रचार के लिए सभी सदस्य स्वदेशी वस्त्र और टोपी पहनने लगे।[१०] 'पैसा फंड' और 'मुष्टि फंड' नामक संस्था भी कार्यरत हुई। जो धन के प्राप्त करने के लिए बंबई का अनुकरण था। स्कूली बच्चों के लिए 'बाल सन्मित्र समाज' की स्थापना वि. सी. सरवटे और भाई कोतवाल के सक्रिय योगदान से हुई। इंदौर में भी 'शिवाजी क्लब' की स्थापना हुई। अनंत अप्पाजी लेले उसके संस्थापक सदस्य थे। उसके द्वारा 'शिवाजी उत्सव' शुरू किया गया। १९०७ का शिवाजी उत्सव धूमधाम से मनाया गया। उसी प्रकार विभिन्न स्थानों पर 'गणेश उत्सव' आरंभ हुआ। उसका आयोजन करनेवालों में त्रिंबकराव गोगटे, पु. ग. खांडेकर, सीताराम गवारीकर, ना. कृ. वैद्य, वामनराव आपटे आदि प्रमुख थे। इनमें दत्तमंदिर कृष्णपुरा पुल के पास और बालाजी मंदिर इमली बजार के गणेश उत्सव का अपना विशेष महत्त्व रहा। 'शिवाजी उत्सव' व 'गणेश उत्सव' के द्वारा भारतीय प्रश्नोंपर चर्चा होने लगी। राष्ट्रीय जागृति के लिए इसे श्रेष्ठ माध्यम समझा गया। इन क्रांतिकारी गतिविधियोंसे अंग्रेज पुलिस अधिकारी सी. एम. सेग्रिम चिन्तित हुआ और उसे समाप्त करने हेतु कदम उठाने लगा। इसका प्रमाण है तत्कालीन रिजेन्सी कौंन्सिल द्वारा ई. १९०८ के मई माह की दो सरकारी विज्ञप्तियाँ[११] जो होलकर राज्य गजट में प्रकाशित की गईं। इसके द्वारा राजनीतिक गतिविधियाँ न बढाने और उसमें सम्मिलित न होने की कडी चेतावनी दी गयी थी। किन्तु यहां के आंदोलनकारियों पर इस का कोई प्रभाव नहीं पडा। इसी समय जन भावना को आक्रोश से भर देने की एक घटना घटित हुई।

ई. १९०७ के प्लेग के दिल दहलाने वाले वातावरण के पश्चात् एवं १९०८ के गणेश उत्सव के आठ–दिन पूर्व ही २२ जुलाई को लो. तिलक को ६ वर्ष के कठोर कारावास का दंड सुनाया गया। सम्पूर्ण भारत में रोष की लहर दौड गई। इन्दौर नगर भी इससे अछूता न रह सका। आबालवृद्ध, नर-नारी सभी के हृदय में एक ओर तो क्रोध की आग धधक रही थी तो दूसरी ओर एक नया जोश उनमें दिखाई दे रहा था। विद्यार्थियों ने उस दिन हडताल कर दी। ३० जुलाई से ४ अगस्त १९०८ के गणेश उत्सव में तो राष्ट्रीय चेतना के नये रूप के दर्शन हुए जो स्वाभाविक भी था। तत्कालीन होलकर कॉलेज के प्रो. एस. एल. गोखले के दो भाषण बहुचर्चित एव प्रभावशाली रहे। विषय थे (१) "राष्ट्रीय शिक्षा में तकनीकी शिक्षा की आवश्यकता" और (२) "स्वदेशी व बहिष्कार आंदोलन को सफल बनाने के लिये किस बात की आवश्यता है।" राष्ट्रभक्ति से ओतप्रोत कार्यक्रमों द्वारा लोगों में नई उमंग एवं चेतना का प्रादुर्भाव कर उन्हें प्रोत्साहित करने का सफलतापूर्वक कार्य किया गया। उसे शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी एवं जन साधारण का सहयोग मिलने लगा। ५ अगस्त १९०८ का

गणेश उत्सव का अंतिम दिन इन्दौर के इतिहास में स्वर्णाक्षरों में लिखा गया प्रभावशाली पृष्ठ बन गया। इस स्वर्णिम दिन पर ६५००० जनसंख्या वाले शहर इन्दौर में देशप्रेम के मतवाले १००० लोग निकल पडे एक आवेशपूर्व जुलूस के रूप में। 'वन्दे मातरम्', 'तिलक की जय', 'बिपिन की जय', 'खुदीराम बोस की जय', 'अरंविद घोष की जय' के सिंहनादसे आकाशमंडल गुंज उठा। देशभक्ति के गीत गाते हुवे जब वे निडर साहसी मतवालों की टोली रास्तेपर निकली तो दर्शकों ने भी उनके जोशीले नारों में अपना स्वर मिलाकर देशाभिमान का सुन्दर उदाहरण प्रस्तुत किया।[13] इस राष्ट्रीय भावना को बढता देखकर सरकार बौखला गई। परिणाम स्वरूप बहुतसे छात्रों को विद्यालय और महाविद्यालयसे निकाल दिया गया। प्रो. एस. एल. गोखले और त्रिंबकराव गोगटे को नौकरीसे अलग कर रियासत के बाहर जाने का आदेश दिया गया। इसी प्रकार भाई कोतवाल, बाळू भैय्या दाते को भी इन्दौर राज्य से बाहर निकाल दिया गया। इस क्रान्तिकारी घटना में जिन विद्यालयीन व महाविद्यालयीन छात्र सरकारी कर्मचारी एवं नागरिकों का सक्रिय योगदान रहा वे थे सर्वश्री कोतवाल, मोडक, भट, पाडाळकर, कारनेकर, शिराळकर, देशपांडे (सभी विद्यालयीन छात्र), भोपटकर, चंदावासकर, दांडेकर, देव, दुराफे, नांदेडकर, शेवडे और पंतवैद्य (होळकर कॉलेज) जिसमें विनायक यशवंत शेवडे और महादेव वामन पंतवैद्य को महाविद्यालयसे निकाल दिया गया। सरकारी कर्मचारी सर्वश्री पी. के कोतवाल (आबकारी), कन्हैय्यालाल भागवे, भाटे, बाळू भैय्या दाते, वागे, मोडक (सभी पी. डबल्यू. डी.) को नौकरीसे हटाया गया। गोविंदराव रासे (फेमिन विभाग), वि. सी. सरवटे, ना. कृ. वैद्य. सी. ना. गवारीकर और वामनराव आपटे (सभी गजट दप्तर) को कठोर चेतावणी दी गई। बहुतसे कार्यकर्ताओंका स्थानान्तर किया गया। नागरिकों में सर्वश्री पिम्पळकर, आनंदराव लोकरे, माराथल, बादलकर आदि ने इस आंदोलन में प्रशंसनीय योगदान दिया।

स्वाधीनता प्राप्त करने के लिये राष्ट्रीय भावना को जागृत करने का महत्त्वपूर्ण कार्य उपरोक्त कार्यक्रमोंद्वारा हुआ। इसका प्रमाण है तत्कालीन पुलिस कमिशनर सेग्रिम की स्वीकारोक्ति।

"...निकट भविष्य में इन्दौर दूसरा पूना या बंगाल बन सकता है..."[13] जो कुछ अंशों में सही निकला। इसका प्रमाण है इन्दौर के विस्मृत क्रान्तिकारी सर्वश्री विनायक शेवडे, महादेव नांदेडकर, मोघे के कार्य।

श्री. विनायक यशवंत शेवडे को महाविद्यालयसे १९०८ में निकाल दिया गया था। उसके पश्चात् उन्होंने आडाबजार और म्युनिसिपल रोड स्थित अपने दो मकान गिरवी रखकर बंबई की ओर प्रस्थान किया। उनके साथी थे महादेव नांदेडकर। महादेव के पिता आबाजी महू में रेल्वे में कार्य करते थे। लुनियापुरा, स्टेशन रोडपर

(आज की राममंदिरवाली बिल्डिंग) उनका किराये का मकान था। १९०९ में एक दिन पिता की जेब से ३०० रुपए चुराकर घरसे भाग निकले। उस समय उनकी छोटी बहन अनुसूयाने (स्व. डॉ. शंकर श्रीधर देशपांडे भूतपूर्व प्राचार्य होलकर कॉलेज की पत्नी) उनसे पूछा, "कहाँ जा रहे हो" तो उसे यह डांट दिया की, अच्छे काम के समय टोका नहीं करते और वे अपना बॅग उठाकर बंबई के लिये शेवडे के साथ चल पडे। वहांपर अपना नाम कुलकर्णी रखा और शेवडे की सहायता से अमेरिका जाने का प्रबन्ध कर लिया। उन्होंने पारपत्र पाने के लिये अपना नाम बदलकर श्रीधर देव रख लिया। ध्यान देने योग्य बात यह है कि तत्कालीन इन्दौर के म्युनिसिपल इंजिनियर श्रीधर देव थे। मई १९०९ में यह दोनों अमेरिका चल गये। जाते समय, नासिक के 'अभिनव भारत' संस्था के कार्यकर्ता एवं आगे चलकर जॅक्सन हत्या षड्यंत्र के सूत्रधार श्री. कृष्णाजी कर्वे का परिचय पत्र श्री. श्रीधर व्यंकटेश केतकर जो उन दिनों में अमेरिका में थे उनके लिये ले गये।[१४] उस समय वे वहां राजनीतिक गतिविधियों के लिये कार्यरत थे आगे चलकर ज्ञानकोशकार डॉ. केतकर के नाम से प्रसिद्ध हुए। श्री. शेवडे ने कॅलिफोर्निया में केमिकल इंजिनियर का पाठ्यक्रम पूर्ण किया साथही बम बनाने की कला प्राप्त की। श्री. नांदेडकर सक्रिय रूपसे कॅलिफोर्निया राज्य में ब्रिटिश विरोधी कार्य में जुट गये। वे पॅसिफिक हिंदुस्थानी संस्था के सूत्रधार बने। दोनों देशभक्त प्रसिद्ध क्रान्तिकारी नेता लाला हरदयाल, डॉ. खानखोजे, विष्णु पिंगले आदि के मित्र बने[१५] जिससे अमेरिका में भारत की स्वाधीनता के प्रयत्न में बडी तेजी आयी। भारत के बाहर राष्ट्रों में स्वाधीनता के लिये जागृति, प्रचार एवं मदद प्राप्त करने का प्रयास किया गया। ब्रिटेन, जर्मनी, जापान, कॅनडा आदि देशों की भारतीय क्रान्तिकारी संस्थाओंसे सम्पर्क भी किया गया। गदर पार्टी से भी सीधा संबंध जोडा गया। १९१४ के विश्वयुद्ध छिडतेही बर्लिन कमेटी की स्थापना की गई। बर्लिन कमेटी का जो प्रतिनिधि मंडळ को सॅनफ्रॅन्सिस्को से बर्लिन के लिये रवाना हुआ उसमें नांदेडकर सम्मिलित थे। वह मंडल अपने कार्य सफल न हो सका। इसलिये उसे वापस जाना पडा।

शेवडे और नांदेडकर तथा उनकी अमेरिका में चल रही गुप्त गतिविधियों की खबरें भारत सरकारको नियमित रूप से प्राप्त होती थीं। सिमला के रेकार्ड में इस संबंध में सबुत मिलता है; यही कारण है कि जब शेवडे ने दि. ५ डिसेम्बर १९१४ को सॅन-फ्रॅन्सिस्कोसे भारत के लिये रवाना हुए उसी समय देश के पुलिस अधिकारीयोंको इसकी सूचना दी गई।[१६] दि. ११ मार्च १९१५ को शेवडे को मद्रास पहुंचनेपर गिरफ्तार किया गया। उन्हें ट्रेन से बंबई ले जाया गया। मार्ग में रायचूर स्टेशन पर उनके एक परिचित श्री. बाबुराव देसाई ने उन्हें देखा। तुरंतही उन्होंने तार द्वारा शेवडे के बहिनोई पूना के वामन दामोदर तलवलकर को सूचित किया साथही कहा गया कि इन्दौर के

श्री. पंतवैद्य वकील, शेवडे के मामा श्री. पराडकर एवं भांजे श्री. पुरोहित को भी तार-द्वारा सूचित किया जाय। श्री. शेवडे को इन्दौर लाया गया। होलकर रियासत के नागरिक होने के नाते उन्हें होलकर दरबार को सोपा गया। म. तुकोजीराव होलकर ने उनकी जमानत दी और अपने यहा केमिकल इंजिनियर नियुक्त किया। श्री. शेवडे पर पाबंदी लगाई गई कि वे महाराजा की बिना अनुमति के इन्दौर नहीं छोड सकते तथा स्वतंत्रता संग्राम की गतिविधियोंमें भाग नहीं ले सकते। फलस्वरूप इस क्रान्तिकारी का कार्य आगे न बढ सका। राऊ की थर्मल फॅक्टरी और पालिया पेपर मिल का निर्माण उनकी देखरेख में हुआ। चीफ केमिकल इंजिनियर के पदसे वे निवृत्त हुए। उनके परिचितों का कहना था कि वे उदास बने रहे।[१७] महाराजा तुकोजीराव अस्पताल में १९५३ में उनका स्वर्गवास हुआ। श्री. नांदेडकर कभी नांदेकर कभी शर्मा आदि जाली नाम धारण करते हुए अपने कार्य में जुट गये। किन्तु अमेरिका प्रथम विश्वयुद्ध के समय ब्रिटन का मित्र बन गया और अमेरिका में ब्रिटन विरोधी कार्यकर्ताओं के साथ उसने कुटिलता का व्यवहार किया इसका प्रमाण १९१८ का सॅनफ्रॅन्सिस्को का मुकद्दमा जिसमें भारतीयोंपर तटस्थता भंग करने के आरोप में कारावास की सजा दी गई।[१८] इसमें श्री. नांदेडकर को ३ माह का कठोर कारावास का दंड सुनाया गया। १९१८ से १९७४ तक की उनकी जीवनी संबंधी जानकारी नहीं मिलती। होमियोपॅथी डॉक्टर और योग विद्या के प्रशिक्षक के रूप में वे जीवन के अन्तिम क्षणोंतक अमेरिका में डेट्राइट में कार्यरत रहे। वहां उनका निधन १९७४ में हुआ। इन्दौर के तीसरे क्रान्तिकारी श्री. मुकुन्द पांडुरंग मोघे थे। नासिक के जॅक्सन की हत्या के बाद वे उस षड्यंत्र में सम्मिलित समझे गये। बडी यातनाएँ उन्हें दी गई। अन्ततः ठोस सबुत न मिलने के कारण मुक्त किया गया। फिर भी इन्दौर न छोडने का आदेश दिया गया। राजकुमार मील से वीव्हिंग मास्टर के रूप में सेवानिवृत्त हुए। दस वर्ष पूर्व ही उनका निधन हुआ। यहां यह बतलाना आवश्यक है कि मध्यभारत क्षेत्र खास तौर पर इन्दौर क्रान्तिकारिओं के लिए सुरक्षित केन्द्र समझा गया। यही कारण है कि प्रसिद्ध क्रांतिकारी सेनापति बापट अपने साडेचार वर्ष के अज्ञातवास समय बडवानी, धार, देवास और इन्दौर में रहे। हालां कि उन्हें इन्दौर मेंही दि. २८–१२–१९१२ को पकड गया था।

इसलिये स्वाधीनता संग्राम के प्रारंभिक दिनों में विशेषरूप से १९०३ से १९१२ तक इन्दौर में किये गये आन्दोलन से राष्ट्रवादी जागृति में अपने महत्त्वपूर्ण स्थान रखा है। राष्ट्रीय परिपेक्ष्य में उसे देखने पर स्पष्ट होता है कि लो. तिलक और उनके गरम दल का प्रभाव इन्दौर के नवयुवकों पर गहरा पडा था। इसी कारण वे क्रांतिकारी कार्यों से संलग्न रहे। स्वतंत्रता प्राप्ती के लिये इन्दौर रियासत के नागरिक भी कॉंग्रेस के नेतृत्व में प्रजामंडल की स्थापना कर आगे बढे। इन्दौर का इस संदर्भ में महत्त्वपूर्ण योगदान रहा।

संदर्भ सूची

१. फेजेस ऑफ फ्रीडम स्ट्रगल इन मध्यभारत १८५७ प्रो. बी. एन. लुनिया (१९५७) पान नं. ४। 'नई दुनिया' इन्दौर दीपावली १९८५ कॉंग्रेस शताब्दी खंड. डॉ. शि. यादव पान ६७।

२. वायसराय लॉर्ड कर्जन का टेलिग्राम क्र. ४१५५ आय. बी. २३ सितंबर १९०२ उन्हें वार्षिक पेंशन चार लाख देकर बडवाहा में नजरकैद किया।

३. तुकोजीराव (तृतीय) अल्पवयस्क होने से कौंसिल ऑफ रीजेन्सी स्थापित। अंग्रेज अधिकारी एच. सी. क्लाउटन अभिभावक नियुक्त।

४. 'माझा जीवन प्रवाह' वि. सी. सरवटे (१९८५). स्वातंत्र्य सेनानी.

५. उपरोक्त।

६. 'लो. टिळक व क्रांतिकारक', य. दि. फडके (१९८५)

७. उपरोक्त।

८. उपरोक्त।

९. 'अहिल्या स्मारिका' इन्दौर. डी व्ही. खांडवेकर (१९७०)

१०. उपरोक्त।

११. (अ) 'नई दुनिया' इन्दौर दीपावली १९८५ डॉ. शि. यादव. पान ६७/६९ नानकचंद, कारभारी, रियासत इन्दौर का नोटिफिकेशन ३० अप्रैल १९०८.
(ब) राष्ट्रीय अभिलेखागार फॉरेन डिपार्टमेंट इंटरनल बी फरवरी १९०९ क्र. २००–२०१. मि. सेंग्रिम की रिपोर्ट ८ सितम्बर १९०८.

१२. उपरोक्त पान ६८–६९ मि. सेंग्रिम की रिपोर्ट ८ सितम्बर.

१३. उपरोक्त।

१४. 'लो. टिळक व क्रांतिकारक', य. दि. फडके, पान १०६.

१५. इंडियन रिव्होल्युशनरी मुव्हमेंट इन यु.एस.ए. डॉ. एल. पी. माथुर, पान १२३, स्ट्रगल फॉर फ्रीडम, विद्याभवन, डॉ. आर. सी. मजुमदार, पान २१७.

१६. "लो. टिळक व क्रान्तिकारक', य. दि. फडके पान १०७ आधार बॉंबे प्रेसिडेन्सी पुलिस ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ इंटलिजन्स, पान ८५, वर्ष २८, सप्ताह ८, बम्बई प्राप्त २७ फरवरी १९१५.

१७. श्री. शेवडे के रिश्तेदार श्री. अ. ल. पुरोहित इंदौर का बयान.

१८. इन्डियन रिव्होल्युशनरी मुव्हमेंट इन यु. एस. ए. डॉ. एल. पी. माथुर, पान १६६

काँग्रेसपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्वदेशी-बहिष्काराची वाटचाल

प्रा. मधुकर जाधव, मुधोजी महाविद्यालय, फलटण

स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीचा कालखंड हा हिंदुस्थानातील स्वातंत्र्य-संग्रामाचे एक महत्त्वपूर्ण पर्व होते. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातील साम्राज्यामुळे या देशातील राजकीय दास्याबरोबर आर्थिक दुरवस्था वाढीस लागली. हिंदी जनतेने राजकीय दास्य व आर्थिक दुरवस्था संपविण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या चळवळींमध्ये स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण होते. या राजकीय व आर्थिक स्वरूपाच्या चळवळींच्या माध्यमातून हिंदी राष्ट्रवाद साकार झाला. स्वदेशी बहिष्काराची चळवळ हा हिन्दी राष्ट्रवादाचा आर्थिक आविष्कार होता. महाराष्ट्रात काँग्रेसपूर्व काळात (इ. स. १८८५ पूर्वी) स्वदेशी बहिष्कार चळवळीचा उदय व विकास कसा झाला याचा आढावा घेणे हा या लेखाचा उद्देश आहे.

महाराष्ट्रातील जनतेला सह्याद्रीसारखी उत्तुंग स्वतंत्र वृत्ती व अभेद्य त्यागबुद्धी लाभली असल्याने ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक गुलामगिरीविरुद्ध हिंदुस्थानात सुरू झालेल्या प्रत्येक चळवळीमध्ये महाराष्ट्रीय नेते अग्रेसर होते. परिणामी त्या चळवळीचे धुरीणत्व बऱ्याच वेळा महाराष्ट्रीय नेत्यांचेकडे आले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये विशेष महत्त्व पावलेली स्वदेशी-बहिष्काराची चळवळ त्याला अपवाद नव्हती.

इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाल्यानंतर महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल सुरू झाला. ब्रिटिश अंमलात महाराष्ट्रात शांतता व स्थैर्य प्रस्थापित झाले. तथापि राजकीय दास्याबरोबरच येथील लोकांची आर्थिक दुरवस्था वाढीस लागली. एतद्देशीय उद्योगात पारंपरिक पद्धतीने तयार झालेला ओबडधोबड व महाग माल यंत्रावर तयार झालेल्या सुबक, आकर्षक व स्वस्त किंमतीत मिळणाऱ्या इंग्लिश मालाशी स्पर्धा करू न शकल्याने व ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक देशी उद्योगांना मारक धोरण स्वीकारल्याने देशी

उद्योगधंदे बंद पडले. कारागीर बेकार झाले आणि एतद्देशीय खेड्यांची पूर्वीची स्वयंपूर्णता संपुष्टात आली. परिणामी एतद्देशीयांना आपल्या दैनंदिन गरजेच्या वस्तू ब्रिटिश व्यापाऱ्यांकडून विकत घेणे भाग पडले, आणि या देशातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे सुरू झाला. प्रारंभीच्या काळी ब्रिटिशांच्या पराक्रमामुळे व सर्व क्षेत्रांतील श्रेष्ठत्वामुळे सारा समाज भांबावून गेला. समाजातील विद्वानांनाही देशस्थितीत कोणत्या मार्गाने सुधारणा घडवून आणावी हे सुचत नव्हते. ब्रिटिशांनी या देशात सुरू केलेल्या पाश्चात्त्य पद्धतीच्या शिक्षणाचा लाभ घेतलेले आचार्य बाळशास्त्री जांभेकर (इ. स. १८१२ ते १८४६), रामकृष्ण विश्वनाथ, गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी (इ.स. १८२३ ते १८९२), पितामह दादाभाई नौरोजी (इ.स. १८२५ ते १९१७), डॉ. भाऊ दाजी लाड (इ. स. १८२४ ते १८७४), गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका (इ. स. १८२८ ते १८८०), न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (इ. स. १८४२ ते १९०१) यासारखे बुद्धिवादी तरुण देशस्थिती व लोकजीवन सुधारण्यासंबंधी विचार करू लागले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ब्रिटिश सत्तेचा हिंदुस्थानात राजकीय वर्चस्व स्थापन करण्याचा आणि व्यापाराच्या माध्यमातून नफ्याच्या रूपाने एतद्देशीय संपत्तीची लूट करण्याचा हेतू आहे. ही लूट थांबविण्यासाठी ब्रिटिशांच्या व्यापाराचे खच्चीकरण केले पाहिजे, व ते साध्य करण्यासाठी आपल्या देशातील लोकांनी दैनंदिन गरजेच्या वस्तू ब्रिटिशांचेकडून न घेता त्या आपल्या देशात उत्पादित करून वापराव्यात असे त्यांना वाटू लागले.

वर उल्लेख केलेल्या पाश्चात्त्य विद्याविभूषित महाराष्ट्रीय तरुणांच्या विचारांनी स्वदेशीबहिष्काराच्या चळवळीची वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली. या पार्श्वभूमीवर डॉ. भाऊ दाजी लाड यांचे स्वदेशी वस्तु-निर्मितीचे प्रयत्न आणि सार्वजनिक काकांच्या स्वदेशी वस्तू वापरण्याच्या निग्रही निश्चयाने व स्वदेशी–वस्तूच्या निर्मितीसाठी आणि प्रचारासाठी त्यांनी केलेल्या अविरत प्रयत्नाने स्वदेशीच्या विचारांना- कृतीची साथ मिळून स्वदेशीची चळवळ दृग्गोचर झाली. काँग्रेसच्या स्थापनेनंतर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (इ. स. १८५६–१९२०) यांच्या नेतृत्वाखाली स्वदेशीला बहिष्काराची साथ मिळाली, आणि स्वातंत्र्य संग्रामातील स्वदेशी-बहिष्काराची चळवळ साकारली. या चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींच्या (इ. स. १८६९–१९४८) अगोदर सार्वजनिक काका, लोकमान्य टिळक यांसारख्या महाराष्ट्रीय सुपुत्रांनी केले. स्वदेशी-बहिष्कार चळवळीचे, स्वदेशी व बहिष्कार हे एकमेकाचे परस्पर-पूरक व अविभाज्य घटक होते. महाराष्ट्रात उगम पावलेल्या व विकसित झालेल्या स्वदेशीच्या विचारातूनच स्वदेशी-बहिष्काराची चळवळ जन्मास आली. या संदर्भात आचार्य शं. द. जावडेकर म्हणतात, “ ‘खादी’ किंवा ‘ स्वदेशी ’ या चळवळी केवळ आकडेमोडीच्या निर्जीव अर्थशास्त्राच्या नसून वाढत्य देशभक्तीतून निर्माण होणाऱ्या लोकांतील प्रत्यक्ष प्रतिकारशक्तीच्या संघटनेच्या या गोष्टी

आहेत...या प्रतिकारशक्तीचा जन्म महाराष्ट्रातच या वेळी (इ. स. १८९६–९७) झाला."[1]

आचार्य बाळशास्त्री जांभेकर

महाराष्ट्रात स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीचा विचार सर्वप्रथम आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मांडला. त्यांनी स्वदेशी वस्तुनिर्मितीपासून होणारे फायदे सुद्धा कथन केले.

इ.स. १८३२ मध्ये वाफेच्या यंत्राचा व इतर शोधांचा वृत्तान्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या वाचनात आला. देशस्थिती व लोकजीवन यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी या शोधांचा उपयोग करावा असे त्यांना वाटलेवरून दि. २ मार्च १८३२ च्या 'दर्पण'मध्ये 'वाफ यंत्राच्या वृत्तान्तापासून मनात आलेल्या गोष्टी' या नावाने लिहिलेल्या लेखात बाळशास्त्री जांभेकर लिहितात, "आपल्याकडील पुष्कळ लोक या नवीन ज्ञानाचा व शोधांचा तिरस्कार करतात. कारण आमचे लोक आळशी आणि पूर्वजांनी जसे केले तसे करण्याची त्यांची आवड. असे असले तरी जीवन सुखी व आनंदी बनविण्यासाठी नवीन शोधांचा व विचारांचा स्वीकार केला पाहिजे."[2]

पुढे इ. स. १८४० मध्ये त्यांनी 'दिग्दर्शन' मासिकाच्या अंकात काचनिर्मितीची कृती सविस्तर दिली आहे. ते म्हणतात, "काही उपयोगी पदार्थ स्वतःसिद्ध सृष्टीत असतात. काही कृतीने निर्माण होतात. त्यात पदार्थ स्वतःसिद्ध निर्माण होणे ते हवेवर, जमिनीवर आणि इतर कारणांवर आहे...... कृत्रिम म्हणजे कृतीने निर्माण होणारे जे पदार्थ त्यांचे असे नाही. त्यास ज्ञान, कल्पना आणि कौशल्य यावाचून दुसऱ्या कशाचे प्रयोजन नाही म्हणोन असे पदार्थ निर्माण करण्यात इतरास उपयोग आणि आपणास द्रव्यलाभ आहे, इतकेच नाही तर त्याणेकरून देशाची कीर्ती आणि सर्व लोकांचे कल्याण आहे. यास प्रमाण पाहिजे असल्यास या देशात काच, कापड, लोखंडी सामान वगैरे किती येते आणि त्याणेकरून येथील लोकांची हानी आणि अपकीर्ती किती आहे, याचा विचार करावा. यात हानी कोणती, असे कोणी म्हणेल, तितके जिन्नस या देशात होऊ लागल्यास हजारो माणसांस रोजगार मिळून सुखी होतील. ती माणसे आता निरुद्योगी व भिकारी आहेत. ही हानी लोकांची मोठी आहे. आता अपकीर्ती तर स्पष्टच आहे. ती अशी की, तिकडील लोक हे उत्तम पदार्थ करतात, आणि येथील लोकांस ते होत नाही, तेव्हा हे अज्ञान आणि निरुद्योगी असे सिद्ध होते. यास्तव उपयोगी पदार्थ उत्पन्न करणाऱ्या ज्या कळा त्याविषयी अवकाशानुसार लिहिण्याचा आमचा आरंभापासून उद्देश आहे, त्याप्रमाणे आम्ही सांप्रत काच करण्याची कृती संक्षेपेकरून लिहितो."[3]

रामकृष्ण विश्वनाथ

बाळशास्त्री जांभेकरांनंतर स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीचे महत्त्व जाणून त्यांच्या निर्मिती

विषयीचे विचार मांडणारे रामकृष्ण विश्वनाथ हे द्रष्टे महाराष्ट्रीय विचारवंत होत. ब्रिटिशांच्या साम्राज्यात आपल्या देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आपल्या देशातील लोकांच्या गरजेच्या वस्तूंचे उत्पादन आपण आपल्या देशातच करावे, या-संबंधीचे विचार त्यांनी इ. स. १८४३ साली, ' हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार याविषयी विचार ' या आपल्या अर्थशास्त्रीय ग्रंथात मांडले आहेत.

आपल्या देशातील लोकांच्या हाती यंत्रे आल्यास आपल्या गरजेच्या वस्तू बनविण्याच्या कौशल्यात आपले लोक तरबेज आहेत. परंतु ब्रिटिश सरकारने आमच्या हिताविरोधी धोरण स्वीकारल्याने आमचे नुकसान होत आहे. म्हणून या देशातील लोकांनी ब्रिटिश मालाची गरज ठेवू नये हे सांगताना रामकृष्ण विश्वनाथ म्हणतात, "...हिंदुस्थानचे लोकही आता आपला पैका व श्रम आपल्या हिताकडेच लावून त्याही विलायती मालाची गरज ठेवू नये."[४]

आपल्या देशातील लोकांनी आपले श्रम, आपल्या गरजेच्या वस्तू निर्माण करण्या-साठी उपयोगात आणावेत हे सांगताना ते म्हणतात, " हिंदुस्थानातील बहुतेक प्रजा मजुरी करीत आहे व यावरून असे दिसते की त्यांचे श्रम कोणत्याही अशा उद्योगाकडे लावावे, की जेणे करून हिंदुस्थानात ज्या ज्या मालाचा खप आहे, तो त्यांचे योगे येथेच उत्पन्न होईल."[५]

परकीयांच्या किंवा विलायती वस्तू आपण घेतल्याने आपला देश दरिद्री बनतो, लोक आळशी बनतात हे स्पष्ट करताना ते म्हणतात, " परंतु तो जिन्नस विलायत, चीन आदी करून परमुलखात पाठवून त्याची वस्त्रे वगैरे झाल्यावरती पुन्हा या देशात आणण्या-पासून तो (आपला देश) अर्थात नेहमी दरिद्री होत जाईल, आणि येथील राहणारे दिवसानुदिवस अधिक आळशी होतील. याजकरिता येथल्या लोकांना जो जिन्नस येथे पिकतो, त्याचे पदार्थ उत्पन्न करण्याचे उद्योगास लागावे."[६]

ब्रिटिश सरकारने भारतीय मालास प्रतिकूल व ब्रिटिश मालास अनुकूल असे कर-विषयक धोरण स्वीकारले आहे. ब्रिटिश मालावर कमी कर तर भारतीय मालावर जास्त कर आणि निर्यातीस बंदी. या धोरणास प्रतिउत्तर म्हणून या देशातील लोकांनी यंत्रादी युक्तीचा वापर करून माल उत्पन्न करावा. यंत्रावर तयार झालेला येथील माल ब्रिटिश मालाशी स्पर्धा करू शकेल, असे रामकृष्ण विश्वनाथ यांचे मत होते.[७]

यंत्रे खरेदी करण्यासाठी भांडवल कसे उभे करावे, व यांत्रिक उद्योग सुरू केल्याने कोणते फायदे होतील हे रामकृष्ण विश्वनाथ यांनी स्पष्ट केले होते. यंत्रे खरेदीसाठी लागणारे भांडवल उभारण्यासाठी एक मंडळी स्थापन करावी. तिचे भाग (Shares) इच्छुकांनी आपल्या कुवतीनुसार घ्यावेत व १० लक्ष रुपयेपर्यंत भांडवल उभारावे. त्यातून युरोपीयनांचेकडून यंत्रे खरेदी करावीत, कारखाना उभारावा, कच्चा माल घ्यावा

व आपल्या गरजेच्या वस्तूंचे उत्पादन करावे. असे केल्याने त्या वस्तू ब्रिटिश वस्तूपेक्षा स्वस्त मिळतील. येथील लोकांना रोजगार मिळेल, ते सुखी होतील व आपली अप्रतिष्ठा नजरेस पडणार नाही.[८]

गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी

रामकृष्ण विश्वनाथ यांचे नंतर गोपाळराव हरि देशमुख यांनी भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर'मध्ये लोकहितवादी या टोपणनावाने लिहिलेल्या शतपत्रामध्ये स्वदेशी–बहिष्काराच्या विचारांचा पाठपुरावा केलेला दिसतो. ब्रिटिशांच्या राज्यामुळे आपल्या देशात आलेले दारिद्र्य व दास्य घालविण्यासाठी स्वदेशी हा एक प्रभावी उपाय आहे, याची लोकहितवादींना खात्री होती. म्हणून त्यांनी स्वदेशी धंद्याच्या उद्धारार्थ चळवळ कशी करावी याविषयी—"हिंदुस्थानी लोकांनी काय करावे?" या पत्रात दि. १३ मे १८४९ रोजी सविस्तर व सडेतोड लिहिले आहे, "दुसरा तूर्त दारिद्र्य मोडण्यास उपाय असा आहे की, ब्राह्मण लोकांनी आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडाव्या व केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करू, असे म्हणू नये. या देशात आणखी पुष्कळ रोजगार आहेत व तेही आता दिवसेंदिवस इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करू लागले. हेच रोजगार आपल्या लोकांनी करावे. कोणते म्हणाल तर काच, कापड, सुरी, कात्री, लाकडी सामान, घड्याळे, चाबूक यंत्रे इत्यादी पुष्कळ इकडे इंग्रज खपवितात. ही सर्व आपले लोकांनी करण्यास शिकावे व येथे जो माल खपणार नाही तो दुसऱ्या देशास घेऊन जावा, आणि तेथे विकावा. पुष्कळ देश आहेत या गोष्टींचा शोध करावा व इंग्रजांचे देशाचे सामान बंद करावे. किंबहुना आपले सामान त्यास द्यावे. परंतु त्याचे आपण घेऊ नये. जो माल इकडे उत्पन्न होईल तितका माल द्यावा. विलायती कापड घेऊ नये. यास्तव आपल्यास जाडी मोठी कापडे नेसावयास लागली तर काय चिंता आहे? परंतु आपले देशाचे रक्षण करावे असे झाले म्हणजे बहुत रोजगार राहतील......यास्तव त्यांनी स्वस्थपणाने दुसरे रोजगार करावे. म्हणजे इंग्रज लोकांचा, शिरस्तेदारांचा शिव्या, भटांचा अपमान हे काही सोसावयास नको."[१]

तर दि. २२ एप्रिल १८४९ रोजी लिहिलेल्या 'हिंदु लोकांचा व्यापार' या पत्रात पुराणिक, कथेकरी वगैरे लोकांनी स्वदेशीचा विचार लोकांना सांगावा, आणि लोकांनी स्वदेशी वस्तूच वापरण्याचा निश्चय करावा असा उपदेश लोकहितवादी करतात. ते म्हणतात, "याजकरिता सर्वांही असा कट करावा की जे आपल्या देशात पिकेल तेच नेसू, तेच वापरू. कसेही असो. आणि तितक्याच चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकू. आम्हास मिळेल तसेच घेऊन आम्ही काळ काढू. मग हजारो खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल? कापूस विकणाऱ्यांनी असा बेत करावा की, इंग्रजांस इकडे तयार केलेली कापडे द्यावी. परंतु कापूस देऊ नये. येणे करून हे

लोक सुखी होतील.... जर हरदास व कथेकरी यांनी अशी मते घेतली आणि लोकास जर भरविली तर बहुत लोक एकत्र होतील. कारण की ही गोष्ट उघडी आहे . चांगल्या गोष्टी छापखान्यातून निघाव्या, असेच नाही. हरदासांनीही काढाव्या व त्यास लोक एकत्र करण्याची फार शक्ती आहे...त्यांनी असे उपयोगी विषय लोकांस शिकविले... तर फार फायदा होईल.[१०]

लोकहितवादींचे स्वदेशीसंबंधीचे विचार इतर प्रांतांतील तत्कालीन नेत्यांच्या विचारापेक्षा निश्चितच प्रगत आणि राष्ट्रहिताचे होते.

दादाभाई नवरोजी

इ. स. १८५२–५३ पासून त्यांनी देशाच्या राजकारणात भाग घेण्यास प्रारंभ केला. ब्रिटिशांच्या राज्यात हिंदुस्थानातील सर्वांत मोठा प्रश्न जनतेच्या दारिद्र्याचा व उपास-मारीचा आहे असे त्यांचे ठाम मत होते. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी त्यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यशाहीचे रक्तशोषक राक्षसी स्वरूप शोधून काढून आपल्या देशबांधवांना समजावून सांगितले. या साम्राज्यात आपले कोट्यवधी देशबांधव दारिद्र्याने व उपास-मारीने मरत आहेत. या स्थितीत आम्ही निष्क्रिय राहिलो तर अखेर आम्हा सर्वांचाच विनाश होईल. याचे ज्ञान करून दिले. एवढेच नाही तर ही आपत्ती टाळण्यास कोणत्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत याचेही त्यांनी लोकांना शिक्षण दिले व त्या मार्गाने जाणारांचे नेतृत्व केले.[११]

अशा तऱ्हेने आपल्या देशाची आर्थिक दुरवस्था व स्वदेशी वस्तूंची निर्मिती यासंबंधी बाळशास्त्री जांभेकर, रामकृष्ण विश्वनाथ, लोकहितवादी व दादाभाई नवरोजी यांनी मांडलेल्या विचारांनी महाराष्ट्रात स्वदेशीची पार्श्वभूमी निर्माण झाली. त्यांच्या विचारांचा परिणाम पुढील काळात दिसून येऊ लागला.

डॉ भाऊ दाजींची प्रत्यक्ष कृती

डॉ. भाऊ दाजी लाड यांनी आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने प्रथम कागदाची गिरणी व पुढे कापडाची गिरणी काढण्याचा विचार करून त्या अनुषंगाने कृती केली. इ. स. १८५४ साली डॉ. भाऊ दाजी, डॉ. बुइस्ट यांच्या नेतृत्वाखाली, कर्सेटजी कामा, फ्रामजी नसरवानजी, नारायण दिनाथजी, हीरजी जहांगीर, विनायकराव जगन्नाथजी यांनी पुढाकार घेऊन मुंबई येथे ' The Bombay Paper Manufacturing Company ' ही कागदाची पहिली गिरणी स्थापन केली. यासंबंधी The Bombay Times व Bombay City Gazetteer मध्ये माहिती मिळते.[१२]

डॉ. मेहता यांनी आपल्या ' हिंदुस्थानातील सुताच्या गिरण्या ' या ग्रंथाच्या The Pioneers या प्रकरणात डॉ. भाऊ दाजी हे मुंबईतील पहिल्या कापड गिरणीच्या

स्थापनेत अग्रेसर होते, असे नमूद केले आहे. ते म्हणतात, "Dr. Bhau Daji mooted the idea in Bombay in the first years of the decade (1851 onwards) but no definite plans emerged."[१३]

हिंदुस्थानातील कापूस ईस्ट इंडिया कंपनी इंग्लंडमध्ये नेते, त्याचे सूत काढून आणि कापड विणून हिंदुस्थानात विकते. त्याऐवजी सूत काढण्याची व कापड विणण्याची प्रक्रिया जर आपल्या देशातच घडली तर खूप पैसा आपल्या देशातच राहील व आपल्या देशबांधवांना रोजगार मिळेल, असे भाऊ दाजींना वाटणे स्वाभाविक होते.

डॉ. भाऊ दाजी यांच्या कल्पनेला कावसजी नानाभाई दावर नावाच्या पारशी गृहस्थाने मूर्त स्वरूप दिले. २२ फेब्रुवारी १८५४ रोजी त्यांनी ताडदेव (मुंबई) येथे २००० चात्यांची 'धि बॉम्बे स्पिनिंग मिल' सुरू केली. ही आपल्या देशातील पहिली स्वदेशी कापड गिरणी होय. "हिंदुस्थानात पहिली गिरणी (कापडाची) यशस्वी रीतीने स्थापन करण्याचा मान महाराष्ट्राला आहे. १८५४ साली मुंबईला कावसजी नानाभाई दावर या पारशी गृहस्थाने पहिली कापडाची गिरणी उभारून या धंद्याची या राष्ट्रात मुहूर्तमेढ रोवली."[१४]

सार्वजनिक काकांची कामगिरी

ब्रिटिश राजवटीमुळे आणि ब्रिटिशांच्या पक्षपाती व्यापारनीतीमुळे देशात निर्माण झालेली आर्थिक दुरवस्था कमी करण्यासाठी आणि देशबांधवांतील बेकारी व दारिद्र्य संपविण्यासाठी, इ. स. १८७२ मध्ये पुण्यातील एक वकील व पुणे सार्वजनिक सभेचे सरकार्यवाह गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांनी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचेशी विचारविनिमय करून स्वदेशी वस्तूंची निर्मिती करण्याचा व स्वदेशी वस्तूंचाच वापर करण्याचा निश्चय केला. स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीचे उद्योगधंदे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सुरू केले. स्वदेशी वस्तूंची दुकाने सहकारी तत्त्वावर चालविली व स्वदेशी वस्तूंच्या प्रचारासाठी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. सार्वजनिक काकांच्या या कार्यापाठीमागे व्यापारी दृष्टिकोणाबरोबरच ब्रिटिशांचे राजकीय वर्चस्व संपवावे हा राजकीय विचारही होता. इ. स. १८७२ पासून तहहयात त्यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचे आपले व्रत अत्यंत काटेकोरपणे पाळले. निश्चयपूर्वक स्वदेशी वस्तू वापरणारे, स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणारे, स्वदेशी वस्तूंच्या वितरणासाठी सहकारी तत्त्वावर प्रसंगी पदरमोड करून दुकाने चालविणारे आणि व्याख्यानांच्या आणि लेखनाच्या माध्यमातून स्वदेशी चळवळीचा प्रचार व प्रसार करणारे, पश्चिम भारतातील ते पहिले स्वदेशाभिमानी देशभक्त होते. 'स्वदेशीचे अग्रदूत' अशा शब्दात श्री. दा. न. शिखरे यांनी सार्वजनिक काकांचा केलेला गौरव यथोचित ठरतो.

सार्वजनिक काकांचे आद्य चरित्रकार श्री. रामचंद्र गणेश बोरवणकर म्हणतात,

"माधवराव पुण्यास येऊन 'सार्वजनिक सभेत' लक्ष घालू लागल्यावर एक दिवस काकांनी त्यांचेपुढे देशातील वाढत्या दारिद्र्याचे चित्र रंगविले व देशोन्नतिकारक काही उपाय असल्यास सुचविण्याविषयी माधवरावांना विनंती केली. पुढें बराच विचार-विनिमय होऊन 'देशीला उत्तेजन देणे' हाच देशोन्नतीचा सुलभ मार्ग आहे असे ठरले. काकांनी लगेच एक 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' नावाची संस्था उघडली. परंतु नुसती देशी वस्तूंची दुकाने काढून अगर कोरडी व्याख्याने देऊन भागावयाचे नाही, स्वतःच्या आचरणाने जनतेला धडा घालून दिला पाहिजे असे पटताच काकांनी सन १८७२ च्या जानेवारीच्या बारावे तारखेस स्वतः देशी कापड वापरण्याची शपथ वाहिली. व ती आमरणांत निश्चयाने पाळली."[१५]

स्वदेशीचे संपूर्ण शुद्ध व अंतिम स्वरूप म्हणजे खादी. ही खादी एखाद्या व्रताप्रमाणे निश्चयाने वापरणारे सार्वजनिक काका हे पहिले देशभक्त होत. म्हणून त्यांना स्वदेशीचे पहिले पुरस्कर्ते म्हटले जाते. या संदर्भात श्री. दा. न. शिखरे लिहितात, "त्याप्रमाणे स्वदेशीचे पहिले पुरस्कर्ते 'सार्वजनिक काका'... स्वदेशीचे अंतिम रूप म्हणजे खादी ती एखाद्या धार्मिक व्रताप्रमाणे वापरण्याचा निग्रह त्यांनी केला आणि दिल्ली-दरबारा-तही तो निग्रह मोठ्या धैर्याने चालविला. गांधीजींच्या प्रयत्नामुळे खादीच्या चळवळीला महासागराचे स्वरूप आले, पण ते पुढे. परंतु खादीची गंगोत्री म्हणजे 'सार्वजनिक काकाच!' महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानात हातसुताची व हातविणीची खादी नखशिखान्त पेहरण्याचा पहिला मान 'सार्वजनिक काकां'चा."[१६]

इ. स. १८७५ मध्येच सार्वजनिक काकांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली होती की देशाला जर ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करावयाचे असेल तर 'स्वदेशी' हा त्याच्यावर जालीम उपाय आहे. सार्वजनिक काकांचा हा विचार त्यांच्या द्रष्टेपणाचा द्योतक आहे.[१७]

सार्वजनिक काकांनी स्वदेशीच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याविषयी R. H. Jalbhoy म्हणतात, "In his New Zeal for the good of his country he gradually neglected and ultimately even sacrificed, his lucrative profession...He delivered lecture on Indian Commerce, the material loss it sustains in its unequal imports and exports, etc. With the view to encourage native industry he formed association, the member whereof bound themselves to use as far as possible all native products, and opened shops in Poona, Satara, Nagpur, Bombay, Surat, Ahmadabad etc. to sell home made articles for use."[१८]

सार्वजनिक काकांनी आपल्या निश्चयाप्रमाणे जाडीभरडी खादीची वस्त्रे वापरण्यास प्रारंभ केला. दैनंदिन गरजेच्या काही वस्तूंचे उत्पादन अधिक झीज सोसून त्यांनी चालू ठेवले. त्या वस्तू लोकांनी वापराव्यात यासाठी त्यांनी व्याख्याने दिली व वितरणासाठी दुकाने काढली. तेव्हा कित्येकांनी सार्वजनिक काकांना चळ लागला आहे असे म्हणून त्यांचा अपमान केला. हे न्यायमूर्ती रानडे यांना समजल्यावर त्यांनी लोक कसे व कुठे चुकत आहेत हे लोकांना विशद करून सांगण्याकरिता 'स्वदेशी' या विषयावर दोन व्याख्याने दिली. पहिल्या व्याख्यानात देशातील कामगारांचे दारिद्र्य वाढविण्यात व कलाकौशल्याचा नाश करण्यास परकीय वस्तूंचा हव्यास कसा कारणीभूत ठरतो हे त्यांनी सांगितले. दुसऱ्या व्याख्यानात देशातील व्यापार वाढला असला तरी दारिद्र्य कमी न होता ते वाढलेच आहे असे कथन केले. "ह्या व्याख्यानांचा परिणाम श्रोतृ-वृंदावर इतका झाला की, कित्येक लोकांनी सभेत उठून आम्ही आजन्म स्वदेशी माल वापरू, काटकसरीने राहू आणि देशी कारखाने काढून देशबांधवांच्या पोटाला मिळेल असे काही तरी करून दाखवू म्हणून शपथा पाहिल्या."[१९]

सार्वजनिक काकांचे स्वदेशी प्रचाराचे व प्रसाराचे कार्य सार्वजनिक सभेच्या माध्यमातून चालले होते. या सभेने व तिच्या कार्यकर्त्यांनी स्वदेशी चळवळीसंबंधी केलेल्या कार्याविषयी डॉ. श्रीराम मेहरोत्रा म्हणतात,

"It (The Poona Sarvajanik Sabha) had already taken the lead in organizing a Swadeshi Movement in the Deccan. Societies for 'the revival and encouragement of native arts and industries' were established in several towns, whose members took an oath not to use European articles where the corresponding indigenous ones could be procured without any marked difference of price. Some enthusiastic members of those societies, of whom Joshi was one, even 'vowed not to use any foreign-manufactured article under any conditions... The manufacture of simple articles like ink, candles, soaps, etc. was encouraged. Joshi and his friends made excellent use of lectures and songs to spread the message of Swadeshi among the people."[२०]

स्वदेशी भाषेत निघणारी वृत्तपत्रे स्वदेशात तयार झालेल्या कागदावरच छापली जावीत असे सार्वजनिक काकांना वाटत होते. ठाणे येथील 'अरुणोदय' वृत्तपत्रात लिहिलेल्या पत्रात सार्वजनिक काका म्हणतात, "आपल्या देशात तयार होणारा कागद

जर आपणास पुरेसा असेल तर, '१ जुलै १८७३ पासून स्वदेशी–भाषेत निघणारी वर्तमानपत्रे स्वदेशात उत्पन्न झालेल्या कागदावर छापली जावी'—भांडवलाची अडचण पडणार नाही—मी व माझे मित्र व्यवस्था करू. शिवाय राजे व सरदार यांची मदत मिळवू—इतर वर्तमानपत्रांनीही याच भूमिकेचा स्वीकार करावा."[२१]

सार्वजनिक काकांची स्वदेशीविषयीची कल्पना व्यापक स्वरूपाची होती. स्वदेशी कापड, स्वदेशी वस्तूबरोबरच त्यांनी स्वदेशी न्यायव्यवस्थेसाठी लवाद कोर्टाची कल्पना मांडली. त्यांनी पुणे येथे इ. स. १८७६ मध्ये लवाद कोर्टाची स्थापना केली. या कोर्टाने खटले आपसात तोडविण्याचे काम चांगल्या प्रकारे केले, तर याचेही पुढे जाऊन इ.स. १८८० साली चिपळूणकर, आगरकर व लो. टिळक यांनी स्वदेशी शिक्षण देणारी शाळा सुरू केली.

न्या. रानडे यांचे स्वदेशी–विषयक विचार

सरकारी नोकरीच्या बंधनात असूनही न्या. महादेव गोविंद रानडे यांनी स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीस आपल्या लेखनातून व व्याख्यानातून प्रेरणा देण्याचे कार्य केले. आपल्या देशावर ब्रिटिशांचे केवळ राजकीय प्रभुत्व नसून त्यांनी औद्योगिक प्रभुत्वही स्थापन केले आहे. औद्योगिक प्रभुत्व परिणामांच्या दृष्टीने आपल्या देशात फारच हानि-कारक आहे. त्यामुळे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व शक्तीच निष्प्रभ होतील आणि आपला देश विकलांग होईल. हा नवा विचार त्यांनी लोकांसमोर मांडला.

इ. स. १८७२ व ७३ या दोन वर्षी न्या. रानडे यांनी स्वदेशी उद्योगधंद्यांच्या ऱ्हासावर आणि त्यांच्या उन्नतीच्या उपायासंबंधी दोन व्याख्याने दिली. दादाभाई नवरोजींनी मांडलेल्या द्रव्यशोषणाच्या पाझराचा सिद्धान्त (Drain Theory) लोकांना सुलभ भाषेत समजावून सांगितला. समाईक भांडवलाच्या मंडळ्या स्थापन करून यांत्रिक कारखाने काढल्याखेरीज औद्योगिक उन्नती होणार नाही, हे त्यांनी लोकांना पटवून दिले.[२२] सार्वजनिक काकांच्या निधनानंतर (इ. स. १८८०) पुढील काळात त्यांनी स्वदेशीचा विचार जागविण्याचे अत्यंत मोलाचे कार्य केले.

वरील सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून स्वदेशीच्या विचारांना प्रारंभ झाला, पाचव्या दशकापासून कृतीस प्रारंभ झाला, आणि सातव्या दशकात स्वदेशीच्या विचारांनी चवळवळीचे स्वरूप धारण केले. ही चळवळ सुरू करण्याचे श्रेय अर्थातच सार्वजनिक काकांना जाते. या संदर्भात इंडस्ट्रियल कॉन्फरन्सचे सेक्रेटरी एम्. बी. संत आपल्या Swadeshi Movement या लेखात म्हणतात, " The first faint beginning of the Swadeshi movement was made in Poona so far back as 1878 by an old veteran of that place the late Mr. Ganesh Vasudeo

Joshi widely known as Sarvajanik Kaka who may be justly looked upon as its pioneer.''[२३]

लोकमान्य टिळक यांनीही स्वदेशीचा वापर महाराष्ट्रात सर्वप्रथम सार्वजनिक काकांनी सुरू केल्याचे केसरीत नमूद केले आहे. टिळक म्हणतात. "—कै. गणेश वासुदेव जोशी यांनी पंचवीस वर्षांपूर्वी स्वदेशी कपडे वापरण्याचा (जो) निश्चय केला."[२४]

अर्थात सार्वजनिक काकांनी सुरू केलेली ही स्वदेशीची चळवळ प्रारंभी अगदी लहान होती व तिला लोकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला नाही. ज्याप्रमाणे एखादी महानदी तिच्या उगमस्थानाजवळ अतिशय चिमुकली व अस्पष्ट असते, तद्वतच स्वदेशीची चळवळ तिच्या प्रारंभी लहान व अस्पष्ट होती.

सार्वजनिक काकांनी सुरू केलेली चळवळ स्वदेशी चळवळीचा गंगौघ नसला तरी ती स्वदेशी चळीवळीची गंगोत्री निश्चितच होती.

स्वदेशी चळवळीविषयी सार्वजनिक काकांनी केलेल्या कार्याचे महत्त्व विशद करताना आचार्य जावडेकर म्हणतात, "अशा परिस्थितीत न्यायमूर्तींच्या विद्वत्ताप्रचुर व्याख्यानां- तून ज्या हिन्दी अर्थशास्त्राचा पाया घातला गेला, त्यापेक्षा सार्वजनिक काकांच्या स्वार्थत्यागी उत्साहातून जी स्वदेशी चळवळ उदयास आली, तिनेच स्वदेशी धंद्यांना खरे उत्तेजन दिले आणि खरे देशप्रेम जागृत व संघटित केले, असें म्हणणे भाग आहे."[२५]

स्वदेशी–बहिष्काराच्या चळवळीविषयी इ. स. १८८० मध्ये दादाभाई नवरोजी यांनी म्हटले आहे की, सध्या देशात सुरू असलेली ब्रिटिश कपड्यावर बहिष्कार घालण्याची चळवळ भविष्यकाळात कपड्यापुरतीच सीमित राहणार नाही तर भारतीय लोक ब्रिटिश राज्यावरही बहिष्कार घालतील.[२६]

महाराष्ट्रात जन्मास येऊन विकसित झालेली स्वदेशी बहिष्काराची चळवळ बंगालच्या फाळणीनंतर (इ. स. १९०५) हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. स्वदेशी बहिष्काराच्या वाढत्या चळवळीने ब्रिटिश राज्यकर्त्यांवर दडपण येऊन त्यांनी भारतीयांच्या राजकीय हक्कांच्या काही मागण्या मान्य केल्या. त्याबरोबरच स्वदेशी उद्योगधंद्यांना चालना मिळून एतद्देशीय कारागीर व कामगार त्यांना स्वाभिमानाने उदरनिर्वाह करण्याचे साधन प्राप्त झाले. या चळवळीमुळे भारतीय लोक अधिक स्वाभिमानी व स्वावलंबी बनले आणि त्यांच्या देशभक्तीला व राष्ट्रवादाला नवी दिशा मिळाली.

संदर्भ :

१. जावडेकर, आचार्य शं. द., **आधुनिक भारत**, दुसरी आवृत्ती, पुणे, १९५३, पृ. २४७.

२. Jambhekar G. G. (Ed.), *Memoirs and Writings of Acharya Balshastri Jambhekar (1812–1846)* Vol. II, Poona, 1950, p. 31.
३. कित्ता, पृ. २२३.
४. वेडेकर दि. के. (सं.) **चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ (१८४३–१८५५)** प्र. आ., पुणे, १९६९; (हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार, याविषयी विचार, ले. रामकृष्ण विश्वनाथ कानविंदे, मुंबई, १८४३) पृ. ७.
५. कित्ता, पृ. ९.
६. कित्ता, पृ. ३४–३५.
७. कित्ता, पृ. ३६–३७.
८. कित्ता, पृ. ३८–४०.
९. इनामदार डॉ. ना. र. (सं.) **लोकहितवादींची शतपत्रे** द्वितीयावृत्ती, पुणे, १९६०, पृ. २९१–९२.
१०. कित्ता, पृ. ३३९–४१.
११. जावडेकर-आचार्य शं. द., उपरोक्त, पृ. १०९–११०
१२. प्रियोळकर अ. का., **डॉ. भाऊ दाजी व्यक्ति, काल व कर्तृत्व**, प्रथमावृत्ती, मुंबई, १८७१, पृ. १४१–४३.
१३. कित्ता, पृ. १४५.
१४. कर्वे चिं. ग. (सं.) **महाराष्ट्र परिचय**, प्रथमावृत्ती, पुणे, १९५४, पृ. २४६.
१५. बोरवणकर. रा. ग., **महाराष्ट्र-चैतन्य, गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काकांचे चरित्र**, प्रथमावृत्ती, ठाणे, १९२४, पृ. २१.
१६. शिखरे, दा. न., **सार्वजनिक काका (ग. वा जोशी)** प्रथमावृत्ती, मुंबई, १९५२, पृ. १०
१७. खेर. भा. द., **लोकमान्य टिळक दर्शन**, द्वितीयावृत्ती, पुणे, १९७२, पृ. ८१.
१८. Jalbhoy R. H., *The Portrait Gallery of Western India*, First Edition, 1886, p. not mentioned.
१९. बोरवणकर, रा. ग., उपरोक्त, पृ. २३-२४.
२०. Mehrotra Dr. S. R., Poona Sarvajanik Sabha: The Early Phase (1870-1880) An article Published in, *Indian Economic And Social History Review*, Vol. VI-3 New Delhi Sept 1969, p. 306.
२१. फडके का. वि., (सं.) **अरुणोदय**, ठाणे, दि. ८ जून, १८७३, पृ. २.

२२. जावडेकर, आचार्य शं. द., उपरोक्त, पृ. १३२–३४.
२३. Sant M. B., 'Swadeshi Movement' An article published in, *The Quarterly Journal of the Poona Sarvajanik Sabha*, new series Vol. II, No. 3, Poona, Oct. 1917, p. 10–175.
२४. टिळक, लोकमान्य बा. गं., केसरी पुणे. दि ५ सप्टेंबर १९०५, (बहिष्कार योग) पृ. ४.
२५. जावडेकर, आचार्य शं. द., उपरोक्त, पृ. १३२.
२६. Naoroji Dadabhai, *Poverty and un–British rule in India*, First Edition, London, 1901, p. 207.

मंडळवृत्त

व. ग. हजिरनीस, अभिरक्षक

पदाधिकाऱ्यांचे दौरे

(१) मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब मुंदडे, मुख्य चिटणीस प्रा. डॉ. प्र.. न. देशपांडे, कोषाध्यक्ष मा. श्री. ज. शं. अग्रवाल व राजवाडे बँकेचे चेअरमन मा. श्री लोटणदादा माळी हे साक्री तालुक्यातील प्रतापपूर येथे गेले होते. उत्खननात सापडलेल्या विष्णूच्या मूर्तींची त्यांनी पाहणी केली. ग्रामस्थांशी चर्चा केली.

(२) सर्वश्री कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष, बँकेचे चेअरमन व वस्तुसंग्रहालयाचे तंत्रज्ञ श्री. राजीव चंद्रात्रे हे सागबारा येथे आदिवासी मेळाव्याला गेले होते. राजवाडे वस्तु-संग्रहालयातील 'आदिवासी दालन' संपन्न करण्याचे दृष्टीने त्यांनी श्रोतृवृंदासी हितगुज केले.

(३) धुळे जिल्ह्याचे लोकप्रिय शल्यचिकित्सक मा. डॉ. अमृतसिंग वसावे ह्यांनी आदिवासी गीतांच्या कॅसेट्स ध्वनिमुद्रणासाठी मंडळाला दिल्या होत्या.

(४) सर्वश्री कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष व बँकेचे चेअरमन हे पैठण येथे राज्यातील अर्बन बँकांच्या संचालकांच्या परिषदेला गेले असताना सर्व उपस्थित संचालकांशी राजवाडे संशोधन मंडळाच्या कामकाजाबाबत संपर्क साधला. श्री. चंद्रात्रे ह्यांनी पैठणचे पुराणवस्तु-संग्राहक मा. श्री. बाळासाहेब पाटील ह्यांचेशी वस्तू देवाण-घेवाणबाबत विचारविनिमय केला. श्री. चंद्रात्रे साक्री तालुक्यातील भोणगाव येथे पाहणीसाठी गेले होते.

(५) मंडळाचे अभिरक्षक श्री. व. ग. हजिरनीस ह्यांनी मालेगाव, ठाणे जिल्ह्यातील जव्हार, तारापूर, आगाशी, वटार वसई, कुळगाव-बदलापूर, धुळे जिल्ह्यातील नंदुरबार, तळोदे, कोठी, धडगाव, सुरास, टनाळा, मध्यप्रदेशात इंदूर, उज्जैन ह्या गावी गेले होते. काही कागदपत्रे, हस्तलिखित व शिळाप्रेस पोथ्या, नाणी त्यांनी संपादन केली. कागदपत्रे मंडळाला देण्याबाबत सुसंवाद प्रस्थापित केला.

(६) चाळीसगावचे प्रख्यात चित्रकार स्वर्गीय केकी मूस त्यांच्या नावे त्यांच्या कलाकृतीचे मंडळात दालन उभारण्याचे दृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी सर्वश्री विसूभाऊ पाताळे, चंद्रात्रे व हजिरनीस हे चाळीसगाव येथे विश्वस्तांना भेटावयास गेले होते.

(७) पुणे मुक्कामी श्री. हजिरनीस ह्यांनी डॉ. अ. रा. कुलकर्णी ह्यांचेकडील निलंगेकर देसाई फारसी-मोडी लिप्यंतरित फर्माने रुजू केली.

(८) धुळे शहरातील राजकीय पत्रकार व संगीत क्षेत्रात ज्यांनी इतिहास निर्माण केला आहे अशा व्यक्ती सर्वश्री शंकरराव परांजपे, नेने व डॉ. नाईक ह्यांच्या मुलाखती सर्वश्री विसूभाऊ पाताळे व हजिरनीस ह्यांनी घेतल्या.

भारत इतिहास संशोधन मंडळाचे प्रमुख चिटणीस डॉ. गो. त्र्यं कुलकर्णी यांचे मार्गदर्शनानुसार मंडळातील (राजवाडे) फारसी कागदपत्रांचा तर्जुमा करून घेतला.

विशेष कार्यक्रम

(१) दि. ७ जानेवारी १९९० रोजी इतिहासाचार्य राजवाडे यांची ६३ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाचे इतिहासाचे प्रपाठक डॉ. रा. श्री. मोरवंचीकर यांचे महाराष्ट्राची जडण-घडण-शालिवाहनपर्व या विषयावर सदीप उद्बोधक व्याख्यान झाले.

(२) पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने धुळे शहरातील सुप्रसिद्ध शाहीर कै. मुचाटे यांचे स्मरणार्थ त्यांची पदकधारी प्रतिमा व त्यांनी रचलेल्या पोवाड्यांच्या पाच-पाच प्रती त्यांची भावजय श्रीमती मुचाटे व धुळ्यातील स्वातंत्र्य सैनिक शाहीर नागेश मोगलाईकर यांनी मंडळाला भेट म्हणून सप्रेम दिली.

(३) राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या पुरस्काराने धुळे जिल्ह्यातील हिंदी विषय शिक्षकांचा मेळावा राजवाडे संशोधन मंडळात भरला होता. सदरहू मेळाव्याला राष्ट्रभाषा सभेचे अध्यक्ष मा. श्री. मोहनजी धारिया, कार्याध्यक्ष मा. प्र. अ. पुराणिक आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. राजवाडे वस्तुसंग्रहालय पाहून त्यांनी धन्योद्गार काढले.

(४) वर्षप्रतिपदेच्या दिनी महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व माहिती-संपर्क मंत्री नामदार श्री. अरुणभाई गुजराथी यांचा मंडळात सत्कार सोहळा आयोजित केला होता. त्यांनीही राजवाडे वस्तुसंग्रहालय व मंडळातील कागदपत्रे पाहून मंडळाविषयी खास आस्था व्यक्त केली.

(५) ज्येष्ठ नागरिक संघाची सभा राजवाडे संशोधन मंडळ व कै. तात्यासाहेब भट स्मारक सभागृह या दोन ठिकाणी आयोजित केली होती. मंडळाचे कामकाज लक्षात घेऊन मंडळाचे कामात यथामति यथाशक्ति सहयोग देणे अपेक्षित आहे.

(६) राजवाडे वस्तुसंग्रहालयाची मांडणी केल्यापासून वस्तुसंग्रहालयास भेट

देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

(७) जळगावच्या मु. जे. महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य चं. रा. पोतनीस आणि मूळचे धुळे जिल्ह्यातील पण आता वसईचे मा. श्री. य. ग. तथा दादा गायकवाड यांनी मंडळाच्या संदर्भ ग्रंथालयाला मौलिक ग्रंथ भेट दिले आहेत.

(८) पुण्याचे डॉ. रा. चिं. ढेरे, हैदराबादचे प्रा. श्री. रं. कुलकर्णी, अमळनेरचे श्री. दि. के. देशपांडे, पुण्याच्या डॉ. लता बापट आदी मान्यवरांनी मंडळातील संदर्भ ग्रंथांचा लाभ घेतला.

(९) दुखवट्याचे प्रस्ताव :

(१) राजा केळकर वस्तुसंग्रहालयाचे संस्थापक कै. दि. गं. तथा काकासाहेब केळकर.

(२) धुळ्यातील दानशूर स्वातंत्र्य सैनिक कै. गो. म. बापट.

(३) मंडळाचे चिटणीस डॉ. मु. ब. शहा यांचे पिताजी व सामाजिक कार्यकर्ते श्री. बन्सीलालजी शाह.

(४) आमच्या मंडळाच्या बँकेचे एक संचालक श्री. देव गुरुजी यांचे मामा व थोर तबलापटु कै. दत्तोपंत देशपांडे.

चुकीची दुरुस्ती

'संशोधक'च्या डिसेंबर १९८९ चे अंकात 'रेवणसिद्ध नाथपंथी नव्हते.' ह्या लेखाचे लेखक डॉ. के. ना. आपटे नसून डॉ. के. वा. आपटे आहेत.

८६६

मलपृष्ठ क्र. २ वरून]

		पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
१६.	जानकीसैंवर (सं. द. रा. भट)	२८८	१००	३०
१७.	आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित	—	३००	२०
१८.	अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित	—	३००	४०
१९.	योग चिंतामणी (ऑफसेट प्रिंट)	—	३००	४०
२०.	वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शाह)	७३	३००	१०
२१.	शिवछत्रपतींची १०९ कलमी बखर (सं. डॉ. प्र. न. देशपांडे)	७४	३००	१०
२२.	'नवरस रागमाला' इब्राहिम आदिलशाह द्वितीय लिखित (सं. डॉ. पंढरीनाथ रानडे)	१२९	१५०	१२
२३.	संशोधक 'सुवर्ण महोत्सवी अंक'	३२३	२००	४०
२४.	संशोधक 'हीरक महोत्सवी अंक'	२२५	१८०	४५

२५. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे) पृ. ३००, उपलब्ध प्रती २००, किंमत ६५ रुपये.

विशेष सवलत : वरील २५ पुस्तकांचा संच किंमत रु. ८४४ चा केवळ रु. ६५० ला मिळेल. दोन अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. टपाल खर्च वेगळा.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५७ वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे. जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रु. ३५ करण्यात आली आहे. या वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत १० रु. राहील. वर्ष १ ते २९ वर्षातील अंक उपलब्ध नाहीत. वर्ष ३० ते ५७ वर्षातील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रुपये ४०० त उपलब्ध. (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक, काँग्रेसशताब्दी विशेषांक, हीरकमहोत्सवी अंक, योग चिंतामणी, आज्ञापत्र यांचा समावेश आहे.)

मुख्य चिटणीस
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ
धुळे ४२४००१